मासिक वार्तापत्र • अंक 38 • मार्च 2025 • सहयोग मूल्य : रु. 10 • 24 पाने



# कामगार बिगुल

नव्या समाजवादी क्रांतीचा उद्घोषक


बीड मध्ये राजकीय आश्रयाखाली पोसलेली संघटित गुन्हेगारी 3

साम्राज्यवादी स्पर्धेत भरडली जात आहे सीरियाची जनता 11

विखारी भाषणांनी आणि धर्मवादाने माखलेले वर्ष 15

गोष्ट निवडणुकीच्या धंद्याची... 19


## महाराष्ट्र विशेष 'जन सुरक्षा' विधेयक; नव्हे, जन दडपशाही विधेयक!

# जनतेला इतके का घाबरते हे सरकार ?

संपादक मंडळ

महाराष्ट्रातील महायुती सरकारने जुलै मध्ये आणि नंतर 18 डिसेंबर 2024 रोजी विधानसभेत 'महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा अधिनियम, 2024' हे विधेयक सादर केले. आता हे विधेयक पारित करण्याकडे सरकार पावले टाकत आहे. देश स्वतंत्र झाल्यानंतर इंग्रजांच्या दडपशाही कायद्यांना सुसूत्र करून स्वीकारण्यापासून ते टाडा, पोटा, युएपीए, मकोका, एनएसए असे अनेक कायदे पारित करून सर्वच सरकारांनी स्वत:कडे जनमताला चिरडण्यासाठी पाशवी अधिकार घेतले. महाराष्ट्रात येऊ घातलेला हा कायदा त्याच परंपरेला पुढे नेतो आहे, परंतु जनतेच्या हक्कांकरिता सरकार विरोधात उठणारा प्रत्येक आवाज पाशवी पद्धतीने दाबण्याचा अधिकार हा कायदा अभूतपूर्व पद्धतीने सरकारला देतो आहे. देशात जे मोजकेच का होईना लोकशाही-नागरी अधिकार प्रत्येक व्यक्तीला मिळाले आहेत, त्यावर सरळ हल्ला करू पाहणाऱ्या आणि जनतेचा आवाज दाबण्याचा अधिकार सरकारला देण्याऱ्या या कायद्याला कामगार वर्गाने तीव्र विरोध केला पाहिजे.

**सर्वप्रथम तर "शहरी नक्षलवादा"ला आळा घालण्याचे उद्दिष्ट सांगणाऱ्या या कायद्यात शहरी नक्षलवाद याची व्याख्याच नाही. यात आश्चर्य नाही.** कारण की शहरी नक्षलवाद ही संघ-भाजपने उभी केलेली एक राजकीय संकल्पना आहे, जिचे उद्दिष्ट विरोधकांना "बदनाम" करणे, त्याविरोधात अपप्रचार राबवणे, त्यांच्या न्याय्य, जनपक्षधर, कायदेशीर कृत्यांना संशयाच्या घेऱ्यात आणून जनतेच्या एका गटात त्याबद्दल संशय निर्माण करणे हा आहे. आजवरचा इतिहास पाहिला तर झोपडपट्टीवासीयांची आंदोलने, दलित अत्याचाराविरोधातील आंदोलने, संघ-भाजपच्या गुंडशाहीविरोधातील आंदोलने, विद्यार्थी-युवकांची झुंझार आंदोलने, पर्यावरणाच्या मुद्यावरील किंवा विनाशकारी प्रकल्पांविरोधातील आणि बड्या भांडवलदारांच्या हिताविरोधातील आंदोलनांबद्दल या शब्दाचा उल्लेख सर्रास करण्यात आला, पण आता तर भांडवलदार वर्गाचीच पाठराखण करणाऱ्या काँग्रेस (जसे की मोदींनी 6 ऑक्टोबर 2024 रोजी मुंबईत म्हटले की काँग्रेस आता शहरी नक्षलवाद्यांमार्फत चालवली जात आहे), आम आदमी पक्ष (जसे की अमित शहा यांनी मे 2024 मध्ये गुजरात मध्ये आप पक्षाला शहरी नक्षलवादी पक्ष म्हटले), सीपीएम (जसे की सीपीएमच्या किसान सभेने मार्च 2018 मध्ये काढलेल्या 'लाँग मार्च' या धनिक शेतकरी धार्जिण्या मोर्चाला भाजपच्या नेत्या पूनम महाजन यांनी शहरी नक्षलींचा मोर्चा म्हटले) सारख्या पक्षांच्या आंदोलनांना, धोरणांना, घोषणांना धरूनही या शब्दाचा उल्लेख केला जाऊ लागला आहे.

नक्षलवाद या शब्दासोबत सत्तेविरोधातील सशस्त्र उठावाची कल्पना जोडलेली होती. सर्वोच्च न्यायालयाच्या अनेक निकालांमध्ये सुद्धा बेकायदेशीर कृत्यांच्या व्याख्येत हिंसेचा स्पष्ट उल्लेख अनेकदा करण्यात आला. मूळातच भारतासारख्या देशात शहरी भागांमध्ये, अत्यंत घनदाट वस्ती असलेल्या ठिकाणी एखादा सशस्त्र लढा उभा होऊ शकतो आणि सरकारला त्याची खबर लागत नाही हेच हास्यास्पद आहे. पण जर सशस्त्र लढा ही व्याख्याच नसेल, तर सरकार विरोधातील कोणताही आवाज शहरी नक्षलवाद म्हटला जाऊ शकतो आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याची, लोकशाही-नागरी स्वातंत्र्याची मूलभूत चौकटच उखडली जाते. **त्यामुळे, शहरी नक्षलवादाची कायदेशीर व्याख्या करणे भाजप-संघ परिवाराला निश्चितपणे गैरसोयीचेच ठरेल कारण मग इंग्रजांचे पाय चाटणाऱ्यांचे हे वंशज सोडून कदाचित कोणीच गैर-शहरी-नक्षली उरत नाही.**

"व्यक्ती आणि संघटना यांच्या विवक्षित बेकायदेशीर कृत्यांना अधिक प्रभावीपणे प्रतिबंध करण्यासाठी..." असे विधेयकाच्या शीर्षकात म्हटलेले आहे. परंतु

पान 22 वर

## परभणीतील दलित वस्तीत पोलिसांचे कोम्बिंग ऑपरेशन

# भारतातील भांडवली राज्यसत्तेचे जातीयवादी, दलित विरोधी चरित्र ओळखा

✎ परमेश्वर

गेले अनेक महिने ज्या घटनेबद्दल महाराष्ट्रातील मीडियाने दुर्लक्ष करण्याचे धोरण अवलंबले आहे, ते आहे जेलमध्ये सोमनाथ सूर्यवंशीचा पोलिसाद्वारे खून. परभणी येथे 10 डिसेंबर 2024 रोजी जनक्षोभ उसळला, ज्याला "दंगल" म्हटले गेले. या जनक्षोभाचे तत्कालीन कारण म्हणजे डॉ. आंबेडकर पुतळ्याची आणि राज्यघटनेची विटंबना केल्यामुळे दलित समुदाय एकत्र आला, आणि जनक्षोभ उसळला. या विरोधात गृहखात्याच्या आदेशाने पोलीस खात्याने दलित वस्त्यांमध्ये कोम्बिंग ऑपरेशन सुरु केले आणि वस्तीची झाडाझडती घेतली. या दरम्यान पोलिसांकडून मालमत्तेची नासधूस केल्याचेही व्हिडिओ समोर आले आहेत. सदर घटनेअगोदर हिंदू एकता मोर्चा या गटाद्वारे परभणीत एक मोर्चा काढण्यात आला होता. त्यानंतर दत्ता सोपान पवार या कथित "मानसिक रुग्ण" व्यक्तीने सदर विटंबना केल्याचे समोर आले. स्वाभाविकपणे या विटंबनेत हिंदू एकता मोर्चाची चौकशी व्हावी ही मागणी पुढे आली, परंतु त्यावर ठोस कारवाई न करता, सारवासारव करून आपला रोष प्रकट करणाऱ्या दलित समुदायाविरोधात दलित वस्तीत कोम्बिंग ऑपरेशन सुरु केले गेले.

मोदी सरकार सत्तेत आल्यानंतर मागील दहा वर्षात कामगार, कष्टकरी, दलित, अल्पसंख्यांकावर होणारे हल्ले वेगाने वाढले आहेत. पण एकूणच सध्याच्या फॅशिस्ट राज्यसत्तेच्या हल्ले करण्याच्या कार्यपद्धतीत नवीन स्वरूप दिसत आहे. एका बाजूला हिंदुत्ववादी पक्ष, गट संघटना यांच्या मदतीने दलितांवर, कामगार-कष्टकरी वर्गावर सामूहिक किंवा व्यक्तिगत हल्ले करायचे आणि दुसऱ्या बाजूला जेव्हा विरोध समोर येतो तेव्हा मीडियाला हाताशी धरून त्याला अँटी नॅशनल, दहशतवादी, अर्बन नक्षल अशी लेबले लावायची. परभणीतील दलित वस्तीवरील हल्ला आणि सोमनाथ सूर्यवंशी याची पोलिसांनी केलेली हत्या या घटनेतून हे ठळकपणे दिसत आहे .

### परभणी दलित वस्तीवर पोलिसांचा सरकार पुरस्कृत 'हल्ला'

महाराष्ट्रातील परभणी शहरातील भीमनगर, प्रियदर्शनी नगर आणि सारंग नगर या दलित बहुल वस्तीत 10 ते 15 डिसेंबर 2024 या कालावधीत राज्यसरकारमार्फत पोलिस दलाकडून कोम्बिंग ऑपरेशन राबवले गेले. कोम्बिंग ऑपरेशन या नावातच दिसून येते की डोक्यातून जसे उवा शोधण्यासाठी कंगवा फिरवतात, तसे पोलिस दलित वस्तीत "उवा" शोधत होते! पोलिसांच्या या हल्ल्यात अनेक दलितांची घरे पाडली गेली, कामगारांना मारहाण केली गेली, जातीवाचक शिव्या देण्यात आल्या, दलित महिलांना मारहाण केली गेली, इतकेच नाही तर महिलांच्या गुप्तांगांवर अत्याचार केले, चाळीस लोकांना पोलीस कोठडीत डांबून त्यांना कोठडीत मारहाण केली गेली. यापुढे जाऊन अटक केलेल्यांपैकी सुशिक्षित तरुण सोमनाथ सूर्यवंशी याला तुरुंगात मारहाण करून त्याचा जीव घेतला. पोलीस इतके करून थांबले नाहीत तर,

पान 23 वर

## महाराष्ट्र विशेष 'जन सुरक्षा' विधेयक; नव्हे, जन दडपशाही विधेयक!

पान 22 वरून

अस्वच्छता, उपासमार, अपमान, भेदभाव, जातीयवाद, धर्मवाद या सर्वांखाली पिचलेल्या या जनतेला तिच्या समस्यांचे खरे आकलन झाले तर काय होईल? अभूतपूर्व स्तरावर आज खाजगीकरण, बाजारीकरणाद्वारे अल्पसंख्य मालकवर्गाच्या तुंबड्या भरणे सुरु आहे, कामगार कायदे संपवले जात आहेत, बेरोजगारीचे उच्चांक रोज दिसत आहेत, आणि कंत्राटीकरण, जुजबीकरणाद्वारे खरे वेतन रसातळाला पोहोचले आहे, जनतेचे मोठ्या प्रमाणात विस्थापन करणारे, अत्यंत प्रदूषणकारी असे तथाकथित "विकास" प्रकल्प अनेक ठिकाणी सरकारांतर्फे लादले जात आहेत. नुकतेच बांग्लादेश, श्रीलंका आणि या अगोदर ट्युनिशिया, इजिप्त सारख्या देशांमध्ये क्रांतिकारी पर्याय समोर नसतानाही सरकारांविरोधात झालेले जनउठाव जगभरातील सरकारांना धोक्याचा इशारा आहेत. अशा स्थितीत कोणत्याही देशव्यापी किंवा व्यापक क्रांतिकारी आंदोलनाच्या अनुपस्थितीत सुद्धा भांडवलदार वर्गाला कापरे भरलेले असते. कम्युनिझमच्या "भूता"ने युरोपला भंडावून सोडले आहे असे कम्युनिस्ट मॅनिफेस्टोच्या सुरुवातीलाच मार्क्स-एंगल्स म्हणतात. जगात कामगार वर्गीय क्रांत्यांचे युग सुरू झाल्यापासून, कामगार वर्गाच्या आंदोलनाच्या पडत्या काळातही त्याच्या उभारीची भिती भांडवलदार वर्गाला सतावतच असते. फॅशिस्टांचे राज्यच भितीवर आधारलेले असल्यामुळे तर ते अधिकच भयकंपित असतात. त्यामुळेच बड्या भांडवलदार वर्गाच्या विश्वासू काँग्रेसचे नेते राहुल गांधींच्या हातातील 'लाल' रंगाचे, भांडवली लोकशाहीच्या राज्यघटनेचे, पुस्तकही फॅशिस्ट भाजपला एक 'अर्बन नक्सली' दस्तावेज दिसतो. 'लाल' रंगाची म्हणजेच कामगार वर्गाच्या प्रतिकाराची भितीच त्यांच्या तोंडातून सतत बाहेर पडत असते.

जनतेमध्ये तापत असलेल्या असंतोषाची भांडवलदार वर्गाला जाण आहे, **आणि याची जाणीव सुद्धा आहे की फक्त धर्मवाद, जातीयवाद, प्रांतवाद या हत्यारांनी कामकरी जनतेला सतत गुंतवून आणि गुंगवून ठेवणे ही अपुरी रणनिती आहे;** आणि म्हणूनच गरज लागेल तेव्हा दमनकारी कारवाईकरिता अशा कायद्यांची गरज आहे. जनतेचे आंदोलनच आज एका सुप्तावस्थेत गेले आहे, उजव्या प्रतिक्रियावादी शक्तीच रस्त्यांवर उतरून दहशतवादी हिंसात्मक कारवाया करत आहेत, आणि त्यामुळे वास्तवात अशा कायद्याची अंमलबजावणी करताना असंख्य लोकशाही, नागरी, विद्यार्थी, युवक, कामगार, महिला, राजकीय पक्ष यासारख्या संघटनांवर सरसकट बंदी घातली जाण्याची शक्यता लगेचच दिसत नाही; परंतु सरसकट दमन नव्हे, तर निवडक, लक्षित दमन आणि त्याद्वारे इतरांमध्ये भिती, वचक निर्माण करणे, त्यांना कह्यात आणणे आणि भविष्यात गरज वाटेल तेव्हा बेलगामपणे वापरण्यसाठी या कायद्याचे हत्यार हातात ठेवणे हे सरकारचे उद्दिष्ट आहे.

भांडवली राज्यसत्तेचे प्रकार्य असते की भांडवलदार वर्गाच्या विविध गटांमधील स्पर्धेचे नियोजन करावे, भांडवलदार वर्गाचे एकंदरीत हित आणि बाजाराच्या व्यवस्थेचे निरंतर संचालन आणि वाढ साध्य करावे. नफ्याच्या दराचे सरासरीकरण हा त्याचा आर्थिक मार्ग असतो. परंतु एकंदरीत अर्थव्यवस्थेतच नफ्याच्या दराच्या घसरणीचे संकट तीव्र झाल्यानंतर राज्यसत्तेच्या प्रमुख प्रकार्याचे संकटही उभे राहते. फॅशिझम ही अशा संकटाची एक प्रतिक्रिया म्हणूनच सत्तेवर येतो. मोदी-शाह जोडगोळीच्या हुकूमशाही कारभाराच्या समर्थनात देशात भांडवलदार वर्गाचे सर्व प्रमुख हिस्से उभे आहेत ते यामुळेच. भांडवलदार वर्गाच्या आंतरिक राजकीय संकटाचीच परिणती आहे की आता काँग्रेस सारख्या भांडवलदार वर्गाच्या विश्वासू पक्षावरही भांडवली चौकटीतीलच कल्याणकारी योजना मांडल्यावर आणि अडानी-अंबानी सारख्या गटांवर टीका केल्यानंतर शहरी नक्षलवादाचे आरोप होतात.

20 व्या शतकातील आकस्मिक आर्थिक संकटाच्या परिणामी निर्माण झालेल्या राजकीय संकटाने जन्माला घातलेल्या हिटलर, मुसोलिनीच्या फॅशिझम प्रमाणे 21व्या शतकातील फॅशिझम हा लोकशाही यंत्रणा ध्वस्त करून आणि सरसकट हुकूमशाही लादून काम करत नाही. नफ्याच्या दराच्या घसरणीच्या दीर्घकालिक आर्थिक संकटाच्या स्थितीत निर्माण झालेल्या, राजकीय संकटाची अभिव्यक्ती असलेल्या,

आर्थिक संकटात नफ्याचा दर टिकवण्याकरिता, नवउदारवादी काळात, भांडवलाला जो 'मोकळा वाव' हवा आहे, गुंतवणूकीचे स्वातंत्र्य, बाजारांवर ताबा, संसाधनांवर ताबा, कामगार वर्गावर ताबा हवा आहे, त्याकरिता भांडवली लोकशाहीच्या संरचनेतील न्यायपालिका-विधानमंडळ-कार्यकारी मंडळ असे अधिकारांचे विलगीकरण आणि निर्णयप्रक्रियेतील दिरंगाई आता जास्त अडथळे ठरत आहेत. **कार्यकारी मंडळाचे वाढते वर्चस्व ही फॅशिस्टच नव्हे तर सर्वच नवउदारवादी राज्यसत्तांची एक अभिलाक्षणिकता आहे.** म्हणूनच एकीकडे न्यायालयांपासून ते निवडणुक आयोगापर्यंत सर्व लोकशाही यंत्रणांना आतून पोखरत, त्यात फॅशिस्ट विचारधारेचे प्राबल्य निर्माण करत असताना, दुसरीकडे न्यायपालिका आणि विधानमंडळे यांच्या अधिकारांवर वाढते अतिक्रमण करत कार्यकारी मंडळाची वाढती भुमिका आणि वर्चस्व स्थापित केले जात आहे. 'जन सुरक्षा' सारखे कायदे सरकार, मंत्री, पोलिस, अधिकारी यांच्या हातात देत असलेले दमनकारी अधिकार याच प्रक्रियेचे पुढचे पाऊल आहे.

साथींनो

'कामगार बिगुल' आपले स्वतःचे वृत्तपत्र आहे. हे वृत्तपत्र अधिक चांगले बनवण्यासाठी आपल्या सूचनांचे आम्ही स्वागत करतो. त्याच बरोबर आपण जर देशभरातील कामगारांपर्यंत आपल्या कारखान्यातील, ऑफिस मधील परिस्थिती, मालक वर्गाकडून केली जाणारी लूट, संसदीय राजकीय पक्षांचा श्रीमंत धार्जिणेपणा, पोलिस व मालकांच्या खाजगी गुंडांकडून केले जाणारे अत्याचार, तुमच्या रहिवासी वस्त्यांमधील खराब परिस्थिती, शिक्षण, आरोग्य यांसारख्या सुविधांचा अभाव इत्यादी विषयी आपली मतं पोहचवू इच्छित असाल तर आम्हाला आपले लेख किंवा प्रतिक्रिया पाठवू शकता. आपण आम्हाला खालील पत्त्यावर पत्र पाठवू शकता किंवा फोन करून सुद्धा संपर्क साधू शकता.

•1, साई कृपा चाळ, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नगर, मानखुर्द (पश्चिम) (वेस्ट) मुंबई 400043 मो. - 9619039793, 9082861727 • अहमदनगर : 74992 64646 • पुणे : 8669735643

### 'कामगार बिगुल'चे स्वरूप, उद्देश आणि जबाबदाऱ्या

1. 'कामगार बिगुल' व्यापक कष्टकरी जनतेमध्ये क्रांतिकारी राजकीय शिक्षक व प्रचारकाची भूमिका पार पाडेल. हे वृत्तपत्र कामगारांमध्ये क्रांतिकारी वैज्ञानिक विचारधारेचा प्रचार करेल आणि खऱ्याखुऱ्या सर्वहारा संस्कृतीचा वाहक बनेल. हे वृत्तपत्र जगभरातील क्रांत्यांचा इतिहास आणि त्यांच्यातून घ्यावयाचे शिक्षण, आपल्या देशातील वर्ग संघर्ष, कामगार चळवळीचा इतिहास आणि त्यातून घ्यावयाचे धडे यांच्याशी कामगार वर्गाला परिचित करेल. त्याच बरोबर समस्त भांडवली अफवा-दुष्प्रचारांचा भांडाफोड करेल.

2. 'कामगार बिगुल' भारतीय क्रांतीचे स्वरूप, मार्ग आणि समस्यांविषयी क्रांतिकारी कम्युनिस्टांमध्ये चालणाऱ्या विविध चर्चा नियमित रुपात छापेल आणि देश-विदेशातील राजकीय घटना आणि आर्थिक परिस्थितीचे योग्य विश्लेषण मांडून कामगार वर्गाला शिक्षित करण्याचे काम करेल.

3. 'कामगार बिगुल' स्वतः अशा चर्चा चालवेल जेणे करून कामगारांचे राजकीय शिक्षण होईल. तसेच त्यांच्यामध्ये योग्य राजकीय कार्यदिशेची समज विकसित होऊन ते क्रांतिकारी पार्टी बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकतील आणि त्यातून व्यवहारामध्ये योग्य कार्यदिशेच्या सत्यापनाचा आधार तयार होऊ शकेल.

4. 'कामगार बिगुल' कामगार वर्गामध्ये राजकीय प्रचार आणि शिक्षणाचे कार्य चालवत सर्वहारा क्रांतीच्या ऐतिहासिक जबाबदारीशी त्याला परिचित करेल, त्याला आर्थिक संघर्षांसोबतच त्याच्या राजकीय अधिकारांसाठी लढायला शिकवेल, चार आणे-आठ आण्याच्या किरकोळ आर्थिक लढायांमध्ये कामगारांना अडकावून टाकणाऱ्या नकली कम्युनिस्टांपासून आणि भांडवली राजकीय पक्षांचे शेपूट असलेल्या किंवा व्यक्तिवादी-अराजकतावादी ट्रेड युनियन्स पासून सावध करत त्याला हरतऱ्हेच्या अर्थवाद व सुधारवादाविरुद्ध लढायला शिकवेल, त्याच बरोबर त्यांच्यात सच्ची क्रांतिकारी चेतना निर्माण करेल. 'कामगार बिगुल' सर्वहारा वर्गाच्या फळ्यांमधून क्रांतिकारकांची भरती करण्याच्या कामात सहाय्यक बनेल.

5. 'कामगार बिगुल' हे वृत्तपत्र कामगार वर्गाचा क्रांतिकारी शिक्षक, प्रचारक आणि आवाहनकर्ता ह्या भूमिकांबरोबरच क्रांतिकारी संघटनकर्ता व आंदोलनकर्त्याची भूमिका सुद्धा पार पाडेल.

### बिगुल व्हॉट्सॲप चॅनेल

जर तुम्ही आमच्याशी व्हाट्सॲप वर जोडून घेऊ इच्छिता, तर या लिंक वर जाऊन आमचा व्हॉट्सॲप चॅनेल जॉईन करावा :
http://www.marathi.mazdoorbigul.net/whatsapp
चॅनेल जॉईन करण्यामध्ये काही समस्या असेल तर या नंबर वर आपले नाव आणि जिल्हा लिहून पाठवावा :
9892808704



**बुर्झ्वा वृत्तपत्रे भांडवलाच्या विशाल ढिगांच्या बळावर चालतात, कामगारांची वृत्तपत्रे स्वत: कामगारांनी गोळा केलेल्या पैशावर चालतात.**
**लेनिन**


## कामगार बिगुल
खाजगी वितरणासाठी

संपादक मंडळ : निखील एकडे, बबन ठोके
संपादकीय कार्यालय : द्वारे बबन ठोके, देविका मेडिकोच्या वर, साई कृपा चाळ, साईबाबा मंदिराजवळ, वीर जिजामाता भोसले मार्ग, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नगर, मानखुर्द, मुंबई - 400043

संपर्क : 8669735643 , 9619039793
ईमेल : kamgarbigul@gmail.com
सहयोग राशी : रु. 10 (एका अंकासाठी)
वार्षिक : रु. 120 (टपाल शुल्काशिवाय)

# सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण
# बीड मध्ये राजकीय आश्रयाखाली पोसलेली संघटित गुन्हेगारी



✎ बबन

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाने मागील तीन महिन्यात महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक वर्तुळात खळबळ माजवली आहे. या प्रकरणाच्या तपासादरम्यान मंत्री असलेल्या धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय वाल्मीक कराडसह इतर सात जणांवर खंडणी आणि हत्या, तसेच संघटित गुन्हेगारीतील सहभागाचे आरोप ठेवण्यात आले आहेत. मकोका अंतर्गत गुन्हा दाखल होऊन आठ पैकी सात जणांना अटक झाली आहे. मोठ्या जनदबावानंतर अखेर धनंजय मुंडे यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला आहे. यानंतर काहीच दिवसात संतोष देशमुख हत्या प्रकरणात धनंजय मुंडेवर "आकाचा आका" म्हणून आरोप करणाऱ्या सुरेश धस यांचा कार्यकर्ता व भटके-विमुक्त युवा आघाडीचा नेता सतीश भोसले उर्फ खोक्या भाई याचा बेदम मारहाण करतानाचा व्हिडिओ समोर आला आहे. वन्यजीव शिकार प्रकरणात फरार असलेल्या याच सतीश भोसले याला उत्तरप्रदेशातील प्रयागराज येथे अटक करण्यात आली आहे.

सत्तासंघर्षात दोन भांडवली पक्षांतील अंतर्विरोध आणि दोन राजकीय नेत्यांमध्ये एकमेकांना थोपवणीसाठी चाललेली चढाओढ, माफिया वर्चस्वातून बीड जिल्ह्यात वाढत चाललेली गुंडगिरी, परळीतील औष्णिक ऊर्जा प्रकल्पातील ओल्या व कोरड्या राखेचा अवैध व्यवसाय, भंगाराचा अवैध व्यवसाय, बेकायदेशीर वाळू उपसा, खंडणी वसुलीचे वाढते गुन्हे, स्थानिक गुन्हेगारी टोळ्यांची वाढती दहशत, चाकू, सुरा, बंदुकीच्या जोरावर माजत असलेली दहशत, गुन्हेगारी आणि राजकारणाचे संबंध असे अनेक मुद्दे प्रकाशझोतात आले आहेत. राज्यभरातील समाजमाध्यमात 'बीडचा बिहार झाला आहे का?' आणि 'बीड म्हणजे गँग्स ऑफ वासेपूर' अशा चर्चांना उधाण आले आहे.

### संतोष देशमुख हत्या प्रकरण: घटनाक्रम आणि तपशील

बीड मधील केज तालुक्यातील मस्साजोग गावच्या परिसरात असलेल्या आवादा एनर्जी पवनचक्की प्रकल्पात 6 डिसेंबर 2024 रोजी सुदर्शन घुले, प्रतिक घुले आणि इतर व्यक्तींनी अनधिकृत प्रवेश करून मस्साजोग गावातील रहिवासी असलेल्या सुरक्षारक्षकाला मारहाण करत आवादा कंपनीच्या अधिकाऱ्यांना शिवीगाळ आणि मारहाण केली. घटनेची माहिती मिळताच सरपंच संतोष देशमुख घटनास्थळी पोहचले, ज्यातून सुदर्शन घुले व इतर सहकाऱ्यांसोबत वाद झाला. या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर केज पोलिस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. ज्याचा राग मनात धरून आवादा कंपनीकडून दोन कोटी रुपये खंडणी घेण्याच्या विरोधात आलेल्या सरपंच संतोष देशमुख यांच्या अपहरण आणि हत्येचा कट रचण्यात आला. त्यानंतर 9 डिसेंबर 2024 रोजी अपहरण आणि निर्घृणपणे हत्या करण्यात आली. काही तासांनी त्यांचा मृतदेह परिसरात आढळून आला, त्यानंतर गावात आणि राज्यभरात संतापाची लाट उसळली. त्यांच्या भावाच्या फिर्यादीवरून केज पोलीस ठाण्यात सहा जणांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला. 10 डिसेंबर रोजी दोषी आरोपींना तात्काळ अटक करण्याच्या मागणीसाठी गावकऱ्यांनी 12 तास अहमदपूर-अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावर चक्काजाम आंदोलन केले. त्याच दिवशी जयराम चाटे आणि महेश केदार या दोघांना अटक करण्यात आली. त्यानंतर ग्रामस्थांनी आंदोलन मागे घेतले आणि संतोष देशमुख यांच्या मृतदेहावर 24 तासांनंतर अंत्यसंस्कार केले. 11 डिसेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेने सुदर्शन घुले आणि सुधीर सांगळे याला पुण्यातून अटक केली. त्यानंतर धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मिक कराड, अजित पवार गटाचे केज तालुका अध्यक्ष विष्णू चाटे आणि सुदर्शन घुले यांच्यावर खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला. 13 डिसेंबर रोजी संतोष देशमुख हत्या प्रकरणाच्या निषेधार्थ बीड जिल्हा बंदची हाक देण्यात आली. त्याच दिवशी या प्रकरणाचा तपास गुन्हे अन्वेषण विभाग (CID) कडे देण्यात आला. 18 डिसेंबर रोजी विष्णू चाटे याला अटक करण्यात आली. 19 डिसेंबर रोजी पोस्टमार्टम अहवालानुसार संतोष देशमुख यांच्या अंगावर 56 जखमा आढळून आल्या, ज्यामुळे मारहाणीमुळे त्यांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. 21 डिसेंबर रोजी पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांची बदली करण्यात आली आणि अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्याकडे अतिरिक्त पदभार देण्यात आला. तर नवनीत कावत यांची पोलीस अधीक्षकपदी नियुक्ती करण्यात आली. 24 डिसेंबर रोजी मस्साजोग येथील आवादा एनर्जी पवनचक्की येथे झालेल्या मारहाण तसेच खंडणी प्रकरणाचा तपास सुद्धा गुन्हे अन्वेषण विभाग (CID) कडे देण्यात आला.

31 डिसेंबर रोजी फरार असलेल्या वाल्मिक कराडने पुण्यात गुन्हे अन्वेषण विभाग (CID) समोर शरणागती पत्करली. 6 जानेवारी रोजी राज्य सरकारने संतोष देशमुख हत्या प्रकरणाच्या तपासासाठी विशेष तपास पथक (SIT) ची स्थापना केली. या एस.आय.टी. मधून तीन अधिकाऱ्यांची उचलबांगडी करण्यात आली, ज्यापैकी एकाचा वाल्मिक कराडसोबतचा फोटो 'व्हायरल' झाला होता. 2 मार्च रोजी गुन्हे अन्वेषण विभागाने या प्रकरणात सुमारे 1400 पानांचे आरोपपत्र विशेष मकोका न्यायालयात दाखल केले. या आरोपपत्रात वाल्मिक कराड याला प्रमुख आरोपी म्हणून नमूद करण्यात आले. तपासादरम्यान मिळालेल्या पुराव्यांमध्ये संतोष देशमुख यांची हत्या करतानाचे व्हिडिओ आणि फोटो समाविष्ट होते, ज्यात खंडणी आणि हत्येचा गुन्हा दाखल तसेच संघटित गुन्हेगारीतील सहभाग आढळल्यामुळे मकोका लावण्यात आला आहे. आत्तापर्यंत या प्रकरणात सात आरोपी अटकेत आहेत, तर आरोपी कृष्णा आंधळे अद्याप फरार आहे.

हे हत्याकांड एकमेव घटना नाही तर परळी, बीड भागात भांडवली राजकीय पाठिंब्याने उभ्या राहिलेल्या गुन्हेगारीच्या हिमनगाचे फक्त टोक आहे.

### परळी औष्णिक ऊर्जा प्रकल्प : राखेच्या अर्थकारणातून उभी राहिलेली दहशत आणि भंगार माफियांचे साम्राज्य

1971 साली सुरू झालेला औष्णिक ऊर्जा प्रकल्प, हा केवळ वीज निर्मितीचा केंद्रबिंदू राहिलेला नाही, तर एक भयावह काळ्या अर्थकारणाचा अड्डा बनला आहे. प्रकल्पातून बाहेर पडणारी राख आणि भंगार ही जणू सोन्याची खाण झाली आहे, जिच्या लूटीसाठी माफिया, राजकारणी आणि



सरकारी यंत्रणा एकत्र येऊन सर्वसामान्य नागरिकांना पायदळी तुडवत भ्रष्टाचार, दहशत आणि गुन्हेगारीला खतपाणी घालत आहेत.

गेल्या काही वर्षांत परळीच्या औष्णिक ऊर्जा केंद्राने महाराष्ट्राच्या वीजपुरवठ्यात मोठा वाटा उचलला आहे. पण त्याचवेळी, या प्रकल्पाने परिसरातील गुन्हेगारीला देखील बळ दिले आहे. ऊर्जानिर्मितीच्या प्रक्रियेतून रोज हजारो टन ओली व सुकी राख बाहेर पडते. सुरुवातीला ही राख केवळ पर्यावरणीय समस्या मानली जात होती, पण जसजसा बांधकाम व्यवसायाने वेग घेतला, तसतशी तिची मागणीही प्रचंड वाढली. आज, वीटभट्ट्या, सिमेंट फॅक्टऱ्या आणि रस्ते बांधकाम प्रकल्पांसाठी राख एक महत्त्वपूर्ण घटक बनली आहे. यामुळेच, ही राख केवळ कचरा न राहता एका मोठ्या काळ्या अर्थव्यवस्थेचा भाग बनत गेली.

दिवसाला 600-700 ट्रक राख बाहेर पडते. प्रत्येक ट्रकचा व्यवहार 18 ते 20 हजार रुपयांपर्यंत जातो. ज्यातून साधारणतः 2.5 लाखाच्या विटा तयार होतात. एका दिवसाला 36 लाखाच्या वर आणि वर्षाला एक हजार कोटीच्या वर ही आर्थिक उलाढालीचे अर्थकारण उभे राहिले आहे. इतक्या मोठ्या प्रमाणावर पैसा खेळत असताना भ्रष्टाचार, खंडणी आणि गुन्हेगारी वाढली नाही तरच नवल. राखेचा संपूर्ण पुरवठा माफियांच्या ताब्यात आहे. छोटे व्यावसायिक किंवा वीटभट्टी मालकांना ही राख मिळवण्यासाठी माफियांच्या साखळीला पैसे द्यावे लागतात. बीड मधील एकट्या परळी शहराच्या सभोवताली 1500 पेक्षा जास्त विटभट्ट्या आहेत, ज्या विटभट्ट्या ह्या कामगारांचे प्रचंड शोषण करून ठेकेदार आणि मालक यांना गबरगंड करत आल्या आहेत. या राख माफियांचं राज्य केवळ गुंडगिरीपुरतं मर्यादित नाही. त्यांच्या छत्रछायेत अधिकारीही पोसले जात आहेत. पोलीस, महसूल विभाग या काळ्या व्यवसायाचे हितसंबंधी भागीदार झाले आहेत. त्यामुळेच संतोष देशमुख यांचा खून झाल्यानंतर कारवाईला विलंब होतांना पाहायला मिळाला. सीआयडी आणि एसआयटीचा हळूहळू चालणारा तपास संशयास्पद होता. जेव्हा बीडसह राज्यभरातून संतोष देशमुख हत्या प्रकरणात आवाज उठला तेव्हा या गुन्ह्याचा तपास जलद गतीने सुरू झाला. आज बीडमध्ये जे काही सुरू आहे, ते राजकीय आश्रयातून पोसलेले एक संघटित गुन्हेगारीचं साम्राज्य आहे.

या अनेक टोळ्यांपैकी धनंजय मुंडे पुरस्कृत एका प्रमुख टोळीचा म्होरक्या म्हणजे वाल्मिक कराड असल्याचे सर्वज्ञात झाले आहे. तो कोणत्याही निविदा प्रक्रियेला स्वत:च्या तालावर नाचवतो. टेंडर कुणालाही मिळो, अखेर राखेचा व्यापार त्याच्या हाताखालीच होतो. त्याच्या एजंटांना आलिशान गाड्या, महागडे कपडे, आणि शस्त्रास्त्रांचा सर्रास वापर यात काही विशेष वाटत नाही. जो विरोध करेल, तो गाडला जाईल हे सूत्र लागू केले जाते. हे सगळं एवढ्यावरच थांबत नाही. राख माफियांनी आता इतर क्षेत्रांतही प्रवेश केला आहे. बीडमध्ये नव्याने येणाऱ्या पवनऊर्जा कंपन्यांच्या अधिकाऱ्यांना धमक्या देणं, त्यांचं अपहरण करणं, किंवा त्यांना खंडणीसाठी मारहाण करणं ही नवी पद्धत सुरू झाली आहे. प्रशासनाची या गुन्हेगारी टोळ्यांसोबत शरणागती नाही तर हातमिळवणी आहे, हे स्पष्टपणे दिसून येत आहे.

हेच अर्थकारण भंगाराच्या बाबतीत अधिक गुंतागुंतीचे आणि भ्रष्ट स्वरूपाचे आहे. औष्णिक प्रकल्पामध्ये वापरली जाणारी लोखंडी सामग्री, यंत्रसामग्रीचे खराब झालेले भाग आणि कोळसा वाहतूक करणाऱ्या गाड्यांचे स्क्रॅप या सर्वांचा मोठ्या प्रमाणावर काळाबाजार केला जातो. हे भंगार लिलावाच्या नावाखाली विकले जात असले, तरी प्रत्यक्षात हा व्यवहार आतूनच ठरवलेला असतो. कोणत्या टोळीला हे भंगार मिळणार आहे, ते आधीच निश्चित केलेले असते. सरकारी अधिकाऱ्यांना मोठ्या रककमांची लाच देऊन या व्यवहाराला

पान 4 वर

# सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण

पान 3 वरून

कायदेशीर रूप दिले जाते. अशा व्यवहाराला अधिकारी नकार देत असतील तर प्रचंड मारहाण आणि सरळ अपहरण केले जाते. यातून जी दहशत उभी राहते त्यामुळे कोणताच अधिकारी हा विरोधात जात नाही, उलट जमेल तर काही 'मलाई' मेहरबानी म्हणून माफिया टोळ्याकडून आपल्या पदरात पाडून घेतो.

बीड जिल्ह्यात माफिया आणि गुंडगिरी हे केवळ काही टोळ्यांपुरते मर्यादित राहिलेले नाहीत, तर हे संपूर्ण यंत्रणेत खोलवर रुजले आहे. सरपंच संतोष देशमुख यांची हत्या हे त्याचे ताजे उदाहरण आहे. पवनचक्की कंपन्यांकडून घेण्यात येणाऱ्या खंडणीच्या आड येतो म्हणून त्यांना ठार करण्यात आले. या हत्येनंतर प्रशासनाने जो काढता पाय घेतला, ते पाहून हे स्पष्ट झाले की, माफियांचे राजकीय लागेबांधे किती मजबूत आहेत.

हे सर्व केवळ वरवर पाहता गुन्हेगारीच्या वाढलेल्या प्रभावाचे परिणाम जरी वाटत असतील तरी, हे सर्व राजकीय वर्चस्व, आर्थिक हितसंबंध, यातून उभ्या असलेल्या नफा केंद्रित भांडवली व्यवस्थेच्या अक्राळ–विक्राळ अपरिहार्य परिणामाचे प्रतिबिंब आहे. जेव्हा काही मूठभर लोक कायदा आणि दहशतीने संपूर्ण आर्थिक साधनांवर ताबा मिळवतात, तेव्हा त्याचे संरक्षण करण्यासाठी "कायदेशीर किंवा बेकायदेशीर" गुन्हेगारीचा वापर अपरिहार्य होतो. राख आणि भंगाराच्या माध्यमातून सुरू असलेल्या दहशत आणि गुन्हेगारीचे हेच वास्तव आहे. बीड जिल्ह्यात सुरू असलेली दहशत ही केवळ गुन्हेगारी टोळ्यांची नाही, तर ही भ्रष्ट राजकीय आणि भांडवली व्यवस्थेची दहशत आहे.

## बीड जिल्ह्यात अवैध शस्त्रांचा सुळसुळाट : दहशत, तस्करी आणि 'स्टेटस सिम्बॉल' ची गुन्हेगारी संस्कृती

बीड जिल्ह्यात अवैध शस्त्रांचा सुळसुळाट आणि तस्करीचे जाळे गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात भयावह स्वरूपात वाढले आहे. सप्टेंबर 2023 मध्ये घडलेल्या तीन प्रमुख घटनांनी ही समस्या पुन्हा चर्चेत आली. 5 सप्टेंबर रोजी करुणा शर्मा यांच्या वाहनाच्या डिकीत पिस्तूल सापडल्याने चालकाला अटक करण्यात आली. हे प्रकरण राज्यभर चर्चेत असतानाच 9 सप्टेंबरला बीडच्या पेठ भागात दोन टोळ्यांच्या वादानंतर घटनास्थळालगतच्या नाल्यात गावठी बनावटीचे बेवारस पिस्तूल आढळले, तर 20 सप्टेंबरला गेवराई तालुक्यातील वडगाव ढोक येथे दोन जणांना अवैध पिस्तूलसह पकडले. या घटनांतून दिसून येते की, बीड जिल्ह्यात अवैध शस्त्रांचा मोठ्या प्रमाणावर प्रसार झाला असून, विविध ठिकाणी वाहनाच्या डिकीत, नाल्यांत आणि इतर अनपेक्षित ठिकाणी पिस्तूलसारखी घातक शस्त्रे आढळून येत आहेत. स्पष्ट आहे की येथे शस्त्रास्त्रांचा धंदा जोरात आहे.

मागील काही महिन्यांत अवैध शस्त्रांवरील कारवाईच्या घटनांकडे पाहता असे दिसून येते की, 2020 साली 30 कारवाया झाल्या होत्या, तर 2021 मध्ये ही संख्या 6 वर आली. 2023 पर्यंत बीडमध्ये 26 गावठी कट्टे जप्त करण्यात आले, तर बीडसह मराठवाड्यातील नांदेड (44), जालना (16), धाराशिव (13), लातूर (8), हिंगोली (11), परभणी (6), छ. संभाजी नगर ग्रामीण (7) या जिल्ह्यांत या शस्त्रांचा वापर वाढत आहे. या अवैध शस्त्रांच्या तस्करीचा उगम बाहेरील राज्यांमध्ये, उत्तर प्रदेश, बिहार आणि मध्य प्रदेश (इंदौर) असल्याचे आणि रेल्वे मार्गाने ही शस्त्रे मराठवाड्यात पोहोचतात असे बोलले जाते. काही शस्त्रे स्थानिक स्तरावर दुर्गम भागातील लोहार-कारागीर बनवत असल्याची शक्यता आहे. वीस ते पंचवीस हजारांत सहज उपलब्ध होणाऱ्या या शस्त्रांचा वापर खंडणी, दहशत, हत्या यासाठी केला जातो. अलिकडे तरुणांमध्ये 'स्टेटस सिम्बॉल' म्हणून पिस्तुलाचे आकर्षण वाढले आहे. अनेक तरुण पिस्तूल बाळगणे प्रतिष्ठेचे लक्षण समजतात. त्यामुळे स्टेटस सिम्बॉल म्हणून पिस्तूल बाळगण्याची हौस तरुणाईत दिसून येते. यामुळे पिस्तूलसह फोटो काढणे, वाढदिवशी तलवारीने केक कापणे आणि सोशल मीडियावर ते चमकवणे हे युवकांमध्ये नवीन फॅड बनले आहे.

प्रशासनाच्या माहितीनुसार, बीडमध्ये 1,281 पिस्तूल परवानाधारक आहेत. यापैकी 245 पिस्तूलधारकांवर अगोदरच गंभीर गुन्ह्यांची नोंद असूनही त्यांना परवाने देण्यात आले आहेत. पिस्तूल मिळविण्यासाठी जे नवीन अर्ज आले आहेत, त्यापैकी 295 अर्ज फेटाळण्यात आले असून त्यात परळी तालुक्यातील 55 अर्जांसह इतर प्रकरणे प्रलंबित आहेत. पोलिस यंत्रणेला 'दहशतीमुळे' कारवाई करताना अडचण येते, तर गुन्हेगारी टोळ्यांना राजकीय संरक्षण मिळाल्याचे आरोप आहेत. यामुळे दहशत, गुंडगिरी आणि टोळीशाही वाढत आहे. बीड आणि मराठवाड्यात अवैध शस्त्रांची मुळे खोलवर रुजलेली असल्याने, या संपूर्ण व्यवस्थेच्या मुळाशी राजकीय हितसंबंध आणि लागेबांधे असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. खंडणी, दहशत आणि इतर गुन्ह्यांसाठी गावठी कट्ट्यांची मागणी वाढल्याने त्यांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो.

## पवनचक्की प्रकल्प व्यवसाय – दहशत आणि खंडणीचे नवीन क्षेत्र

बीड जिल्ह्यात बालाघाट डोंगराळ भागात अनुकूल वातावरण असल्यामुळे अनेक पवनचक्की प्रकल्प आपला व्यवसाय घेऊन तिथे येत आहेत. पवनचक्की विस्ताराचे जाळे इथे पसरवत आहेत. ज्यात प्रामुख्याने आष्टी आणि गेवराई तालुक्यात पवनचक्की प्रकल्पाच्या भागात चार मोठ्या कंपन्या कार्यरत आहेत. आता या कंपन्यांनी आपला मोर्चा केज तालुक्यात देखील नव्याने वळवला आहे. पवनचक्की प्रकल्प उभारणीकरिता मोठ्या प्रमाणावर जमिनीची आवश्यकता असते. त्यासाठी सर्वच भांडवली राजकीय पक्षांच्या आणि पर्यायाने स्थानिक स्तरावर सत्ता आणि राजकीय आश्रय घेतलेल्या गुन्हेगारी टोळ्यांच्या दहशतीखालील नेत्यांच्या किंवा त्यांच्या निकटवर्तीयांच्या मध्यस्थीत जमिनी मिळवल्या जातात.

जमिनी मिळवण्याची ही प्रक्रिया प्रचंड दहशतीखाली चालवली जाते. ज्यात शेतकरी आणि जमीनमालक यांच्यासमोर 'जीव की जमीन' एवढाच पर्याय शिल्लक राहतो. ज्या शेतमालकाने आणि शेतकऱ्याने जमिनी देण्यास विरोध केला, त्यांना मारहाण, अपहरण आणि दहशतीखाली जीवन जगावे लागते. अनेक वेळा ही दहशत निर्घृण हत्यांपर्यंत जाते. अशा गुन्ह्यांविरोधात पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली, तर अजून जास्त दहशत निर्माण केली जाते. जे जिवंत आहेत त्यांच्या कुटुंबियांना पुन्हा मारहाण, जीवघेणे हल्ले, घरातील महिलांची छेडछाड, बलात्कार आणि हत्येसारखे गुन्हे घडवून आणले जातात. जे जमिनीचे मालक आणि शेतकरी दहशतीला घाबरून जमिनी विकण्यास तयार होतात, त्यांना खरेदी-विक्रीच्या व्यवहारातून एकूण रकमेच्या फक्त 30 टक्क्यांपेक्षा कमी रक्कम मिळते, तर उर्वरित 70 टक्के रक्कम गुंडांद्वारे लोकप्रतिनिधींपर्यंत पोहोचते. असे आरोप स्थानिक आणि पीडितांनी अनेक वेळा केले आहेत.

यानंतर पवनचक्की प्रकल्प उभारणीचे काम सुरू होते. यासाठी लागणाऱ्या मजुरांची भरती ही याच गुन्हेगारी टोळीतील लोकांमार्फत करणे भाग असते. अन्यथा, जमिनी मिळवल्या, पण काम कसे करणार? हा प्रश्न प्रकल्प अधिकाऱ्यांसमोर उभा असतो. त्यामुळे कंत्राटे देखील दहशत माजवूनच मिळवली जातात. पुढे, जमिनी मिळवल्या, कंत्राटे मिळाली, पण प्रकल्प सुरू राहण्यासाठी नियमित खंडणी द्यावीच लागते. जर नियमित खंडणी द्यायला नकार दिला, तर अनेक वेळा प्रकल्पाचे काम बंद पाडले जाते, प्रकल्प अधिकाऱ्यांना धमकावले जाते, मारहाण केली जाते. काही वेळा तर प्रकल्प अधिकाऱ्यांचे अपहरण केले जाते आणि खंडणी मिळेपर्यंत त्यांची सुटका केली जात नाही.

केज तालुक्यातील मस्साजोग गावातील परिसरात "आवादा पवनचक्की प्रकल्प" सुरू आहे. इथेही वाल्मिकी कराड यांनी गुन्हेगारी टोळक्यांच्या माध्यमातून दहशत माजवत दोन कोटी रुपयांची मागणी केली होती. ही मागणी सहा वेळा करण्यात आली होती, परंतु कंपनीने या मागणीला दाद दिली नाही. हे पाहून वाल्मिकी कराड यांनी निवडणूक संपताच केज तालुका गाठून खंडणीसाठी त्रास देण्यास सुरुवात केली, अशी माहिती आवादा कंपनीचे प्रकल्प अधिकारी सुनील शिंदे यांनी आरोपपत्रात दाखल केलेल्या जबाबात दिली आहे.

"2 कोटी रुपयांची खंडणी द्या, नाहीतर सुदर्शन सांगतो तसे काम आहे त्या परिस्थितीत बंद करा!" असे म्हणत आवादा कंपनीच्या अधिकाऱ्यांना विष्णु चाटे यांच्या फोनवरून धमक्या दिल्या गेल्या. तसेच, मस्साजोग येथे आवादा कंपनीच्या आवारात सुरक्षा रक्षक असलेल्या युवकाला मारहाण झाली. ही घटना पाहण्यासाठी गेलेल्या सरपंच संतोष देशमुख यांना सुदर्शन घुले याने "तुला मारून टाकतो!" अशी धमकी दिली होती. त्यानंतर काही दिवसांतच संतोष देशमुख यांचे अपहरण करून अमानुष छळ करत निर्घृण हत्या करण्यात आली. ही घटना वाल्मिकी कराड यांनी व्हिडिओ कॉलवर पाहत सूचना देत असल्याचे आरोप आहेत. या संदर्भातील पुरावे व्हिडिओ आणि फोटो न्यायालयात सादर करण्यात आले आहेत. संतोष देशमुख यांना अमानुषपणे मारहाण करत असतानाचे फोटो आणि पुरावे समाजमाध्यमांवर प्रसारित झाले आहेत.

## बीड मधील वाळू माफियांची दहशत: राजकीय वरदहस्ताने बळावलेले साम्राज्य

नदी पात्रातून अवैध वाळू उपसा ही समस्या संपूर्ण महाराष्ट्रभर देशभरातील उघड सत्य आहे, मात्र बीड जिल्ह्यात ती अधिकच अक्राळ-विक्राळ संघटित गुन्हेगारीच्या गंभीर स्वरूपात पुढे येत आहे. बीडमधील गोदावरी आणि तिच्या उपनद्यांमधून मोठ्या प्रमाणावर वाळू उपसली जाते. हा धंदा केवळ काही मोजक्या शक्तिशाली लोकांच्या हातात केंद्रित झाला असून, यातून केवळ अवैध खनन होत नाही, तर संपूर्ण जिल्ह्यात राजकीय वरदहस्त असलेल्या गुन्हेगारी टोळ्यांनी दहशत माजवली आहे.

बीड जिल्ह्यातील वाळू माफियांची दहशत ही केवळ गुन्हेगारीची कथा नाही, तर राजकारण, प्रशासन आणि भ्रष्टाचाराच्या गाठीतून निर्माण झालेल्या गुन्हेगारी व्यवस्थेची हकीकत आहे. येथे गोदावरी नदीच्या पात्रातून उपसल्या जाणाऱ्या वाळूच्या प्रवाहासारखीच गुन्हेगारीची पाइपलाइनही वाहते. ही पाइपलाइन राजकीय नेत्यांच्या हितसंबंधांना पुरवठा करते, भ्रष्ट पोलिसांशी संगनमत करते आणि प्रशासनाच्या कारवाईला कुचकामी करून टाकते. जिल्हाधिकाऱ्यांच्या गाडीवर झालेला हल्ला, तहसीलदारांना दिलेल्या जीव मारण्याच्या धमक्या, शेतकऱ्यांच्या रक्ताने भिजलेले शेत, आणि पोलिस ठाण्यातील "सहकार्य" या सर्वांनी बीडला एका अशा साम्राज्यात रूपांतरित केले आहे, जिथे कायदा हा फक्त कागदावरचा शब्द आहे.

वाळू माफियांच्या या साम्राज्याचा पाया राजकीय आश्रयाने घातलेला आहे. निवडणुकीच्या निधीसाठी माफियांचे काळे पैसे, त्यांच्या ट्रॅक्टरवर चढलेले नेते, आणि प्रकरणे दफन करणाऱ्या प्रशासकीय अधिकाऱ्यांची साखळी यांनी ही व्यवस्था पोखरलेली आहे. 2021 मध्ये जिल्हाधिकाऱ्यांवर झालेल्या हल्ल्यानंतरही, आरोपींना "अपुरा पुरावा" या सबबीखाली सोडण्यात आले, तर 2022 मध्ये गेवराई पोलिसांनी माफियांच्या ट्रॅक्टर्सना फक्त ठाण्यात "पार्क" करून त्यांना पुरावे नष्ट करण्यासाठी वेळ दिला. ही केवळ निष्क्रियता नाही, तर सक्रिय साटेलोटाचा प्रकार असल्याचे दिसून येते.

या साम्राज्याचे म्होरके गुंड नाहीत. ते स्थानिक पुढाऱ्यांचे शस्त्रास्त्र आहेत. एखाद्या शेतकऱ्याला ट्रॅक्टरखाली चिरडणे किंवा वकिलाच्या घरावर गोळ्या झाडणे हे त्यांच्या सत्तेचे प्रदर्शन आहे. 2019 मध्ये परळी तालुक्यातील सामाजिक कार्यकर्त्याचा संशयास्पद मृत्यू, किंवा 2023 मध्ये पाडळशिंगी गावाजवळ जिल्हाधिकाऱ्यांच्या गाडीवर झालेला हल्ला यातून एकच सूत्र दिसते—जो विरोध करेल, त्याला ठार करू! ही धमकी केवळ व्यक्तींवर नसते, तर संपूर्ण व्यवस्थेवर असते.

प्रशासन या साम्राज्याचा एक भाग बनले आहे. कधी "कारवाई"च्या नाटकासाठी ट्रॅक्टर जप्त केले जातात, तर कधी निलंबित केलेले पोलिस अधिकारी पुन्हा "सुधारून" ड्युटीवर परततात. 2022 मध्ये निलंबित झालेले

पान 10 वर

## क्रांतिकारी कामगार शिक्षण मालिका - 11

# स्वर्ण असमर्थित कागदी पैशाचे (फियेट पैसा) विशिष्ट मार्क्सवादी नियम. अध्याय-10 (परिशिष्ट)

✎ **अभिनव**

आपण हे बघितले की कशाप्रकारे मार्क्सने माल उत्पादक व्यवस्थेमध्ये पैशाचा उगम आणि विकास आणि त्याला संचालित करणारे नियम शोधून काढले. माल उत्पादनाच्या विकसित होण्यासोबतच पैसा निर्माण होतो हे मार्क्सने दाखवून दिले. जसजसे अधिकाधिक श्रमाची उत्पादने माल बनत जातात तसतसे त्यांचा विनिमय अधिक गुंतागुंतीचा होत जातो. उपयोग-मूल्य आणि विनिमय मूल्य यांच्यातील अंतर्विरोध अधिक तीव्र होत जातो. याच प्रक्रियेत एखादा विशिष्ट माल (जो समाजातील बहुसंख्य लोकांसाठी उपयुक्त असतो) सार्वत्रिक समतुल्याची भूमिका ग्रहण करत जातो. आपण याच अध्यायात पाहिले की, जगाच्या विविध भागांमध्ये माल उत्पादनाच्या विकासाच्या प्रक्रियेत ही भूमिका कधी गुरे, कधी तंबाखू, कधी गाई, कधी कवड्या, कधी मीठ, तर कधी एखाद्या अन्य मालाने बजावली. यासोबतच मूल्याच्या पैसा-स्वरूपाचा विकास झाला जो स्वतः पुढे अनेक टप्प्यांमधून जात मौल्यवान धातूंना मुद्रा-माल म्हणून स्वीकृत करण्यासोबत संपन्न झाला.

हे का घडले तेसुद्धा आपण बघितले. हे घडण्याचे कारण असे की सोने आणि चांदी टिकाऊ होते, त्यांना अनेक लहान-लहान तुकड्यांमध्ये विभागले जाऊ शकत होते आणि ते जगभरात एकसमान गुणवत्तेत आढळते. आपण पाहिले की पैशाच्या अभिसरणामुळे प्रत्येक प्रकारच्या पैशाचे अभौतिकीकरण (dematerialization) होते. उदाहरणार्थ, एक डेनेरियम (d.) पूर्वी ब्रिटनमध्ये 1/240 औंस सोन्याचे प्रतिनिधित्व करत असे. परंतु पैशाच्या अभिसरणाच्या प्रक्रियेत हे एक डेनेरियम नाणे जीर्ण होते आणि त्याचे वजन जे आधी 1/240 औंस सोन्याचे प्रतिनिधित्व करत होते, ते आता तेवढे राहिलेले नसते आणि त्यातील सोने/चांदीचे प्रमाण कमी होते. परंतु तरीही मालांच्या अभिसरणाचे माध्यम म्हणून पूर्वीप्रमाणेच 1/240 औंस सोन्याच्या मूल्याच्या नाण्याच्या रूपातच त्याचे अभिसरण सुरु राहते. त्याचा पुढचा टप्पा म्हणजे इतर स्वस्त धातूंची नाणी सोन्याच्या किंवा चांदीच्या नाण्यांचे प्रतिनिधी किंवा प्रतीके म्हणून चलनात येतात. आणि शेवटी, ज्याअर्थी सोने किंवा चांदीच्या नाण्यांना स्वतः भौतिकरित्या उपस्थित राहून अभिसरणाच्या माध्यमाची भूमिका बजावावी लागत नाही, त्यामुळे हेच कार्य कागदी पैशाद्वारे सुद्धा शक्य होते, अट फक्त ही की त्या कागदी पैशाला राज्यसत्तेद्वारे कायदेशीर मान्यता दिलेली असेल आणि अशा प्रकारे त्याला सामाजिक मान्यता प्राप्त असेल. हे सांगण्याची गरज नाही की पैशाला तयार करण्याचे काम राज्यसत्तेने केले नाही, मात्र विकासाच्या एका विशिष्ट टप्प्यावर राज्यसत्तेने ते स्वीकारले, आणि किंमतीचे मानक निश्चित करण्याची आणि त्यास कायदेशीर मान्यता प्रदान करण्याची भूमिका तिने बजावली. पैसा तर माल उत्पादन आणि विनिमयाच्या विकासाच्या प्रक्रियेत नैसर्गिकरित्या उद्भवतो. पैशाच्या इतिहासात राज्यसत्तेचा हस्तक्षेप फार नंतरच होतो.

इथपर्यंतच्या प्रक्रियेबद्दल आपण वर्तमान प्रकरणामध्ये चर्चा केली होती. आतापर्यंत आपण स्वर्ण-समर्थित मूल्याची प्रतीके किंवा स्वर्ण-पैशाच्या प्रतिनिधी असलेल्या स्वरूपांबद्दल (म्हणजे, इतर धातूंची नाणी, परिवर्तनीय कागदी पैसा इ.) बोलत आहोत. शुद्ध स्वरूपातील फियेट पैसा, म्हणजे असा पैसा ज्याला सोन्याचे समर्थन नाही आणि जिथे सोन्याने औपचारिक व अधिकृतपणे मूल्याच्या मापाची भूमिका बजावणे थांबवले आहे, त्याबद्दल आपण सध्याच्या परिशिष्टात पुढे चर्चा करूया.

स्वर्ण-समर्थित कागदी पैसा देखील दोन प्रकारचा असू शकतो: सोन्यामध्ये **परिवर्तनीय (convertible) आणि सोन्यामध्ये "अपरिवर्तनीय" (inconvertible)**.

सोन्यामध्ये परिवर्तनीय कागदी पैसा तो असतो ज्याचा मौद्रिक प्राधिकरणाच्या कार्यालयाच्या (जसे की केंद्रीय बँक, इ.) खिडकीत राज्यसत्तेने ठरवलेल्या विनिमय दराने सोन्यासोबत विनिमय केला जाऊ शकतो. ब्रिटनमध्ये पहिल्यांदा 1816 मध्ये सरकारने स्वर्ण-पैशाच्या परिवर्तनीय प्रतिकांना अभिसरणात आणले. पुढील 60 वर्षांमध्ये प्रथम फ्रान्समध्ये आणि नंतर जर्मनी तसेच अमेरिकेत स्वर्ण-पैशाच्या परिवर्तनीय प्रतिकांना राज्यसत्तांनी अभिसरणात टाकले. यानंतर जे देश भांडवली उत्पादन व्यवस्थेच्या युगात प्रवेश करते झाले, तस-तसे त्यांच्यामध्ये परिवर्तनीय कागदी पैसे प्रचलित झाले.

**एका निश्चित विनिमय दराने (fixed exchange rate) या प्रतीकांचा सोन्यासोबत विनिमय होण्याचा काय अर्थ होता?** म्हणजे, जर राज्यसत्तेने पैसा म्हणजे रुपयाचा, पैसा-माल म्हणजे सोने किंवा चांदीसोबत विनिमयाचा दर अशा पद्धतीने ठरवला आहे की 1000 रुपयाचा विनिमय 1 ग्रॅम सोन्यासोबत होईल, तर कोणतीही व्यक्ती ज्याच्याकडे कागदी पैशामध्ये 10,000 रुपये आहेत तो सरकारच्या मौद्रिक प्राधिकरणाच्या कार्यालयाच्या खिडकीवर 10 ग्रॅम सोने प्राप्त करू शकेल. पण निश्चित विनिमय दराचा अर्थ काय? काय तो कधीच बदलत नाही? असे नाही. या निश्चित दराचा अर्थ असा नाही की राज्यसत्ता याला कधीही बदलत नाही. खरं तर, भांडवलशाही राज्यसत्ता सोन्याच्या उत्पादनाच्या क्षेत्रातील उत्पादकता आणि सर्वसाधारणपणे संपूर्ण अर्थव्यवस्थेची उत्पादकता यांच्यातील बदलत्या संबंधांनुसार नियमित अंतराने त्यात बदल करतेच. म्हणजेच जेव्हा सोन्यामध्ये बदलू शकणाऱ्या कागदी पैशाचा काळ होता तेव्हाही राज्यसत्तेद्वारे ठरवलेला पैसा व पैसा-माल यांचा विनिमय दर कायमस्वरूपी स्थिर होता आणि तो अपरिवर्तनीय होता असे नाही. त्यामुळे 'निश्चित विनिमय दर' हा येथे एक भ्रामक शब्द आहे. त्याकाळात सुद्धा पैसा व पैसा-मालाच्या विनिमयाचा दर आंशिकरित्या लवचिकच असायचा कारण राज्यसत्ता वेळोवेळी त्यात बदल करायची. त्यामुळे परिवर्तनीय कागदी पैशाच्या काळातही निश्चित विनिमय दराच्या जागी **आंशिकरित्या लवचिक विनिमय दराबाबत (partially-flexible exchange rate) बोलणे** जास्त योग्य होईल. फक्त एकच गोष्ट विशेष होती: ज्याअर्थी त्यावेळी सोन्याची मुद्रा-किंमत (monetary price of gold) किंवा किमतीचे मानक, म्हणजे पैशासोबत सोन्याचा विनिमय दर राज्यसत्तेद्वारा ठराविक कालावधीसाठी निर्धारित केला जात होता, त्यामुळे सोन्याचे उत्पादन करणारे क्षेत्र नफ्याच्या सरासरीकरणाच्या प्रक्रियेत सहभागी होत नव्हते, परंतु इतर सर्व उत्पादन क्षेत्रातील नफ्याचे दर स्पर्धेच्या माध्यमातून सोन्याच्या उत्पादन क्षेत्रातील नफ्याच्या दरानुसार समायोजित होत होते. याविषयी आपण पुढील अध्यायांमध्ये तपशीलवार जाणून घेऊ, आत्ता केवळ थोडक्यात समजून घेऊ.

असे समजा की सोने आणि पैशाचा निश्चित विनिमय दर सरकारने निर्धारित केला आहे. अशा परिस्थितीत, सोन्याच्या बाजारातील किमती सोन्याच्या उत्पादनाच्या क्षेत्रात असलेला नफ्याचा दर आणि इतर मालांच्या उत्पादनाच्या क्षेत्रातील सरासरी नफ्याचा दर यांच्यातील तफावतीच्या परिणामस्वरूप स्वतः बदलू शकत नाही, कारण सोन्याची मुद्रा-किंमत दिलेल्या कालावधीत निश्चित केलेली आहे. त्यामुळे सोन्याच्या उत्पादन क्षेत्राचा नफ्याचा दर हा उर्वरित अर्थव्यवस्थेच्या सरासरी नफ्याच्या दरासोबत किमतीतील बदलांद्वारे संतुलित होऊ शकत नाही, तर केवळ सोन्याच्या उत्पादनाच्या खर्चातील बदलांच्या माध्यमातूनच संतुलित होऊ शकतो. हे तेव्हाच घडू शकते जेव्हा इतर मालांच्या किमतीत बदल होतात कारण सोन्याची बाजारातील किंमत राज्यसत्तेद्वारे एका निश्चित पातळीवर निर्धारित केलेली आहे. समजा सोन्याव्यतिरिक्त एकच माल आहे, कापूस. असे गृहीत धरूया की दोन्ही माल काही प्रमाणात एकमेकांच्या उत्पादन प्रक्रियेत उत्पादनाचे साधन म्हणून वापरल्या जातात. सुरुवातीच्या परिस्थितीत, असे गृहीत धरा की सोने उत्पादन क्षेत्र आणि कापूस उत्पादन क्षेत्रातील नफ्याचे दर समान आहेत. सामान्यतः किमती वाढल्या तर कापसाचे भाव वाढतील जेव्हाकी सोन्याच्या बाजारातील किमतींवर सुद्धा वाढण्याचा दबाव तयार होतो, परंतु त्या वाढू शकत नाहीत कारण पैशासोबत (डॉलर, पौंड, रुपया इ.) मुद्रा-माल म्हणजे सोन्याचा विनिमय दर निश्चित आहे. किमतीतील वाढीमुळे कापूस उत्पादन क्षेत्रातील नफ्याचा दरसुद्धा वाढेल, जेव्हाकी सोन्याच्या उत्पादनाचा खर्च वाढेल (कारण कापूस उत्पादनाचे साधन म्हणून सोन्याच्या उत्पादनात वापर केला जात असल्याने) आणि सोने उत्पादन क्षेत्रातील नफ्याचा दर घटेल. अशा स्थितीत भांडवलाचा प्रवाह सोन्याच्या उत्पादन क्षेत्रातून दुसऱ्या मालाच्या म्हणजे कापसाच्या उत्पादन क्षेत्राकडे होईल, जेथे पुरवठा वाढेल आणि परिणामी किमती घसरतील. यामुळे सोन्याच्या उत्पादन क्षेत्रातील खर्च कमी होईल आणि नफ्याचा दर वाढेल, मात्र त्याची किंमत सरकारद्वारे निश्चित केलेली असल्यामुळे त्याच पातळीवर राहील. ही प्रक्रिया कापसाची किंमत परत अशा पातळीवर आणेल ज्यामुळे एका उलथापालथीने भरलेल्या प्रक्रियेत दोन्ही क्षेत्रांमध्ये नफ्याच्या दराचे सरासरीकरण होईल. अशाप्रकारे, सोन्याचा आधार असलेल्या परिवर्तनीय कागदी पैशाच्या युगातही, सर्व मालांच्या सापेक्षिक किंमती (relative prices) नेहमीच सामाजिक मूल्य आणि त्याच्या अवतीभवती फिरणाऱ्या उत्पादनाच्या किमतींद्वारेच निर्धारित होतील, ज्या नफ्याच्या दरांच्या सरासरीकरणातून तयार होतात.

*आम्हाला माहित आहे की आम्ही अद्याप नफा, नफ्याचे दर, नफ्याच्या दरांचे सरासरीकरण यांच्या व्याख्यांबद्दल बोललेलो नाही. पुढे आम्ही यावर तपशीलवार चर्चा केल्यानंतर तुम्ही परत येऊन हे परिशिष्ट पुन्हा वाचू शकता. आता आपण पुढे जाऊया.*

भांडवली उत्पादनामध्ये एक असा कालावधी अपरिहार्यपणे येतो जेव्हा उत्पादन आणि भांडवलाचा संचय अशा टप्प्यावर पोहोचतो जेव्हा सोन्याची मुद्रा किंवा सोन्यामध्ये परिवर्तनीय अन्य धातूंची नाणी किंवा कागदी पैसा यांनी निर्माण झालेल्या मर्यादा एक अडथळा बनून जातात. याचे कारण असे आहे की राज्यसत्ता आणि त्याचे मौद्रिक प्राधिकरण त्यांच्या सोन्याच्या साठ्यापेक्षा अधिक प्रमाणात इतर परिवर्तनीय मौद्रिक प्रतीके जसे की कागदी पैसे जारी करू शकत नाही, कारण राज्यसत्ता या प्रतीकांचा वास्तविक सोन्यासोबत निश्चित विनिमय दराने विनिमय करण्याची हमी देते, ज्याला पूर्ण केले नाही तर ही मौद्रिक प्रतीके समाजात स्वीकारलीच जाणार नाहीत. भांडवलशाही समाजामध्ये होणाऱ्या एकूण उत्पादनाच्या श्रम-मूल्याच्या बरोबरीचे श्रम-मूल्य असणाऱ्या सोन्याचे उत्पादन चालू ठेवणे अशक्य आहे. आम्ही वर नमूद केल्याप्रमाणे, परिवर्तनीय कागदी पैशाच्या युगात मध्यवर्ती बँक किंवा राज्यसत्तेचे मौद्रिक प्राधिकरण एका मर्यादेपर्यंतच कागदी पैसा जारी करू शकते, जे तिच्या सोन्याच्या साठ्यावर अवलंबून असते. ही धातूची मर्यादा भांडवली उत्पादनात अपरिहार्यपणे अडथळा बनते. रिकार्डोने कागदी नोटांच्या अभिसरणाला सैद्धांतिकदृष्ट्या बँकांच्या सोन्याच्या साठ्यापर्यंत मर्यादित करण्यावर मार्क्सने स्पष्टपणे टीका केली. त्याच वेळी, मार्क्सने असेही म्हटले की भांडवली अर्थव्यवस्थेत कागदी नोटांचे बँकेच्या सोन्याच्या साठ्यापासून स्वतंत्र असण्याचा अर्थ असा नाही की बँक मनमर्जी पद्धतीने कितीही प्रमाणात कागदी नोटा जारी करू शकते. हे प्रमाण प्रत्यक्षात दोन घटकांवर अवलंबून असते: पहिले, मालांची एकूण किंमत, पैशाचा वेग आणि पैशाचे मूल्य आणि दुसरे, भांडवली अर्थव्यवस्थेतील रोख रकमेची मागणी जी प्रामुख्याने गुंतवणूक करणाऱ्या भांडवलदारांकडून येते. इतर ग्राहकांकडून उद्भवणारी प्रभावी मागणी ही मूलतः आणि मुख्यतः भांडवलदारांद्वारे केल्या जाणाऱ्या गुंतवणुकीचेच एक कार्य आहे, म्हणून त्याची स्वतंत्रपणे गणना करणे आवश्यक नाही.

तथापि, ज्याअर्थी विस्तारित पुनरुत्पादन हा भांडवली अर्थव्यवस्थेचा सामान्य नियम आहे, त्यामुळे मालांचे अभिसरण आणि निव्वळ नफ्याचे पैसा-स्वरूपात वास्तविकीकरण आणि नफ्याच्या अपेक्षेच्या आधारावर मुख्यतः गुंतवणुकीसाठी कर्जाची मागणी पैशाचे प्रमाण निर्धारित करते. स्वाभाविकच, हे

पान 6 वर

# क्रांतिकारी कामगार शिक्षण मालिका - 11

पान 5 वरून

काही पूर्वनिश्चित प्रमाण नसते, तर भांडवली अर्थव्यवस्थेमधील एका उलथापालथीने भरलेल्या प्रक्रियेत ते निर्धारित होत राहते आणि जारी केलेला पैसा या इष्ट प्रमाणापेक्षा कमी आहे की जास्त हे नंतरच कळू शकते. सामान्यतः, कोणत्याही दिलेल्या क्षणी अभिसरण आणि गुंतवणुकीच्या गरजांच्या तुलनेत प्रत्येक प्रकारचा पैसा कधी जास्त तर कधी कमी असतो आणि एक प्रक्रिया म्हणून संतुलित होत राहतो.

**भांडवली उत्पादन पद्धतीच्या या गतिशीलतेमुळे सोन्यामध्ये परिवर्तनीय कागदी पैशापासून सोन्यामध्ये "अपरिवर्तनीय" कागदी पैशामध्ये संक्रमण अपरिहार्य होते.** 'अपरिवर्तनीय' हा शब्द भ्रामक आहे कारण कोणत्याही भांडवली अर्थव्यवस्थेत जर पैसा मालांमध्ये (मुद्रा-मालासह) बदलता येत नसेल, तर तो पैशाची भूमिकाच बजावू शकत नाही. तर मग परिवर्तनीय आणि "अपरिवर्तनीय" कागदी पैशात मूलभूत फरक काय आहे? फरक केवळ एवढाच आहे की "अपरिवर्तनीय" कागदी पैशाच्या बाबतीत, राज्यसत्ता तिच्या मौद्रिक प्राधिकरण म्हणजे केंद्रीय बँकेच्या खिडकीवर मुद्रा-माल म्हणजे सोन्याचा विनिमय एखाद्या निश्चित विनिमय दरावर पैशासोबत (म्हणजेच रुपया/डॉलर/पाउंड इ.) करत नाही. सोन्याची बाजारातील किंमत आता निश्चित राहात नाही तर कागदी पैशामध्ये बाजारातील चढउतारांच्या अधीन राहते. आता सोन्याचे उत्पादन करणारे क्षेत्रही नफ्याच्या सरासरीकरणामध्ये भाग घेते आणि त्याची बाजारातील किंमत नफ्याच्या सरासरीकरणाद्वारे निर्मित होणाऱ्या उत्पादनाच्या किंमतींच्या अवतीभवती असते. म्हणजेच, फरक असा आहे की आता सोन्याचा विनिमय कागदी पैशाशी किंवा स्वर्ण-पैशाच्या इतर प्रतिकांशी सरकारद्वारे निर्धारित अंशतः लवचिक विनिमय दरावर होत नाही तर **पूर्णपणे लवचिक विनिमय दराच्या (flexible exchange rate)** आधारावर होतो. परंतु स्वर्ण पैसा अजूनही अधिकृत आणि औपचारिकरित्या मूल्याचे माप आणि किंमतींचे मानक असते आणि "अपरिवर्तनीय" कागदी पैसा जारी केलेल्या प्रमाणानुसार औपचारिकरीत्या सोन्याच्या विशिष्ट प्रमाणाचे प्रतिनिधित्व करत असते. साहजिकच, अशा परिस्थितीत सर्व मालांच्या दोन किंमती बाजारात प्रभावी ठरतात: स्वर्ण पैशात किंमत आणि कागदी पैशात किंमत. जर राज्यसत्ता कागदी पैशाला भांडवली अर्थव्यवस्थेमधील मालांचे अभिसरण व भांडवलाच्या मागणीच्या तुलनेत जास्त प्रमाणात जारी करेल तर स्वर्ण पैशाच्या तुलनेत कागदी पैशाचे अवमूल्यन होईल. परंतु, जसे की मार्क्सने स्वतः निदर्शनास आणले, यामुळे फक्त तसाच फरक पडतो जो राज्यसत्तेद्वारे किंमतींचे मानक म्हणजे पैसा आणि पैसा-मालाच्या विनिमय दराला वेळोवेळी बदलल्यामुळे पडत होता: म्हणजे, तुम्ही 1/240 औंस सोन्याला 1 डेनेरियम म्हणण्याऐवजी आता 2 डेनेरियम म्हणता. तसेच या बदलामुळे सर्व मालांच्या आपसातील सापेक्ष किंमतींमध्येही (relative price) काही फरक पडत नाही. जर आवश्यकतेपेक्षा जास्त कागदी पैसे जारी केले गेले, तर सर्व मालांच्या निरपेक्ष किमती (absolute price) समान दराने वाढतात, परंतु त्यांच्या सापेक्ष किमती अजूनही वास्तवात सामाजिक मूल्याद्वारेच निर्धारित होतात. उदाहरणार्थ, जर 1/240 औंस सोन्याचे उत्पादन होण्यासाठी 5 तास लागतात आणि सोन्याचे एवढे प्रमाण आता कागदी पैशात 1 देनेरियम म्हणून नाही तर 2 देनेरियम म्हणून व्यक्त केले जाते, तर 5 तासांच्या सामाजिक श्रमाच्या मौद्रिक समतुल्य आता 1 ऐवजी 2 देनेरियम असेल, परंतु यामुळे मालांच्या परस्पर विनिमय दरात, म्हणजे त्यांच्या सापेक्ष किंमतींमध्ये कोणताही फरक पडणार नाही. सापेक्ष किमती पूर्वीप्रमाणेच सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रमाचे प्रमाण आणि नफ्याच्या दराच्या सरासरीकरणाने निर्धारित होतात.

**पुढील टप्पा शुद्ध स्वरूपातील फियेट पैसा म्हणजे असा "अपरिवर्तनीय" कागदी पैसा असतो जिथे सोने आता औपचारिक आणि अधिकृतरित्या मूल्याचे माप आणि किंमतींचे मानक राहत नाही.** अशा परिस्थितीत पैशाचे मूल्य कसे ठरवले जाते? या परिस्थितीतही मालांच्या सापेक्ष किंमतींवर काही फरक पडत नाही आणि पूर्वीप्रमाणेच त्या सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रमकाळ (म्हणजे सामाजिक मूल्य) आणि नफ्याच्या दराच्या सरासरीकरणाने (म्हणजे उत्पादनाच्या किंमती) निर्धारित होतात, ज्याबद्दल आपण पुढील अध्यायांमध्ये वाचू. परंतु ज्याअर्थी सोने आता थेट अधिकृतपणे मूल्याचे माप आणि किंमतींचे मानक राहत नाही आणि सोन्याची बाजार किंमत स्वतः फियेट पैशामध्ये उत्पादन, नफ्याचे सरासरीकरण आणि मागणी व पुरवठ्याच्या परिस्थितीनुसार चढ-उतार होते, त्यामुळे स्वर्ण-पैशाच्या सापेक्ष निरपेक्ष किंमती किंवा किंमतींच्या सामान्य पातळीची (general level of prices) कोणतीही साधारण पातळी नसते जी मूल्याचे माप व किंमतींचे मानक म्हणून एखाद्या मुद्रा-मालाशी (म्हणजे सोने किंवा चांदी) बांधलेले असेल. याचे कारण असे की पूर्णपणे फियेट पैसा आता औपचारिकरित्या सोन्याशी बांधलेला नाही. अशा परिस्थितीत, जर राज्यसत्तेने उत्पादनाच्या स्थिती, स्पर्धा आणि नफ्याचे सरासरीकरण आणि स्वतःच्या वित्तीय गरजांनुसार निर्धारित होणाऱ्या सापेक्ष किमती व त्यानुरूप सोन्याच्या प्रमाणाच्या तुलनेत जास्त फियेट पैसे जारी केले, तर एका मर्यादेनंतर निरपेक्ष किंमतींच्या सामान्य स्तरात (general level of prices) वाढ होते. ही मर्यादा काय आहे ते आपण या परिशिष्टाच्या शेवटच्या भागात पाहू.

काय याचा अर्थ असा आहे की फियेट पैशाच्या बाबतीत मार्क्सने प्रतिपादित केलेल्या पैशाच्या नियमांऐवजी रिकार्डो आणि ह्यूमचा पैशाचा परिमाणसिद्धांत लागू होतो, ज्यानुसार पैशाचे मूल्य आणि म्हणूनच किमतींची सामान्य पातळी केवळ पैशाच्या प्रमाणाद्वारे निर्धारित केली जाते? नाही. कारण पैशाचे प्रमाण अजूनही मालांच्या सापेक्ष किंमतींची कोणतीही व्याख्या करू शकत नाही. सोबतच, जारी केला गेलेला संपूर्ण फियेट पैसा, ज्यामध्ये बँकांद्वारे जारी केलेला क्रेडिट पैसाही सामील आहे, अभिसरणात जात नाही. भांडवली अर्थव्यवस्थेत तो प्रामुख्याने दोन स्वरूपात अस्तित्वात असतो. प्रथम, पैशाचे ते प्रमाण जे रोख आणि मूळ ठेवींच्या स्वरूपात बँकांमध्ये अस्तित्वात असते. दुसरे, बँकांनी जारी केलेल्या क्रेडिटमधून उद्भवणारा क्रेडिट पैसा. वास्तवात ठेवी दोन भागात विभागल्या जातात. कारण बँका जमा केलेल्या रकमेच्या आधारे कर्ज देतात आणि अनेकदा त्या कर्जाची रक्कम जमा केलेल्या रकमेपेक्षा कितीतरी जास्त असते. भांडवली उत्पादनामध्ये पतप्रणालीच्या विकासासह बँकिंग भांडवलदाराला हे लक्षात येते की त्याला केवळ जमा ठेवींचे संरक्षक बनण्याची गरज नाही आणि रोख रकमेच्या रोजच्या सरासरी मागणीनुसार तो त्याच्या खात्यामध्ये जमा रकमेच्या अतिरिक्त आणि काहीवेळा त्यापेक्षाही जास्त प्रमाणात कर्ज देऊ शकतो. याला संरक्षण बँकिंगपासून (guardian banking) अंशतः रिझर्व्ह बँकिंगकडे (fractional reserve banking) संक्रमण म्हणतात. परंतु बँकिंगचा मूलभूत नियम असा आहे की प्रत्येक कर्ज स्वतःच एक ठेव तयार करते. समजा बँकेने एखाद्या भांडवलदाराला 1 कोटी रुपयांचे कर्ज दिले तर त्याचा अर्थ त्या भांडवलदाराच्या नावाच्या खात्यावर 1 कोटी रुपये जमा होतात. कर्जाऊ दिलेल्या रकमेच्या आधारे तयार होणारे क्रेडिट उपकरण देखील अर्थव्यवस्थेत अभिसरणाच्या माध्यमाच्या रूपात फिरू शकतात आणि सामान्यतः फिरतात. बँकांमधील ज्या वास्तविक मूळ ठेवी असतात आणि अर्थव्यवस्थेमध्ये जी रोकड मालांच्या अभिसरणामध्ये फिरते त्यालाच 'उच्च शक्तीचा पैसा' (high-powered money) म्हणतात, म्हणजे पैशाचे ते रूप ज्याला केंद्रीय बँकेद्वारे जारी केले जाते. त्याला अर्थव्यवस्थेचा मौद्रिक आधार देखील म्हणतात. याव्यतिरिक्त, अशा ठेवी असतात ज्या बँकांनी दिलेल्या कर्जातून तयार होतात, म्हणजे तो पैसा जो भांडवलाच्या मागणीला प्रतिसाद म्हणून बँकांनी तयार केलेला क्रेडिट पैसा आहे. रोख, रोख रिझर्व्ह (म्हणजे मूळ ठेवी) आणि कर्जाद्वारे तयार झालेल्या ठेवीच भांडवली अर्थव्यवस्थेत पैशाचे संपूर्ण प्रमाण बनवतात. जसे की आपण पाहू शकतो, हे आवश्यक नाही की हे संपूर्ण प्रमाण मालांच्या अभिसरणात लागलेले असेल. जे प्रमाण थेट मालांच्या अभिसरणाचे माध्यम म्हणून काम करते, ते रोख स्वरूपात अस्तित्वात असते, तर उर्वरित रक्कम बँक ठेवींच्या स्वरूपात राखीव स्वरूपात जमा होते. ठेवी आणि रोख रकमेचे प्रमाण मालांच्या अभिसरणाच्या गरजेनुसार बदलत राहते, मात्र यामुळे पैशाच्या एकूण प्रमाणामध्ये नेहमीच बदल होतो असे नाही. त्यातील काही वेगवेगळ्या स्वरूपात जमा (hoarded) होत राहतात आणि काही रोख स्वरूपात मालांच्या अभिसरणाचे काम बजावतात. उदाहरणार्थ, जर बँकांकडे एकूण 15 लाख रुपये राखीव असतील (ज्यात मूळ ठेवी आणि कर्जाद्वारे तयार केलेल्या ठेवींचा समावेश आहे) आणि अर्थव्यवस्थेत रोख स्वरूपात एकूण 5 लाख रुपये असतील आणि एखाद्या व्यक्तीने त्याच्या ठेवींमधून 1 लाख रुपये कुठेतरी परतफेड करण्यासाठी काढले, तर आता बँकांकडे 14 लाख रुपये राखीव असतील, जेव्हाकी मालांच्या अभिसरणाच्या बदललेल्या आवश्यकतेनुसार 6 लाख रुपये रोख असतील. परंतु अर्थव्यवस्थेतील सर्व प्रकारच्या पैशाचे एकूण प्रमाण 20 लाख रुपयेच असेल. हे एकूण प्रमाण मालांच्या अभिसरणाच्या गरजेनुसार आणि भांडवलाच्या मागणीनुसार बदलू शकते, जे स्वतः अर्थव्यवस्थेच्या सरासरी नफ्याच्या दराने निर्धारित केले जाते. जसे की तुम्ही बघू शकता, भांडवलशाही अर्थव्यवस्थेत पैशाचे संपूर्ण प्रमाण मालांच्या अभिसरणात लागलेले नसते. त्यामुळे पैशाचा परिमाण सिद्धांत निरपेक्ष किंमती आणि पैशाच्या मूल्याची सुद्धा व्याख्या करू शकत नाही कारण तो पैशाला केवळ अभिसरणाचे माध्यम म्हणून बघतो. हे तर स्पष्टच आहे की जारी केलेल्या पैशाचे प्रमाण मालांच्या सापेक्ष किंमतींचे स्पष्टीकरण देऊ शकत नाही, परंतु हे देखील स्पष्ट आहे की विविध स्वरूपात जारी केलेला पैसा स्वतःमध्ये किंमतींच्या निरपेक्ष पातळीचे सुद्धा सुसंगत स्पष्टीकरण देऊ शकत नाही. प्रथम आपण सापेक्ष किंमतीचा मुद्दा समजून घेऊ.

समजा 1 बुटाची किंमत 100 रुपये आणि 2 शर्टची किंमत देखील 100 रुपये आहे, तर 1 बुटाचा विनिमय 2 शर्टच्या बदल्यात होईल. जर कागदी पैशाच्या मोठ्या प्रमाणात जारी करण्याच्या कारणाने आता त्याच बुटाची किंमत 200 रुपये असेल, तर (दोन्ही क्षेत्रात उत्पादनाची परिस्थिती समान राहिल्यास) दोन शर्टची किंमतही 200 रुपये होईल. सापेक्ष किमतींची पातळी पूर्वीप्रमाणेच मूल्याच्या श्रम नियमानेच निर्धारित होत आहे आणि फियेट पैशामध्ये व्यक्त होणारा निरपेक्ष किमतींचा स्तर वरवर त्यांना वाढवून प्रकट करत आहे. **निश्चितच, ज्या वर्गाचे वेतन किंवा मजुरी सोन्यामध्ये अपरिवर्तनीय कागदी पैसे (जेथे सोने अजूनही मूल्याचे माप म्हणून काम करते) किंवा शुद्ध फियेट पैशामध्ये (जेथे सोन्याने औपचारिकपणे आणि अधिकृतपणे मूल्याचे माप म्हणून कार्य करणे थांबवले आहे) ठरविले जाते, आवश्यकतेपेक्षा अधिक अपरिवर्तनीय कागदी पैसे किंवा शुद्ध फियेट पैसा जारी केल्याने त्यांच्या वास्तविक उत्पन्नात तात्कालिकरीत्या घट होते आणि, तात्कालिकरीत्या भांडवलदार वर्ग अशा प्रकारे कामगार वर्गाची वास्तविक मजुरी कमी करण्यासाठी या युक्तीचा वापर करतो, परंतु त्याला एक मर्यादा असते.** याचे कारण असे आहे की हे वास्तविक उत्पन्न अशा मौद्रिक उपायांनी कोणत्याही लक्षणीय कालावधीसाठी इतके कमी केले जाऊ शकत नाही की श्रमशक्तीचे पुनरुत्पादनच होणार नाही. त्याचवेळी, वास्तविक मजुरीमध्ये अशा प्रकारे होणाऱ्या घसरणीला प्रतिसाद म्हणून कामगार वर्ग शेवटी आपले वेतन वाढविण्यासाठी संघर्ष करतो. त्यामुळे स्वतःमध्ये कागदी पैशाचे प्रमाण वाढवल्याने अथवा कमी केल्याने दीर्घकाळात त्याचा वास्तविक सापेक्ष किंमतींच्या पातळीवर निर्णायक परिणाम होत नाही.

**तर मग महागाईमध्ये होणाऱ्या संरचनात्मक वाढीची किंवा असे म्हणूया की किंमतींच्या सामान्य पातळीतील दीर्घकालीन आणि संरचनात्मक चढ-उतारांची मूळ कारणे काय आहेत?** तात्कालिकरीत्या, कोणत्याही कारणाने बाजारातील मागणी आणि पुरवठ्यात येणारे तात्कालिक चढ-उतार, साठेबाजी, सरकारद्वारे अप्रत्यक्ष करांचा बोजा वाढविला जाणे, दुष्काळासारखी नैसर्गिक कारणे इत्यादी कोणत्याही कारणांमुळे महागाई वाढू शकते. परंतु महागाई किंवा किंमतींच्या सामान्य पातळीच्या साधारण गतीमागे काम करणारे मूलभूत संरचनात्मक घटक कोणते आहेत? मार्क्सने म्हटले होते की माल पैशाच्या (commodity money) युगात जर सोने उत्पादन क्षेत्रातील उत्पादकता संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या सरासरी उत्पादकतेपेक्षा वेगाने वाढत असेल आणि परिणामी त्याचे मूल्य कमी होत असेल, तर किंमतींची सर्वसाधारण पातळी

पान 7 वर

# क्रांतिकारी कामगार शिक्षण मालिका - 11

**पान 6 वरून**

वाढेल कारण इतर मालांचे मूल्य सोन्याच्या मूल्याच्या तुलनेत वाढेल आणि किंमत दुसरे काही नसून मालांच्या मूल्याचे सोन्याच्या मूल्यासोबत गुणोत्तर आहे. जर याच्या उलट झाले तर किंमतींची सर्वसाधारण पातळी खाली येईल. हे स्पष्ट आहे की मुद्रा-माल म्हणजे सोन्याच्या मूल्यात होणाऱ्या चढ-उतारासोबत मालांच्या निरपेक्ष किंमतींमध्ये चढ-उतार होतात, त्यांच्या सापेक्ष किंमतींमध्ये नाही. हे नियम सामान्यत: सोन्याचा पैसा, मूल्याची इतर प्रतीके (जे थेट सोन्याचे प्रतिनिधित्व करतात) जसे की इतर धातूंची नाणी आणि परिवर्तनीय कागदी पैशाला थेट लागू होतात. पुढे मार्क्स "अपरिवर्तनीय" कागदी पैशांबद्दल बोलतात. जर "अपरिवर्तनीय" कागदी पैसा सोन्याच्या पैशाच्या आवश्यक असलेल्या प्रमाणापेक्षा जास्त प्रमाणात जारी केला गेला, तर स्वर्ण किमतींमध्ये (golden prices) म्हणजे सोन्याच्या पैशात किंमतींमध्ये कोणताही फरक पडणार नाही, तसेच मालांच्या सापेक्ष किंमतींमध्येही काही फरक पडणार नाही, परंतु कागदी पैशात किमती वाढतील, कागदी पैशात सोन्याच्या किमती म्हणजे कागदी पैशासोबत मुद्रा-मालाचा विनिमय दरही वाढेल आणि परिणामी निरपेक्ष किंमतींच्या पातळीत वाढ होईल. आम्ही वर नमूद केल्याप्रमाणे, अशा परिस्थितीत, कागदी पैशात निश्चित केलेले वेतन किंवा मजुरी असलेल्या कामगारांच्या वर्गाला निश्चितच त्यांच्या वास्तविक उत्पन्नात तात्कालिक घट झेलावी लागते.

शुद्ध फियेट पैशाच्या (pure fiat money) युगात सोने हे औपचारिक आणि अधिकृतरित्या मूल्याचे माप राहत नाही. अशा परिस्थितीत सैद्धांतिकदृष्ट्या राज्यसत्ता आपल्या मौद्रिक प्राधिकरणाद्वारे कितीही कागदी पैसा जारी करू शकते. भांडवलशाही राज्यसत्ता युद्ध किंवा संकटाच्या काळात किंवा इतर आपत्कालीन परिस्थितीत त्यांचा खर्च भागवण्यासाठी भूतकाळात असे करत सुद्धा आले आहेत. परंतु जेव्हाही, विशेषत: आर्थिक संकटाच्या वेळी राज्यसत्तेद्वारे माल अभिसरण व पैशाच्या भांडवलाच्या मागणीपेक्षा जास्त प्रमाणात अर्थव्यवस्थेत फियेट पैसा टाकल्या जातो, तेव्हा त्याचा परिणाम आत्यंतिक चलनवाढ (hyperinflation) म्हणून समोर येतो. 1923 चा जर्मनी आणि 1980 च्या दशकातील अर्जेंटिना ही याची प्रमुख आधुनिक उदाहरणे आहेत. जेव्हा हे घडले तेव्हा या देशांच्या पैशामध्ये असलेला लोकांचा विश्वासच संपला आणि लोकांनी सोन्याचा साठा करणे, सोन्याद्वारे वस्तूंची देवाणघेवाण करणे आणि मालांच्या अभिसरणाचे माध्यम म्हणून इतर एखाद्या इच्छित मालाचा वापर करणे सुरू केले. पण जी गोष्ट सर्वात जास्त झाली ती म्हणजे सोने खरेदी करण्यासाठी आणि त्याचा साठा करण्यासाठी लोकांची गर्दी. याचे कारण असे होते की फियेट पैसा, ते जारी करणारे सरकार आणि तिची अर्थव्यवस्था यांच्यावरील लोकांचा विश्वास उडाला होता आणि जर कोणती गोष्ट आर्थिक सुरक्षा प्रदान करू शकत असेल, तर ती होती एखाद्या **वास्तविक मुद्रा-मालाचा संचय,** ज्यात मूल्य अंतर्भूत असेल, म्हणजे ज्याच्या उत्पादनात श्रम खर्च केले गेले असतील. पैशाच्या संचयाची (hoarding) भूमिका हाच पैसा बजावू शकत होता. फियेट पैशाच्या युगात जो मूल्याचा श्रमसिद्धांत बाष्पीकृत झाल्यासारखा प्रतीत होता, तो अशा आर्थिक संकटांच्या काळात अचानक नैसर्गिक शक्ती म्हणून प्रकट होतो. सरकारद्वारे जारी फियेट पैसा आणि बँकांद्वारे जारी क्रेडिट पैशावर (याची पुढील प्रकरणांमध्ये विस्ताराने चर्चा केली जाईल) आधारीत ऋण अर्थव्यवस्था (credit economy) अशा संकटाच्या काळात, मार्क्सच्या शब्दात, सहसा मौद्रिक अर्थव्यवस्थेमध्ये (monetary economy) रूपांतरित होतात आणि लोकांमध्ये सोने साठवण्याची स्पर्धा लागते. येथे एक वास्तविक पैसा-माल पैशाचे तिसरे कार्य पूर्ण करत पुन्हा प्रकट होतो, ते म्हणजे पैशाची साठवण. कारण ते आंतरिक मूल्य (intrinsic value) असलेले वैश्विक समतुल्य आहे. अशा संकटाच्या काळात कागदी पैसा आपली विश्वासार्हता गमावून बसतो. दिवसागणिक कागदी पैशाचे मूल्य खाली घसरते आणि लोकं त्याला एखाद्या वास्तविक पैसा-मालामध्ये बदलण्यासाठी घाई करतात, कारण त्याचे मूल्य कोणत्याही दिलेल्या ठिकाणी आणि काळी त्यात लागलेल्या अमूर्त श्रमाच्या परिमाणावरून निर्धारित केले जाते. म्हणजेच, त्याच्या उत्पादनात खर्च झालेल्या सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रमाद्वारे.

त्यामुळे फियेट पैशाच्या युगात सोने आता मूल्याचे औपचारिक माप राहिलेले नाही आणि म्हणून त्याचे नियम काही बाबींमध्ये मुद्रा-माल आणि त्यांची प्रतीके यांच्या अभिसरणाला संचालित करणाऱ्या नियमांपेक्षा भिन्न आहेत. पण त्याचे नियम देखील मुद्रा-माल, त्याची परिवर्तनीय प्रतीके आणि नंतर त्याच्या "अपरिवर्तनीय" प्रतीकांच्या विकासाच्या आणि नंतर त्यांच्या अतिक्रमणाच्या नियमांतूनच उद्भवतात. फरक फक्त एवढाच आहे की जोपर्यंत स्वतः स्वर्ण-पैसा मालांच्या अभिसरणाचे माध्यम असतो, तोपर्यंत किंमतींचे निर्धारण थेट सर्व मालांच्या उत्पादनाच्या आणि सोन्याच्या उत्पादनाच्या परिस्थितीद्वारे होते; जेव्हा त्यांच्या परिवर्तनीय प्रतीकांचा (इतर धातूंची नाणी किंवा परिवर्तनीय कागदी पैसा) काळ येतो तेव्हाही हेच नियम लागू होतात, कारण राज्यसत्तेचे मौद्रिक प्राधिकरण मनमर्जी पद्धतीने कागदी पैसा जारी करू शकत नाही आणि ते त्यांच्या सोन्याच्या साठ्याद्वारे निर्धारित होते. त्यानंतर, भांडवली अर्थव्यवस्थेच्या विस्तार आणि विकासासोबत हा धातूचा अडथळा भांडवली उत्पादन आणि भांडवल संचयात अडथळे निर्माण करू लागतो. मार्क्स यांना हे चांगलेच समजले होते की मूल्याचे माप आणि किमतीचे मानक स्थापित झाल्यानंतर 10 लाख रुपयांच्या मालाची देवाणघेवाण करण्यासाठी 10 लाख रुपयांच्या सोन्याची काही गरज नाही आणि हे काम कागदी पैशाद्वारे देखील केले जाऊ शकते, ज्याचा सोन्यासोबत अंशतः निश्चित/लवचिक विनिमय दर (म्हणजे परिवर्तनीय कागदी पैसा) किंवा पूर्णपणे लवचिक विनिमय दर (म्हणजे अपरिवर्तनीय कागदी पैसा) असेल.

मार्क्सच्या हयातीत वरील स्वरूपातच पैसा-स्वरूपाचा उदय आणि विकास झाला. त्यामुळे हे उघड आहे की मार्क्स फक्त त्याबद्दलच बोलू शकले असते, ना की शुद्ध फियेट पैशाबद्दल ज्याचा जन्मच 1940 ते 1971 दरम्यान झाला. म्हणजे असा "अपरिवर्तनीय" कागदी पैसा ज्यामध्ये सोन्याने औपचारिक आणि अधिकृतपणे मूल्याच्या मापाची भूमिका बजावणे बंद केले आहे. परंतु अशा फियेट पैशाला मार्क्सच्या मूल्याच्या सिद्धांताद्वारे स्पष्ट केले जाऊ शकत नाही का, जसे की अनेक लोक म्हणतात? काय अशा फियेट पैशाच्या युगात रिकार्डोचा पैशाचा परिमाण सिद्धांत लागू होतो? नाही. फियेट पैशाच्या गतीचे नियम देखील मूल्याच्या नियमांनीच बांधले आहेत. फरक केवळ एवढाच आहे की फियेट पैशाचे मूल्य अधिकृतपणे आणि औपचारिकपणे थेट सोन्याच्या मूल्यावरून ठरवले जात नाही. पण हा केवळ दिसणारा (appearance) स्तर आहे.

कोणत्याही प्रकारच्या पैशाचे एक एकक भांडवली समाजात सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रम म्हणजेच मूल्याच्या एका विशिष्ट प्रमाणाचे प्रतिनिधित्व करते. मार्क्स मूल्याच्या मौद्रिक समतुल्यबद्दल बोलताना अशी उदाहरणे देतात: "समजा 3 शिलिंग 6 तासाच्या सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रमाचे प्रतिनिधित्व करतात", इ. प्रतिनिधित्वाच्या या प्रक्रियेत सोने औपचारिकपणे व अधिकृतपणे मध्यस्थ असू शकते किंवा नसू शकते. सोने पैसा बनल्यामुळे तो आता एक सामान्य माल राहत नाही तर मूल्याचे असे माप किंवा स्केल बनते जे की स्वतःसुद्धा परिवर्तनीय असते कारण स्वतः सोन्याच्या मूल्यामध्ये परिवर्तन येत असते. कागदी पैसा या रूपामध्ये दुसरे काही नसून तो सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रमाच्या एका विशिष्ट प्रमाणाचे प्रतिनिधित्व करतो. जेव्हा तो सोन्यासोबत औपचारिकपणे बांधलेला नसतो तेव्हाही तो सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रमाच्या विशिष्ट प्रमाणाचेच प्रतिनिधित्व करतो आणि त्याची गणना करण्याच्या अनेक पद्धती नंतर मार्क्सवादी राजकीय अर्थशास्त्रज्ञांनी तयार केल्या आहेत. पुढे आपण यापैकी एका पद्धतीवर चर्चा करू आणि फियेट पैशाच्या युगात महागाईच्या चढ-उतारांवर कोणते संरचनात्मक घटक प्रभाव टाकतात हे समजून घेऊ.

**येथे आपण ज्या गोष्टीवर सर्वात आधी लक्ष दिले पाहिजे ती ही की पैसा हे दुसरे काही नसून मूल्याचे स्वतंत्र-स्वरूप (independent value-form) आहे.** मूल्य आपल्या समोर नेहमी ठोसरीत्या पैसा-रूपात येत नाही, तर ते दोन विनिमय करणाऱ्या पक्षांमध्ये एखाद्या वहीमध्ये नोंदल्या जाणारे श्रमाचे तास, स्थिर भांडवलाचे घिसाई मूल्य, भांडवलदारांच्या वहीखात्यामध्ये मालांच्या मूल्याच्या रूपामध्ये सुद्धा समोर येते. यावरून दिसते की ऐतिहासिकरित्या आणि तार्किकदृष्ट्या मालांचे अस्तित्व हे पैशाच्या अस्तित्वापेक्षा जुने आहे आणि मूल्य दुसरे-तिसरे काही नसून थिजलेले अमूर्त श्रम (congealed abstract labour) आहे ज्याला सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रमकाळामध्ये मोजले जाते. पैशाची व्याख्या केवळ मालांच्या मूल्याच्या आधारावरच केली जाऊ शकते. याशिवाय संकल्पनेच्या पातळीवर पैशाची व्याख्या ना ऐतिहासिकरित्या केली जाऊ शकते ना तार्किकरित्या. पैशाचे मूळ कार्यच हे आहे की ते सामाजिकदृष्ट्या आवश्यक अमूर्त सामान्य श्रमाचे प्रमाण म्हणजेच मूल्याला अभिव्यक्त करणारे स्वतंत्र-मूल्य रूप आहे.

निश्चितपणे ऐतिहासिकदृष्ट्या तो एका मालाच्या रूपातच जन्मतो, परंतु त्याचे नेहमीच औपचारिक आणि अधिकृतपणे एखाद्या मालाशी बांधलेले असणे अनिवार्य नाही. **मार्क्सच्या पैशाच्या सिद्धांतातूनच हे स्पष्टपणे दिसून येते की साधारण माल उत्पादनातून भांडवली उत्पादन पद्धतीकडे संक्रमण आणि भांडवली उत्पादन पद्धतीच्या उत्तरोत्तर विकासासह भांडवल संचय आणि विस्तारित पुनरुत्पादनाने पैसा-मालाच्या धातूच्या मर्यादांचे अतिक्रमण करत मुद्रा-माल, मुद्रा-मालाचे प्रतिनिधी (उदा., इतर धातूंची नाणी, परिवर्तनीय कागदी नोटा) व "अपरिवर्तनीय" कागदी नोटांपर्यंत आणि नंतर शुद्ध फियेट पैशापर्यंतच्या संक्रमणाला पूर्णत्वास नेले.** हे पैशाच्या विविध कार्यांचे विकसित होण्यामध्ये आणि त्यांच्या परस्परसंबंधांच्या रूपांतरित होण्यामध्ये प्रकट होते, उदा., मूल्याचे माप, किमतींचे मानक, अभिसरणाचे माध्यम आणि मूल्याचे भांडार (म्हणजे, आर्थिक सुरक्षिततेचा उपाय म्हणून पैशाची साठवणूक). आज जेव्हा आपण शुद्ध फियेट पैशाच्या युगात जगत आहोत, तेव्हा मूल्याचे माप म्हणून सोन्याची औपचारिक आणि अधिकृत भूमिका संपलेली आहे. सर्व मालांच्या निरपेक्ष किंमती किंवा किंमतींची सामान्य पातळी राज्यसत्तेच्या मौद्रिक प्राधिकरणाद्वारे अभिसरणात टाकलेल्या कागदी पैशाच्या प्रमाणाद्वारे निर्धारित होते. परंतु ते मालांच्या सापेक्ष किमती निर्धारित करत नाही. सोबतच राज्यसत्तेचे मौद्रिक प्राधिकरण अनियंत्रितपणे कागदी पैसा जारी करू शकत नाही, उलट त्याचे प्रमाण मालाचे अभिसरण आणि पैसा-भांडवलाची मागणी यावर अवलंबून असते. जर एखादे मौद्रिक प्राधिकरण यापेक्षा जास्त कागदी पैसा जारी करेल तर एका मर्यादेनंतर किमतींची सामान्य पातळी वाढते. ती मर्यादा काय आहे, याविषयी आपण पुढे चर्चा करू, परंतु प्रथम शुद्ध फियेट पैसा म्हणून पैशाचे मूल्य कसे ठरवले जाते ते समजून घेऊ.

ज्यावेळी स्वर्ण पैसाच मूल्याचे माप आणि किमतीचे मानक यासोबत अभिसरणाच्या माध्यमाची भूमिका बजावत होते, त्याकाळी मार्क्सने पैशाचे मूल्य खालीलप्रमाणे ठरवले होते. पैशाचे मूल्य सोन्याचे उत्पादन करण्यासाठी लागणाऱ्या सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रमकाळाद्वारे ठरवले जाते. अशा परिस्थितीत मालांच्या किमती इतर कशामुळे नाही तर मालांच्या उत्पादनासाठी लागणारा सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रमकाळ आणि सोन्याचे उत्पादन करण्यासाठी लागणारा सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रमकाळ यांच्या गुणोत्तरावर ठरत असतात. जर आपण याकडे गणितीय सूत्र म्हणून पाहिले तर:

$$\sum P = L_c/L_g$$

सर्व मालांची एकूण किंमत = सर्व मालांच्या उत्पादनासाठी लागलेल्या सामाजिक श्रमांचे एकूण प्रमाण / स्वर्ण पैशाच्या उत्पादनात लागलेल्या सामाजिक श्रमांचे प्रमाण

($\sum P$ येथे एकूण किंमतींची बेरीज आहे, $L_c$ हे मालांच्या उत्पादनात लागलेले सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रम आहे, तर $L_g$ हे सोन्याच्या उत्पादनात लागलेले सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रम आहे)

आपण हे समीकरण असे देखील लिहू शकतो:

$$\sum P = (1/L_g) * L_c$$

येथे आपण सर्व मालांच्या एकूण

**पान 8 वर**

# क्रांतिकारी कामगार शिक्षण मालिका - 11

पान 7 वरून

किंमतीबद्दल बोलत आहोत, त्यामुळे वेगवेगळ्या मालांचे मूल्य, त्यांची उत्पादन किंमत आणि त्यांची बाजारातील किंमत यातील अंतराने काही फरक पडत नाही कारण संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या पातळीवर सामाजिक मूल्य, उत्पादनाच्या किंमती व बाजारातील किंमतींची बेरीज समान असते. हा मार्क्सने दिलेला माल उत्पादनाचा मूलभूत नियम आहे. **म्हणजेच, विनिमयात मूल्य निर्माणही होऊ शकत नाही किंवा नष्टही होऊ शकत नाही.**

वरील समीकरणात $1/L_g$ ला श्रमकाळाचे मौद्रिक समतुल्य (Monetary Equivalent of Labour-Time) म्हणतात. हे दुसरे काही नसून एका एकक वेळेत उत्पादित सोन्याचे प्रमाण आहे. उदाहरणार्थ, जर 4 तासांत 1 औंस सोने तयार होत असेल तर:

$$1/L_g = \frac{1}{4} \text{ औंस सोने}$$


हे संपूर्ण अर्थव्यवस्थेत दर तासाला तयार होणाऱ्या नवीन मूल्याचे प्रतिनिधित्व करते.

मार्क्सचा पुढील महत्त्वाचा मुद्दा हा माल उत्पादनाचा एक सामान्य नियम आहे, म्हणजे हे की सर्व मालांची एकूण किंमत आणि अभिसरणात असलेल्या पैशाचे प्रमाण यांच्यात एक निश्चित संबंध असतो. आपण वर पाहिले आहे की सर्व मालांच्या किंमतींची बेरीज म्हणजे त्यांच्या उत्पादनासाठी लागणारा सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रमकाळ आणि सोन्याच्या उत्पादनासाठी लागणारा सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रमकाळ यांचे गुणोत्तर आहे, कारण मालांची किंमत दुसरे काही नसून त्यांचे मूल्य (म्हणजे त्यात अंतर्भूत सामाजिक श्रमाचे प्रमाण) आणि सोन्याच्या मूल्याचे गुणोत्तर आहे. इथपर्यंत अजून आपण पैशाच्या प्रमाणाबद्दल बोलतसुद्धा नाही आहोत. अशा वेळी पैशाचे प्रमाण कसे ठरवले जाते? मार्क्सच्या मते, ते एकूण किंमतींची एकूण बेरीज आणि पैशाचा वेग यावरून ठरते. म्हणजे:


$$M_g = \sum P/V$$

जेथे $M_g$ हे सोन्याच्या पैशाचे प्रमाण आहे आणि V हा सोन्याच्या पैशाचा वेग आहे. अशा प्रकारे किंमतींची एकूण बेरीज आणि पैशाचा वेग अभिसरण होणाऱ्या पैशाच्या एकूण प्रमाणाला निर्धारित करतो. स्वर्ण पैसा किंवा त्याच्या परिवर्तनीय प्रतीकांच्या (म्हणजे इतर धातूंची नाणी आणि परिवर्तनीय कागदी पैसा) युगात जर मौद्रिक प्राधिकरणाने यापेक्षा जास्त पैसा अभिसरणात टाकला किंवा इतर कारणांमुळे अर्थव्यवस्थेत सोन्याचे जास्त प्रमाण आले तर त्याची साठेबाजी होईल आणि ते पूर्णपणे अभिसरणात जाणार नाही. इथेच मार्क्स ह्यूम आणि रिकार्डो यांच्यापेक्षा वेगळे होते.

रिकार्डोच्या मते कोणत्याही प्रकारच्या पैशाचे प्रमाण जास्त झाले तर त्याचे मूल्य घसरते आणि किमती वाढतात. मार्क्सने सांगितले की असे होणार नाही. जर पैशाचा पुरवठा अभिसरणाच्या आवश्यकतेपेक्षा वाढला तर भांडवली माल उत्पादनाच्या व्यवस्थेमध्ये याचे दोन परिणाम होतील: पहिला, पैसा भांडवलाचे आधिक्य होईल आणि परिणामी सरासरी व्याज दर कमी होईल आणि नफ्याचा दर वाढेल व त्यामुळे गुंतवणुकीचा दर वाढेल. दुसरे म्हणजे यामुळे समाजात असलेली प्रभावी मागणी देखील काही




**आकृती 1: इंग्लंडमधील स्वर्णिय किंमतीमध्ये घाऊक किंमत निर्देशांक आणि सोन्याची पौंड किंमत (पैसा किंमत), 1790 ते 2009 पर्यंत. पायाभूत वर्ष 1930, लॉग स्केल 1930 = 100**




**आकृती 2: अमेरिकेमधील स्वर्णिय किंमतीमध्ये घाऊक किंमत निर्देशांक आणि सोन्याची डॉलर किंमत (पैसा किंमत), 1800 ते 2000 पर्यंत. पायाभूत वर्ष 1930, लॉग स्केल 1930 = 100**

प्रमाणात वाढेल, ज्यामुळे मर्यादित प्रमाणात उत्पादनास चालना मिळेल. परंतु त्याची एक मर्यादा असेल ज्यावर आपण शेवटी बोलू. स्पष्ट आहे की रिकार्डो पैशाकडे केवळ अभिसरणाचे माध्यम म्हणून पाहत होते आणि मूल्याचे माप व मूल्याचे भांडार तसेच साठेबाजी हे पैशाचे कार्य म्हणून समजून घेण्यास सक्षम नव्हते.

आता वरील समीकरणात “अपरिवर्तनीय” कागदी पैशाच्या वेळी कोणते बदल होतील हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. हेच बदल शुद्ध फियेट पैशावर म्हणजे कागदी पैशावर लागू होतात, ज्यामध्ये सोने यापुढे मूल्याचे औपचारिक व अधिकृत माप किंवा किंमतीचे मानक राहिलेले नसते. आता पैशाचे मूल्य केवळ सोन्याच्या मूल्यावर अवलंबून राहत नाही तर अभिसरणात टाकलेल्या फियेट पैशाच्या प्रमाणावर देखील अवलंबून असते. येथे पैशाचे मूल्य मालांच्या अभिसरणासाठी आवश्यक असलेल्या स्वर्ण-पैशाचे अपेक्षित प्रमाण (जे स्वर्ण-पैसा आणि त्याची प्रतीके जसे की इतर धातूंची नाणी किंवा परिवर्तनीय कागदी नोटा हे अभिसरणाचे माध्यम असल्यास आवश्यक असते) आणि अभिसरणात टाकल्या गेलेल्या फियेट पैशाच्या गुणोत्तराने निर्धारित केले जाते. गणिती पद्धतीने सांगायचे झाल्यास :

फियेट पैशाच्या स्थितीत श्रमकाळाचे मौद्रिक समतुल्य $(MELT_p) = (1/L_g) * (M_p/M_g) = MELT * (M_p/M_g)$

येथे $M_g$ हे सोन्याच्या पैशाचे ते प्रमाण आहे जे सोन्याचा पैसा किंवा त्याची परिवर्तनीय प्रतीके किंवा प्रतिनिधी अभिसरणामध्ये असताना अभिसरणाचे माध्यम असते; $M_g$ हे फियेट पैशाचे प्रमाण आहे जे अभिसरणात टाकले गेले आहे.

वरवर पाहता असे वाटू शकते की फियेट पैशाच्या बाबतीत आपण पैशाच्या प्रमाणावरून पैशाचे मूल्य ठरवत आहोत आणि याबाबत रिकार्डोच्या परिमाण सिद्धांतानुसार जात आहोत. परंतु असे नाही, कारण मार्क्सच्या मते त्यांच्या काळातील “अपरिवर्तनीय” कागदी पैशाच्या बाबतीतही हे पैशाचे प्रमाणच होते जे सोन्याच्या मूल्याच्या सापेक्ष *कागदी पैशाच्या* मूल्याला किंवा सर्व मालांच्या कागदी पैशामधील किंमतीला निश्चित करत होते. यामुळे मालांच्या स्वर्णिय किंमतीत (golden prices) किंवा सोन्याच्या मूल्यावर काहीही फरक पडत नव्हता, मात्र कागदी पैशामध्ये सोन्याची बाजार किंमत बदलत होती. येथे हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे की मूल्याचे सारतत्व दुसरे काहीही नसून अमूर्त साधारण श्रमाचे ते प्रमाण आहे जे सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रमकाळात मोजले जाते. स्वतःमध्ये सोने हे मूल्य नाही आहे, ते मूल्याचे माप आहे आणि ते मूल्याचे माप का झाले याची काही ठोस ऐतिहासिक कारणे होती. मूल्य हे सामाजिकदृष्ट्या आवश्यक अमूर्त साधारण श्रमाचे प्रमाण आहे. सर्वसाधारणरित्या सोने हे मूल्याचे माप अगदी यामुळेच बनले कारण त्याच्या उत्पादनात अमूर्त मानवी श्रम लागलेले आहेत. त्याचे एक आंतरिक श्रममूल्य आहे. विशिष्टरीत्या ते मूल्याचे माप यामुळे बनले कारण त्याची गुणवत्ता वैश्विकस्तरावर समान होती (अगदी ज्याप्रकारे अमूर्त श्रमाची आहे), ते लहान-लहान तुकड्यांमध्ये विभागले जाऊ शकते आणि ते कमी नाशवंत होते. भांडवली उत्पादन पद्धतीच्या एका विशिष्ट काळात ते मूल्याचे औपचारिक आणि अधिकृत माप बनले. याचा असा अर्थ नाही की भांडवली उत्पादन व्यवस्थेच्या संपूर्ण कालावधीत ते मूल्याचे औपचारिक आणि अधिकृत माप राहील. अशा स्थितीत जर सोने मूल्याचे माप राहिले नसेल, कागदी पैशात त्याची किंमत बाजाराच्या गतीनुसार खाली-वर होत असेल आणि राज्यसत्ता आणि खाजगी भांडवलदार, व्यापारी इत्यादी सोन्याचा मूल्याचे माप म्हणून वापर करत नसतीलही, तरीसुद्धा कागदी पैशाचे मूल्य मूल्याच्या श्रम सिद्धांतानेच निर्धारित होते. केवळ यात सोन्याची मध्यस्थता *औपचारिकरित्या* समाप्त होईल, उलट ते सामान्यतः भांडवल संचयाची गती आणि उत्पादनाच्या परिस्थितीने निश्चित केले जाईल. निश्चितपणे, यामध्ये पैशाचे मूल्य ठरवण्यात भांडवली राज्यसत्तेचे मौद्रिक धोरण आणि बाजारातील गतिशीलतेच्या थेट भूमिकेमुळे आणि हस्तक्षेपामुळे पैशाचे मूल्य कितीतरी जास्त उलथापालथीतून जाईल. परंतु तरीही ते मूल्याच्या श्रम सिद्धांतानेच संचालित केले जाईल.

हेच कारण आहे की जेव्हा अर्थव्यवस्था संकटात असते आणि कागदी पैशाचे अवमूल्यन होते तेव्हा बाजारात सोन्याची मागणी वाढते. लोक मूल्याचे भांडार म्हणून फियेट पैशाची साठवणूक करत नाहीत, तर सोन्याची साठवणूक करतात, जे अगदी यामुळे आर्थिक सुरक्षेचे एक साधन असते कारण त्यात मूल्य (थिजलेले अमूर्त श्रम) अंतर्निहित असते. वरील आलेखामध्ये तुम्ही पाहू शकता की अमेरिका आणि इंग्लंडमध्ये 1970 च्या दशकानंतर सुद्धा, जेव्हा स्वर्ण मानक रद्द केले गेले होते, मालांच्या सरासरी स्वर्णिम किंमतींमध्ये फार चढ-उतार दिसत नाही आणि तो चढ-उतार जवळपास तसाच आहे जसा तो 1970 च्या दशकाआधी होता. एवढे चढ-उतार उत्पादनाच्या परिस्थितीतील बदलांमुळे आणि नफ्याच्या दरांच्या सरासरीकरणामुळे देखील होतात. परंतु कागदी पैशात मोजल्या जाणाऱ्या किंमत निर्देशांकात 1970 च्या दशकापासूनच आपल्याला वाढ बघायला मिळते आणि तेव्हापासून निरपेक्ष किंमतीची पातळी वाढण्याची प्रवृत्ती सामान्यपणे दिसून येते.

वरील दोन आलेखांवरून हे देखील स्पष्ट होते की सोन्याच्या बाजार किंमतींमध्ये (फियेट पैशातील) 1970 च्या दशकानंतर झपाट्याने वाढ होते आणि ही प्रक्रिया खूप उलथापालथीसह होते. परंतु किंमतींच्या सामान्य पातळीत स्वर्णिम किंमतींनुसार फारसा बदल झालेला नाही, म्हणजेच सोन्यासोबत इतर मालांच्या सापेक्ष किमतीत मोठी घसरण किंवा वाढ झालेली नाही. स्पष्ट आहे की निरपेक्ष किंमतींमध्ये होणाऱ्या वाढीचे कारण वास्तवात फियेट पैशांमधील किंमतींमध्ये (fiat money prices) झालेली वाढ आहे, कारण संकटाच्या काळात बहुतेक भांडवलशाही सरकारांनी संकटापासून सुटका करण्यासाठी मौद्रिक अवमूल्यन करून आपले खर्च पूर्ण करण्याचा आणि कामगार वर्गाची वास्तविक मजुरी कमी करण्याचा मार्ग निवडला. ज्या वर्गांचे पगार/मजुरी फियेट पैशात निश्चित केली जाते, साहजिकच पैशाच्या प्रत्येक

पान 9 वर

# क्रांतिकारी कामगार शिक्षण मालिका - 11

पान 8 वरून

अवमूल्यनाने त्यांचे वास्तविक उत्पन्न कमी होते. ही प्रक्रिया देखील चढ-उतारांनी भरलेली असते कारण भांडवलदार वर्ग ही प्रक्रिया एकतर्फी आणि अविरतपणे पुढे चालवू शकत नाही.

दुसरे कारण ज्यामुळे वरीलप्रमाणे फियेट पैशाचे मूल्य ठरवूनही आपण पैशाच्या परिमाण सिद्धांताकडे जात नाही आहोत ते हे की पैशाचा परिमाणसिद्धांत केवळ निरपेक्ष किमतींबद्दल बोलतो आणि तो मालांच्या सापेक्ष किंमतींचे कोणतेही स्पष्टीकरण देत नाही, जे की स्वतः सामाजिक मूल्य (म्हणजेच सामाजिकदृष्ट्या आवश्यक अमूर्त श्रमाचे प्रमाण) आणि उत्पादनाच्या किंमतींनी (म्हणजेच नफ्याच्या विविध क्षेत्रांमधील सरासरीकरणामुळे निर्माण होणाऱ्या किंमती, ज्याच्या अवतीभवती बाजारातील किमती फिरतात) निर्धारित होतात. पैशाचा परिमाण सिद्धांत मालांचे मूल्य आणि सापेक्ष किंमती कशा निर्धारित होतात ते स्पष्ट करू शकत नाही. मार्क्सच्या मौद्रिक सिद्धांताला आपण "अपरिवर्तनीय" कागदी पैशापासून फियेट पैशापर्यंत जरी विस्तारित केले तरी तो केवळ निरपेक्ष किंमतींचेच नाही तर सापेक्ष किंमतींचे देखील स्पष्टीकरण देतो आणि शुद्ध फियेट पैशाच्या माध्यमातून किंमतीच्या पातळीचे निर्धारण देखील केवळ त्याच्या जारी केलेल्या प्रमाणावरून नाही तर श्रमकाळाच्या मौद्रिक समतुल्याद्वारे होते, ज्याचा अंदाज लावण्यासाठी आपण सोन्याच्या पैशाच्या त्या काल्पनिक प्रमाणाचा (notional quantity) अंदाज लावतो जे अभिसरणाचे माध्यम असताना आवश्यक असले असते.

पैशाच्या प्रमाण सिद्धांतापासून फारकतीचे तिसरे कारण म्हणजे फियेट पैशाच्या मार्क्सवादी सिद्धांतानुसार पैशाच्या अनिवार्यतेचे स्पष्टीकरण भांडवली माल उत्पादनाच्या परिस्थितीने निर्धारित होते. कोणतीही बँक किंवा कोणतेही सरकारी मौद्रिक प्राधिकरण अनियंत्रितपणे पैशाचे कितीही प्रमाण जारी करू शकत नाही आणि हे देखील मालांचे अभिसरण, पैसा भांडवलाची मागणी आणि राज्यसत्तेच्या आवश्यकतांवरून निर्धारित होते. **एकूणच, ही नफ्याच्या सरासरी दराची गतीच असते जी भांडवली अर्थव्यवस्थेत पैशाची मागणी आणि प्रमाण ठरवत असते.** अन्यथा, फियेट पैशाच्या युगात पैशाच्या साठेबाजीचे, त्याच्या संचित भंडारांच्या अस्तित्वात असण्याचे कोणतेही तार्किक स्पष्टीकरण दिले जाऊ शकत नाही. ज्याअर्थी पैशाचा परिमाण सिद्धांत पैशाच्या अभिसरणाचे माध्यम असण्याच्या भूमिकेलाच अधोरेखित करतो, त्यामुळे त्यानुसार पैशाचे संपूर्ण प्रमाण अभिसरणामध्ये असते आणि याच तर्काच्या आधारे तो पैशाचे मूल्य ठरवतो. पण असे होत नाही, हे कोणताही अर्थशास्त्राचा विद्यार्थी जाणतो. ह्या बाबीला मार्क्सवादी आणि गैर-मार्क्सवादी अर्थशास्त्रज्ञांनी तर्क आणि तथ्यांसह दाखवून दिले आहे की किंमतींच्या सामान्य पातळीचे (general level of prices), भांडवली अर्थव्यवस्थेत पैशाच्या विविध भंडारांचे (hoards) संचित होण्याच्या परिघटनेचे आणि मालांच्या सापेक्ष मूल्याचे स्पष्टीकरण प्रस्तुत करण्यात पैशाचा परिमाण सिद्धांत पूर्णपणे अयशस्वी आहे.

**आता आपण या प्रश्नावर येतो की भांडवली राज्यसत्ता आणि त्याच्या मौद्रिक प्राधिकरणाने जारी केलेल्या फियेट पैशाचे प्रमाण वाढवले तर त्याचे तात्कालिक आणि दीर्घकालीन परिणाम काय होतील.** जर सरकारने फियेट पैशाचा पुरवठा वाढवला तर त्याचा पहिला परिणाम तोच होईल ज्याचा उल्लेख मार्क्सने कोणत्याही प्रकारच्या पैशाचा पुरवठा वाढण्याच्या संदर्भात केला होता. जर असे झाले तर त्याचा पहिला परिणाम असा होईल की सरासरी व्याजदर कमी होईल आणि पैशाच्या भांडवलाची मागणी वाढेल कारण "भांडवलाची किंमत" कमी झाली आहे. त्याचे कारण असे की मालांच्या अभिसरणासाठी पैशाचे जे प्रमाण आवश्यक आहे ते मालांच्या अभिसरणात जाईल आणि उरलेला पैसा भंडाराच्या (hoards) स्वरूपात जमा होईल. त्याच वेळी यामुळे तात्कालिकरीत्या प्रभावी मागणी वाढेल आणि यामार्गाने सुद्धा गुंतवणुकीचा दर वाढेल. परंतु त्याची एक मर्यादा आहे. ती मर्यादा काय आहे? केन्सवाद्यांच्या मते, भांडवली सरकार तोपर्यंत पैशाचा पुरवठा वाढवत राहू शकते जोपर्यंत संपूर्ण कार्यशक्ती अर्थव्यवस्थेत शोषल्या जात नाही. म्हणजे जोपर्यंत खाजगी क्षेत्र आणि सरकारी क्षेत्राद्वारे (ज्याला केन्सवादी आणि उत्तर-केन्सवादी लोक शेवटचा सहारा असलेला नियोक्ता 'Employer of the Last Resort (ELR)' म्हणतात) संपूर्ण किंवा जवळजवळ संपूर्ण श्रम पुरवठ्याला शोषले जात नाहीत, तोपर्यंत पैशांचा पुरवठा वाढवण्याने पैशाच्या मूल्यात कोणताही फरक पडणार नाही आणि महागाई वाढणार नाही. जसजसे हा टप्पा जवळ येतो तसतसे मजुरीचा दर वाढतो, नफ्याचा दर कमी होतो, गुंतवणुकीचा दर कमी होतो आणि महागाईचा दर वाढतो. परंतु जोपर्यंत अर्थव्यवस्था पूर्ण रोजगाराच्या जवळ पोहोचत नाही तोपर्यंत सरकार कोणत्याही चिंतेशिवाय पैशांचा पुरवठा वाढवत राहू शकते आणि अर्थसंकल्पीय तुटीच्या धोरणावर अंमल करत राहू शकते. म्हणजेच, केन्सवाद्यांच्या मते, अंतिम मर्यादा ही श्रम पुरवठ्याची मर्यादा आहे.

**परंतु प्रत्यक्षात हा श्रम पुरवठा नाही आहे जो पैशाच्या पुरवठ्याला मर्यादा म्हणून काम करतो, ज्यानंतर पैशाचा पुरवठा महागाईला चालना देतो.** याचे कारण असे की भांडवली अर्थव्यवस्था स्वतःच्या आंतरिक गतीनेच बेरोजगारांची एक फौज उभी करते जी अनेक कारणांमुळे तिच्यासाठी अनिवार्य आहे. पहिले कारण म्हणजे यामुळे सर्वहारा वर्ग आणि भांडवलदार वर्ग यांच्यातील वर्गसंघर्षातील कामगारांची बाजू कमकुवत होते आणि त्यांना शिस्तबद्ध ठेवण्यास भांडवलदार वर्गाला मदत करते. दुसरे, भांडवलाची सेंद्रिय रचना वाढण्याच्या नैसर्गिक प्रवृत्तीसह बेरोजगारांची संख्या सतत वाढत राहते. "आणि तिसरे कारण म्हणजे भांडवली उत्पादन स्वाभाविकताच विस्तारित पुनरुत्पादन असते, त्यामुळे भांडवलशाहीला बेरोजगारांची एक राखीव फौज पाहिजे असते." त्यामुळे भांडवलशाही अर्थव्यवस्थेत साधारणपणे पूर्ण किंवा जवळजवळ पूर्ण रोजगाराची कुठलीही परिस्थिती येऊच शकत नाही. केन्सच्या मते, जेव्हा पूर्ण रोजगाराची परिस्थिती जवळ येते तेव्हाच महागाई वाढते. परंतु 1970 च्या दशकात बेरोजगारी आणि महागाई या दोन्हींनी जेव्हा एकाच वेळी कळस गाठला तेव्हा केन्सचा हा सिद्धांत चुकीचा ठरला.

जर कामगार पुरवठा ती मर्यादा नाही आहे तर मग ती मर्यादा काय आहे ज्यानंतर पैशाचा पुरवठा वाढण्यासोबत महागाई वाढणे अपरिहार्य ठरते? मार्क्सवादी दृष्टिकोनातून हा नफ्याचा सरासरी दर आहे जो यासाठी अंतिम मर्यादा म्हणून कार्य करतो. कारण हे की भांडवलदार नफ्यासाठी गुंतवणूक करतात, लोकांना रोजगार देण्यासाठी नव्हे. ही वेगळी बाब आहे की श्रमशक्ती विकत घेतल्याशिवाय तो नफा मिळवू शकत नाही कारण अतिरिक्त मूल्यासह सर्व मूल्य केवळ श्रमानेच निर्माण होऊ शकते. परंतु कामगारांना नोकऱ्या देणे हा त्याचा उद्देश नाही आहे. पैशाचा पुरवठा वाढल्यामुळे व्याजदर कमी होतो, उद्योजकाच्या नफ्याचा दर वाढतो, पैसा भांडवलाची मागणी वाढते, गुंतवणुकीचा दर वाढतो आणि विकास दर वाढतो. गुंतवणुकीचा दर वाढल्याने भांडवलशाही व्यवस्थेद्वारे क्षमतेचा वापर (utilization of capacity) शक्य तितका वाढतो. **परंतु अर्थव्यवस्थेचा जास्तीत जास्त विकास दर किती असतो?**

कमाल वाढीचा दर तेव्हा गाठला जातो जेव्हा संपूर्ण नफा पुन्हा गुंतवला जातो. नफ्याचे निरपेक्ष प्रमाण नफ्याचा सरासरी दरच निर्धारित करतो. नफ्याचा सरासरी दर ती कमाल मर्यादा आहे जिथपर्यंत गुंतवणुकीचा दर वाढवला जाऊ शकतो. जेव्हा एखादी अर्थव्यवस्था या मर्यादेपर्यंत पोहोचते, केवळ तेव्हाच पैशाच्या पुरवठ्यात वाढ होणे स्वतःमध्ये महागाईचे कारण ठरते, म्हणजे निरपेक्ष किमतींच्या सामान्य पातळीत वाढ होण्याचे कारण ठरते. **म्हणजे स्वतःमध्ये पैशाच्या पुरवठ्याचे प्रमाण महागाईच्या दराला संरचनात्मकरित्या निर्धारित करत नाही, तर ही नफ्याच्या सरासरी दराची गती आहे जी संरचनात्मकरित्या आणि दीर्घकाळामध्ये सामान्यतः निरपेक्ष किमतींच्या सामान्य पातळीतील चढ-उताराला नियंत्रित करते.**

हे वेगळे सांगण्याची गरज नाही की येथे आपण संरचनात्मक घटकांबद्दल बोलत आहोत जे दीर्घकाळामध्ये किंमतींच्या गतीला निर्धारित करतात. तात्कालिकरीत्या फियेट पैशाच्या पुरवठ्यात वाढ, साठेबाजी, पुरवठा साखळीतील व्यत्यय, भांडवली अर्थव्यवस्थेच्या अंतर्गत अराजकतेमुळे काही विशेष मालांच्या किमतीत चढ-उतार, इत्यादींमुळेही महागाईचा दर वाढू किंवा कमी होऊ शकतो. **कामगार वर्गाचा वर्गसंघर्ष कमजोर झाल्यामुळे आणि संकटकाळात बेरोजगारी वाढल्याकारणाने सरासरी मजुरी श्रमशक्तीच्या मूल्यापेक्षा जास्त खाली घसरल्याने, विशेषतः कष्टकरी वर्गासाठीदेखील महागाई वाढू शकते. याशिवाय भांडवली राज्यसत्तेद्वारे भांडवलदार राजकीय वर्गाच्या चैनीची पूर्तता आणि भांडवलदार वर्गाला कर्जातून दिलेली सूट, सवलतीच्या दरात सुपूर्द केलेली नैसर्गिक संसाधने यांमुळे निर्माण झालेली तूट अप्रत्यक्ष करांचा बोजा लादून पूर्ण करण्याच्या धोरणांमुळे सुद्धा महागाईचा दर वाढू शकतो. आज आपल्या देशातील सर्वसामान्य कष्टकरी लोकांसाठी महागाईची सर्वात महत्त्वाची कारणे ही वर आम्ही नमूद केलेली दोन कारणे आहेत.** परंतु या तात्कालिक कारणांमुळे अल्पावधीमध्ये किंमतींचे होणारे चढ-उतार देखील आपण सुसंगतपणे तेव्हाच समजून घेऊ शकतो जेव्हा किमतींच्या सामान्य पातळीमध्ये संरचनात्मकरित्या आणि दीर्घकाळात होणाऱ्या बदलांच्या मागे काम करणाऱ्या मूलभूत कारणांना समजले जाईल.

अशा प्रकारे आपण पाहू शकतो की मार्क्सने मांडलेले पैशाचे नियम दुसरे काही नसून मूल्याच्या श्रम सिद्धांताचाच विस्तार आहे. या नियमांद्वारे मार्क्सने त्यांच्या काळातील भांडवली अर्थव्यवस्थेत अस्तित्वात आलेल्या पैशाच्या स्वरूपांचे विश्लेषण केले आणि दाखवून दिले की पैशाच्या या स्वरूपांच्या मूल्याला कशाप्रकारे केवळ मूल्याच्या श्रम सिद्धांताद्वारेच स्पष्ट केले जाऊ शकते. मार्क्सने प्रस्तुत केलेल्या याच मौद्रिक नियमांच्या विस्ताराच्या आधारे आजच्या फियेट पैशाला देखील समजले जाऊ शकते. निश्चितपणे स्वर्ण-पैशापासून ते स्वर्ण-पैशाच्या प्रतीकांपर्यंतच्या संक्रमणामध्ये, स्वर्ण-पैशाच्या या प्रतीकांपासून ते "अपरिवर्तनीय" कागदी पैशांपर्यंतच्या संक्रमणामध्ये आणि नंतर स्वर्ण-समर्थित "अपरिवर्तनीय" कागदी पैशांपासून ते फियेट पैशांपर्यंतच्या संक्रमणामध्ये पैशाच्या मार्क्सवादी सिद्धांताने स्वतःला विकसित केले आणि दाखवले की हे नवीन मौद्रिक स्वरूप देखील रिकार्डोचा परिमाण सिद्धांत, किंवा नैप, इनेस, इ. सारख्या चार्टलिस्ट मौद्रिक सिद्धांतकार (जे हे मानायचे की राज्यसत्ताच पैशाला तयार करते आणि त्याचे काम केवळ अभिसरणाचे माध्यम असणे आहे), किंवा केन्सवादी आणि उत्तर-केन्सवादी सिद्धांतकारांच्या व्याख्येद्वारे समजू शकत नाही. या सर्व सिद्धांतांचा एक अनैतेहासिक आणि अवैज्ञानिक दृष्टिकोन आहे जो पैशाच्या उगमाला माल उत्पादनाच्या इतिहासात शोधत नाही किंवा तो पैशाला केवळ अभिसरणाचे माध्यम म्हणून बघतो मात्र तो अभिसरणाचे माध्यम कसे बनतो हे स्पष्ट करू शकत नाही. त्यामुळे फियेट पैशाच्या काळातही पैशाचा पुरवठा केवळ औपचारिक आणि स्वरूपाच्या स्तरावर बहिर्जनित (exogenous) असतो, ज्याला राज्यसत्तेचे मौद्रिक प्राधिकरण सैद्धांतिकरित्या मनमर्जीपणे ठरवू शकतो. सारांशात, फियेट पैशाच्या युगातही, पैशाचा पुरवठा अंतर्वस्तुच्या पातळीवर अंतर्जनीतच (endogenous) असतो. एका मर्यादेनंतर त्याला मोठ्या प्रमाणात जारी केल्याने मालांच्या मूल्याच्या तुलनेत त्याच्या मूल्याचे अवमूल्यन होणे आणि निरपेक्ष किंमतींच्या सामान्य पातळीत वाढ होणे अगदी हेच सिद्ध करते, ना की याच्या उलट.

आम्ही वाचकांना आग्रह करतो की नफा, नफ्याचा सरासरी दर आणि उत्पादनाच्या किंमतींची निर्मिती, क्रेडिट पैशाची तयार होण्याची प्रक्रिया याविषयी वर्तमान कृतीमध्ये वाचून झाल्यावर परत येऊन हे परिशिष्ट पुन्हा एकदा वाचावे. यामुळे फियेट पैसा समजणे आणखी सोपे होईल कारण पैशाचे हे स्वरूप व्यवस्थितरीत्या आणि आपल्या विशिष्ट भांडवली स्वरूपामध्ये भांडवल संचयाच्या एका विशिष्ट टप्प्यावर पोहोचल्यानंतरच अस्तित्वात येते.

(पुढील अंकात चालू)

(मूळ लेख: मजदूर बिगुल, जून 2023.
मराठी अनुवाद: जयवर्धन)

## डोनाल्ड ट्रम्प यांची सत्तेत परतणी: कामगार वर्गासाठी धोक्याचे निहितार्थ

पान 14 वरून

चळवळीतून नव्हे, तर व्यवहार्य क्रांतिकारी पर्यायाचा अभाव आणि गहन होत जाणाऱ्या आर्थिक संकटाच्या उपस्थितीतून एका उत्स्फूर्त प्रतिक्रियावादी भावनेतून तयार होत आहे. शिवाय, ट्रम्पला पाठिंबा देणारी पद्धतशीर फॅशिस्ट विचारसरणी असलेली कोणतीही केडर-आधारित फॅशिस्ट संघटना नाही. कू-क्लक्स क्लॅनसारख्या अनेक संघटनांचे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात ट्रंपचे समर्थक आहेत, परंतु तरीही ते मिळून एक संघटित चळवळ नाहीत. ट्रंप रिपब्लिकन पक्षाच्या सर्वात उजव्या विचारसरणीच्या गटाचे प्रतिनिधित्व करतो, जो फॅशिस्ट नव्हे तर परंपरावादी बुर्झ्वा पक्ष आहे. इलोन मस्कच्या भ्याड नाझी सलामातून अधिकारशाहीची प्रतिक्रियावादी महत्वाकांक्षा दिसते, एका संघटित चळवळीचे अस्तित्व नव्हे.

त्याचप्रमाणे, जरी ट्रम्प यांच्या भाषणांमध्ये वारंवार उजव्या विचारसरणीच्या विचाराचा समावेश दिसत असला तरी, त्यांच्या विचारसरणीला फॅशिस्ट म्हटले जाऊ शकत नाही. “मेक अमेरिका ग्रेट अगेन” या घोषणेतून साम्राज्यवादी शक्ती म्हणून अमेरिकेच्या घटत्या जागतिक वर्चस्वामुळे बनलेली अमेरिकन सत्ताधारी वर्गाची अंधराष्ट्रवादी निराशा प्रतिबिंबित होते. तथापि, ट्रंप किंवा रिपब्लिकन पक्ष एक पूर्णपणे वैचारिक समुदाय तयार करीत नाहीत किंवा काल्पनिक शत्रू तयार करत नाहीत, जे फॅशिस्ट विचारसरणीचे वैशिष्ट्य आहे.

या कारणांमुळे, ट्रम्पला फॅशिस्ट म्हणून विशेषण लावण्याने त्याच्या चळवळीचे स्वरूप अचूकपणे पकडले जात नाही. हे शक्य आहे की भविष्यात एक फॅशिस्ट चळवळ उद्भवू शकते, जी एका पद्धतशीर फॅशिस्ट विचारसरणी असलेल्या केडर-आधारित संघटनेच्या नेतृत्वात असेल, पण ट्रम्प किंवा त्याच्या सध्याच्या राजकारणाला या टप्प्यावर फॅशिस्ट म्हणणे चुकीचे ठरेल.

जागतिक अर्थव्यवस्था वेगाने संकटात जात असताना, अति-उजव्या नेत्यांचा आणि सरकारांचा उदय होताना दिसत आहे. एका क्रांतिकारी पर्यायाच्या अनुपस्थितीत, या वाढत्या अनिश्चिततांना वापरून प्रतिक्रियावादी शक्ती जनतेचे लक्ष खऱ्या गुन्हेगारांपासून, म्हणजे भांडवलदार वर्ग आणि भांडवली व्यवस्थेपासून दूर भटकवण्यात यशस्वी होत आहेत. हे समजणे गरजेचे आहे की आता, मरणासन्न झालेली भांडवलशाही आता फक्त हवामान संकट, दीर्घकाळ आर्थिक अस्थिरता आणि युद्धेच तयार करू शकते. म्हणूनच, मानवतेपुढे आता समाजवाद आणि पाशविकता यापैकी एकाची निवड आहे या रोजा लक्झमबर्गच्या प्रसिद्ध दाव्यात बदल करून म्हणावे लागेल की आज आपल्यापुढे समाजवाद किंवा विनाश अशी निवड आहे. ट्रम्प आणि मोदी सारखे नेते जगाला वेगाने विनाशाकडे नेत आहेत.

## सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण

पान 4 वरून

गेवराई पोलिस कर्मचारी पुढील निवडणुकीच्या हंगामात “कर्तबगारीने” काम करताना दिसतात. हे योगायोग नाहीत तर राजकीय पक्ष आणि माफिया यांच्यातील युती आहे.

या सर्वांचा परिणाम म्हणजे बीडमधील गुन्हेगारीचे “राजकीयकरण”. वाळू माफिया आता केवळ ट्रॅक्टर चालवणारे गुंड नाहीत, तर सत्तेचे अधिकृत भागीदार आहेत. यांचा निवडणुकीत उमेदवार निवडीवर प्रभाव असतो, आणि पोलिसांना नियमित ‘पाकीट’ पुरवले जातात आणि प्रशासनाचे नियम सर्व मोडीत काढून अधिकाऱ्यावर वचक ठेवला जातो; गरज पडेल तेव्हा दहशत माजवली जाते, असे हे चित्र उभे राहिले आहे.

### बीड मधील राजकीय आश्रित संघटित संघटित गुन्हेगारीला आणि सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येला जबाबदार कोण?

मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या केवळ व्यक्तिगत वैराचा भाग नाही, तर बीडमधील भ्रष्ट राजकारण, संघटित गुन्हेगारी आणि अवैध अर्थकारणाचा परिणाम आहे. परळी औष्णिक ऊर्जा प्रकल्पातील राखेच्या अवैध व्यवसायापासून वाळू माफियांच्या दहशतीपर्यंत, येथे सत्ताधाऱ्यांच्या आश्रयाने गुन्हेगारीचं एक मजबूत जाळं उभं राहिलं आहे. प्रशासन एकीकडे निष्क्रिय आणि हतबल आहे, तर दुसरीकडे राजकीय आश्रित संघटित गुन्हेगारीला सहायक म्हणून काम करत आहे. सत्ताधारी नेत्यांचे गुन्हेगारी टोळ्यांशी असलेले संबंध हेच या परिस्थितीचं मूळ कारण आहे. गुन्हेगार केवळ स्थानिक नाहीत, तर त्यांना राजकीय वरदहस्त आणि पोलिस प्रशासनाचं संरक्षण आहे. बीडमध्ये सत्ता, पैसा आणि गुन्हेगारी यांचं साटेलोटे प्रचंड बळकट झालं आहे. त्यामुळे संतोष देशमुख यांची हत्या हा अपवाद नाही, तर भीषण वास्तवाचं जळजळीत चित्र आहे.

### बीड मधील या परिस्थितीला जबाबदार कोण?

याचे उत्तर स्पष्ट आहे की, बीडमधील वाढत्या गुन्हेगारीला धनंजय मुंडे, सुरेश धस यासारख्या राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप नेत्यांचा आश्रय आहे. इतिहास तपासल्यास दिसून येईल की काँग्रेस, शिवसेनेसारख्या इतर प्रमुख भांडवली पक्षांनी सुद्धा आपापले स्थानिक गुंड पोसलेले आहेतच. राज्य सरकारद्वारे संचालित पोलिस यंत्रणा आणि अधिकारी वर्ग यात सहभागी आहेत, आणि वरपर्यंत पोहोचलेल्या हितसंबंधांशिवाय ही संघटित गुन्हेगारी शक्य नाही.

### या गुन्हेगारीचे भांडवली व्यवस्थेत स्थान काय ?

अनेकांना वाटते की अशाप्रकारची गुंडगिरी ही भांडवली व्यवस्थेच्या चौकटीत “बेकायदेशीर” आहे, आणि तिला या व्यवस्थेच्या चौकटीत संपवले जाऊ शकते. परंतु अमेरिकेतील माफिया पासून ते दक्षिण अमेरिकेतील ड्रग कार्टेल पर्यंत आणि रशिया-युरोपियन देशांमधील खाजगी सेनांपासून ते म्यानमारमधील सैनिकी सत्तेने पोसलेल्या गुंडांपर्यंत आणि पुण्यासारख्या शहरात असलेल्या “मुळशी पॅटर्न” पर्यंत सर्वत्र दिसून येते की धनिक वर्गाने पोसलेल्या कायदाबाह्य संघटित सशस्त्र शक्ती ही सामान्य बाब आहे. गुंडशाही ही भांडवली व्यवस्थेची अंगभूत बाब आहे. “कायद्याची चौकट”, “कायद्याचे राज्य” या गोष्टी तोपर्यंतच कामाच्या आहेत जोपर्यंत त्या मेहनत करणाऱ्या वर्गांना दाबण्यासाठी उपयुक्त आहेत. जर त्या दमनात अडथळा बनत असतील तर त्याकरिता खाजगी गुंडसेना हव्यातच. यापुढे जाऊन भांडवलदार वर्गाच्या विविध हिश्श्यांमध्ये सुद्धा आपसात धंद्याचे, म्हणजे लुटीच्या वाटणीचे अंतर्विरोध असतात, जे देशांमधील युद्धांपासून ते गृहयुद्ध आणि स्थानिक पातळीवर गँगवॉरचे रूप घेऊन समोर येतात. राज्यसत्तेचे कामच भांडवलदार वर्गाच्या हितांचे रक्षण असल्यामुळे, याच सत्तेचे भाग असलेल्या पोलिस, अधिकारी वर्ग आदींना चांगलेच माहित असते की “रक्षण” कोणाचे करायचे आहे; त्यामुळे या भांडवलदारांमधील आपसातील झगड्यात आणि कामगार वर्गाविरोधात वापरल्या जाणाऱ्या गुंडसेनांसोबत हातमिळवणीच केली जाते; संतोष देशमुखासारख्या प्रतिष्ठित व्यक्तीच्या खुनावेळी जनदबावामुळे वरवर कारवाया केल्या जातात परंतु निर्णायक घाव घातलाच जात नाही, कारण सर्व एकाच व्यवस्थेचे भाग आहेत. कामगार-कष्टकऱ्यांचे जेव्हा जीव घेतले जातात, तेव्हा तर अनेकदा दखलही घेतली जात नाही. खऱ्या अर्थाने न्यायाचे राज्य आणण्याचे काम आता कामगार-कष्टकरी वर्गाच्या क्रांतिकारी आंदोलनालाच करावे लागणार आहे.

## एसआरए योजना: आवासाच्या अधिकारासाठी नाही, तर बिल्डरांच्या नफ्यासाठी!

पान 24 वरून

सदनिका विकण्याचे किंवा भाड्याने देऊन परत झोपडपट्टीमध्ये जाण्याचे प्रमाणही भरपूर आहे. त्यामुळे झोपडपट्ट्यांना शहराच्या बाहेर फेकण्याची आणि नव्या झोपडपट्ट्या बनण्याची प्रक्रिया निरंतरपणे सुरू आहे. आवासाच्या अधिकाराला बिल्डर लॉबीच्या दयेवर सोडून राज्य सरकारने त्यातून आपली जबाबदारी झटकली. मुंबईतील 40 लाख झोपडीधारकांना सदनिका देण्याच्या नावाखाली आणली गेली एसआरए योजना आज ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर या शहरांतील मोक्याच्या जागांवर असलेल्या झोपडपट्ट्यांना उभ्या करून, अनेकांना शहराबाहेर फेकून देऊन उर्वरित जमीन बिल्डरांच्या घशात घालणारी योजना म्हटले तरी काही अतिशयोक्ती होणार नाही.

त्यामुळे आज एसआरएसारख्या योजनेची नाही तर आवासाच्या अधिकारावर बोलण्याची गरज आहे, जो लाभार्थ्यांसाठी कल्याणकारी योजना म्हणून नाही, तर प्रत्येकाला मूलभूत अधिकार म्हणून लागू होईल. 2022च्या एका अहवालानुसार भारताच्या शहरी भागातील 41% लोक झोपडपट्टीतील असुरक्षित व मानवी आरोग्य व प्रतिष्ठेच्या दृष्टिकोणातून अत्यंत निकृष्ट घरांमध्ये राहत आहेत, जेव्हा की शहरी भागामध्ये रिकाम्या घरांचे प्रमाण 12.3% आहे. 74 वर्षाच्या स्वातंत्र्यानंतरही आवासासारखा अत्यंत मूलभूत अधिकार जनतेला अजूनही मिळू शकलेला नाही. जी कष्टकरी जनता या देशातील सर्व संपत्ती आणि सुविधांचे उत्पादन करते, तिलाच आवासाच्या अधिकारापासून वंचित ठेवले गेले आहे. भांडवली व्यवस्थेमध्ये प्रत्येक वस्तूचे बाजारीकरण होत असते. घरांची सुद्धा तीच स्थिती आहे. जमीन ही एक नैसर्गिक संसाधन आहे. ती बनवण्यासाठी कोणालाही मेहनत घ्यावी लागली नाही. जसे निसर्गातील हवा, प्रकाश, समुद्रातील पाणी सर्वांसाठी उपलब्ध आहे, तसेच जमिनीवरसुद्धा सर्व जनतेची सामूहिक मालकी असायला पाहिजे. परंतू भांडवली व्यवस्थाच खाजगी मालकीवर टिकली आहे, त्यामुळे जमीन मिळवण्यासाठी आणि त्यावर बांधकाम करून नफा कमवण्यासाठी जमिनीच्या वितरणाची एक कार्यक्षम यंत्रणा भांडवलदार वर्गाच्या सरकारांनी बनवून ठेवली आहे. तिला राबवण्यासाठी आणि खाजगी मालकीवर गदा येऊ नये म्हणून पोलीसबळाचा वापर केला जातो.

आज आवासाचा अधिकार खऱ्या अर्थाने मिळवण्यासाठी खाजगी संपत्ती नष्ट केल्याशिवाय कोणताच पर्याय उरलेला नाही. आवासाचा अधिकार न मिळणे हे या व्यवस्थेचे अपयश आहे, जे लपवण्यासाठी आणि ही व्यवस्था अधिक काळ टिकवण्यासाठी एसआरए, प्रधानमंत्री आवास योजना यांसारख्या तोकड्या योजना राबवल्या जातात. जोपर्यंत समाजात उत्पादनाची साधने आणि वितरण खाजगी हातांमध्ये असेल, तोपर्यंत आवासाच्या प्रश्नावर तोडगा नाही. त्यासाठी आपल्याला ह्या व्यवस्थेच्या बेड्या तोडून तिला उघडं पाडण्याचे सर्व प्रयत्न करावे लागतील. भांडवली व्यवस्थेत कामाची कसलीही शाश्वती नसल्यामुळे काम मिळेल त्या ठिकाणी भोगवट्याच्या आधारावर आवासाचा अधिकार मिळालाच पाहिजे, कष्टकरी-कामगार जनतेने बनवलेली रिकामी पडलेली घरं ताब्यात घेऊन ती गरजूंना द्या ही आज आपली मागणी बनली पाहिजे. प्रत्येक व्यक्तीला सरकारी घरकुल मिळेल हा मूलभूत अधिकार स्थापित होईल, आणि जमिनीचे राष्ट्रीयीकरण केले जाईल या मागण्या उचलणाऱ्या एका क्रांतिकारी आंदोलनाशिवाय सर्वांना पुरेशी मोठी, दर्जेदार, हक्काची घरकुले मिळणे शक्य नाही.

# साम्राज्यवादी स्पर्धेत भरडली जात आहे सीरियाची जनता

✍ राहुल साबळे

2024 सालाच्या अखेरीस जागतिक राजकारणात एक उल्लेखनीय घटना घडली जिने साऱ्या जगाचे ध्यान खेचले ती म्हणजे मध्य आशियातील सीरिया देशात झालेला सत्तापालट. गेली 40 वर्षे सत्तेवर असलेले बशर अल-असदचे सरकार तेथील ‘बंडखोर’ गटांनी बघता बघता एका आठवड्यात पालटून टाकले. बशर अल-असद हा तोच नेता आहे जो सन 2000 पासून सिरीयात एकाधिकारी सत्ता चालवत होता; ज्याने सत्तेत आल्यापासून नागरी अधिकारांसाठी, लोकशाहीसाठी, भ्रष्टाचाराविरोधात आवाज उठवणाऱ्या जनतेची अमानुषपणे दडपणूक केली; शेकडोंना तुरुंगात डांबले, जनतेवर केमिकल बॉम्ब टाकले, हजारो लोकांचा बळी घेतला. या विरोधात 2011 पासून सीरियामध्ये गृहयुद्ध सुरु होते, ज्यात लाखो लोकांना देशातून पलायन करावे लागले, लाखो लोक मारले गेले. 2024 च्या 8 डिसेंबरला बशर अल-असदने सीरियातून पलायन केल्यानंतर, त्याविरोधात सशस्त्र लढा उभारणाऱ्या हयात तहरीर अल-शाम या इस्लामी मूलतत्त्ववादी संघटनेचा नेता, आणि पूर्वी अल-कायदा या दहशतवादी संघटनेसोबत जोडलेला अहमद अल-शराआ उर्फ अबु महमद अल-जलानी या नेत्याने सीरियाचा अंतरिम राष्ट्राध्यक्ष म्हणून कार्यभार स्वीकारला. प्रत्यक्षात पाहता सीरियातील सत्तेचा वाटा विविध सशस्त्र गटांमध्ये विभागलेला आहे. त्यामध्ये इस्लामी लष्करी गट, स्थानिक जमातींच्या सशस्त्र टोळ्या, तसेच असद सरकारमधून फूटून बाहेर पडलेले लष्करी गट यांचा समावेश आहे.

असद गेल्यानंतर थोड्या काळासाठी सीरियन जनतेच्या एका हिश्श्यापुढे भविष्याचे भ्रामक स्वप्न उभे झाले होते, लोकशाही सरकार स्थापन होण्याची आशा दिसू लागली होती परंतु तीन महिन्यातच वास्तव समोर आले आहे. मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात लताकिया जवळील जबलेह या शहरात माजी राष्ट्राध्यक्ष बशर अल-असद यांचे समर्थन करणाऱ्या बंडखोरांनी समन्वित हल्ला केला ज्यामुळे सिरीयात एका नव्या हिंसाचाराला सुरवात झाली. या हल्ल्यात सिरियन सुरक्षा दलांना लक्ष्य करण्यात आले आणि त्यात मोठ्या प्रमाणावर जीवितहानी झाली. त्याला प्रत्युत्तर म्हणून, सरकारी सैन्याने बशर-अल असद ज्या समुदायातून येतात, त्या अलवाइट लोकसंख्या असलेल्या भागांवर धडक कारवाया सुरू केल्या, त्यांच्यावर बंडखोरांना आश्रय दिल्याचा आरोप ठेवला. ज्याच्या परिणामी सिरीयाच्या किनारपट्टी भागात, विशेषतः लताकिया आणि टार्टस प्रांतांमधील 1000 हून अधिक नागरिकांचा मृत्यू झाल्याच्या बातम्या आल्या आहेत. हा हल्ला आणि प्रतिहल्ल्याचा साखळी प्रकार इतका वाढला आहे की त्याचे रुपांतर आता गृहयुद्धाकडे जाण्याच्या स्थितीत झाले आहे.

अहमद अल-शराआ यांच्या मते “आपण सध्या जे पाहत आहोत ते असद शासनाच्या उरलेल्या गटांचा देशात अस्थिरता निर्माण करण्याचा एक हताश प्रयत्न आहे. आमचे सुरक्षा दल या दहशतवादी गटांना संपवण्याचे काम करत आहेत आणि देशात शांतता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. दुर्दैवाने, या दहशतवाद्यांनी सुरू केलेल्या हिंसाचारात सामान्य नागरिक अडकले गेले आहेत.” याउलट रामी अब्दुलरहमान जे सीरियन ऑब्झर्व्हेटरी फॉर ह्युमन राईट्स चे संचालक आहेत सांगतात की “हे बंडखोरांविरुद्धचे युद्ध नाही; हे सामान्य नागरिकांविरुद्ध चालवलेले युद्ध आहे. आपण जे पाहतो आहोत ते म्हणजे अलवाइट समुदायांना लक्ष्य करणाऱ्या जातीय हिंसेचे जाणीवपूर्वक राबवलेले अभियान आहे, कारण सरकार त्यांना असद समर्थक म्हणून पाहते.”






सिरीयात परत एकदा अशांती पसरली आहे. सीरियाची जनता पुन्हा एकदा भीतीच्या वातावरणात जगत आहे. अनेक जण पलायन करत आहेत. आज सीरिया भीषण मानवीय आणि आर्थिक संकटाचा सामना करत आहे, जिथे 90 टक्के हून अधिक लोक दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत आहेत आणि सततची हिंसा व आर्थिक पतनामुळे 60 टक्के पेक्षा अधिक लोक बेरोजगार आहेत. देशात विस्थापनाचाही गंभीर प्रश्न आहे, कारण 6.8 दशलक्ष सीरियन नागरिक परदेशात निर्वासित म्हणून राहत आहेत, तर सुमारे 7 दशलक्ष नागरिक देशांतर्गत विस्थापित झाले आहेत, आणि त्यांना सततच्या लढायांमुळे आपल्या घरांपासून दूर राहण्यास भाग पडले आहे.

या संघर्षामागे कशाप्रकारे अमेरिका आणि रशिया-चीन या साम्राज्यवादी अक्षांचा संघर्ष काम करत आहे, आणि यात सिरीयातील जनता कशी भरडली जात आहे, हे पाहूयात. त्या अगोदर या लेखात आपण सीरियाच्या इतिहासाचा आणि राजकारणाचा थोडक्यात आढावा घेणार आहोत.

## प्राचीन सीरिया

प्राचीन काळापासून सीरिया मानवाच्या सभ्यतेचे एक केंद्र राहिले आहे. मध्य आशियातील सुपीक जमिनीचा तो एक भाग आहे आणि सुमारे ईसपू 10,000 पासून सीरिया नवपाषाण संस्कृतीचे आणि जगातील काही पहिल्या नागरी केंद्रांचे घर होते. येथे जगात प्रथमच शेती आणि पशुपालनाची सुरुवात झाली असेही म्हटले जाते. प्राचीन सीरिया अनेक शक्तिशाली साम्राज्यांच्या अधिपत्याखाली होता, ज्यामध्ये सुमेरियन, अक्काडियन, असीरियन, बाबिलोनियन, इजिप्शियन आणि हिट्टाइट्स यांचा समावेश होता.

पुरातन काळापासून पाहिले तर सीरिया पहिल्या पर्शियन साम्राज्याचा भाग बनला, त्यानंतर ईसपू 333 मध्ये अलेक्झांडर द ग्रेटने त्यावर विजय मिळवला. नंतर, तो रोमन साम्राज्याचे प्रांत बनला आणि त्यानंतर बायझंटाईन साम्राज्याचा भाग झाला. ईस 636 मध्ये मुस्लिम अरब सैन्यांनी सीरियावर विजय मिळवला आणि तो इस्लामिक खिलाफतीचा एक भाग बनला. दमास्कस हे उमय्यद खिलाफतीच्या (ईस 661–750) राजधानीचे शहर बनले. ‘धर्मयुद्धा’च्या काळात सीरियावर अनेक आक्रमणे झाली, 13व्या शतकात मंगोलांच्या आक्रमणामुळे सीरियाचा मोठ्या प्रमाणात विध्वंस झाला. 1516 मध्ये सीरिया ऑटोमन साम्राज्याचा भाग बनला आणि 400 वर्षांहून अधिक काळ ऑटोमन अधिपत्याखाली राहिला. या काळात सीरिया अरब जगतातील एक महत्त्वाचे सांस्कृतिक आणि व्यापारी केंद्र बनला होता.

## फ्रेंच साम्राज्यवादाच्या अधिपत्याखालील सीरिया

पहिल्या महायुद्धानंतर आणि ऑटोमन साम्राज्याच्या पतनानंतर, ब्रिटन आणि फ्रान्सध्ये सायक्स-पिको करार (1916) झाला ज्यामध्ये मध्य-पूर्वेतील ऑटोमन भूभागांचे विभाजन करण्यात आले. 1920 मधील सान रेमो परिषदेत फ्रान्सला सीरियावर अधिपत्य गाजवण्याचा अधिकृत ठराव पारित झाला, ज्याचा सीरियन लोकांनी तीव्र विरोध केला होता. त्यांना संपूर्ण स्वातंत्र्याची अपेक्षा होती कारण त्यांनी महायुद्धात मित्रपक्षांना पाठिंबा दिला होता. परंतु फ्रान्सने सिरीयात सैन्यशक्ती वापरून आपले वर्चस्व प्रस्थापित केले आणि मयसलुनच्या लढाईत (1920) सीरियन राष्ट्रवादी सैन्याचा पराभव केला. यानंतर सीरियावर फ्रेंच वर्चस्व सुरू झाले, ज्यामध्ये दमास्कस, अलेप्पो, अलावाइट आणि ड्रूझ प्रदेश अशा धार्मिक आणि वांशिक विभागांमध्ये देशाचे विभाजन करण्यात आले. या धोरणाचा उद्देश भांडवली राष्ट्रवादी ऐक्य कमकुवत करून वांशिक आधारावर फाळणी करत फ्रेंच नियंत्रणाला मजबूत करणे होते.

फ्रान्सने साम्राज्यवादी धोरणांद्वारे सीरियाची लूट केली. सीरियातील नैसर्गिक संसाधने, विशेषतः गहू आणि कापूस यासारखी शेती उत्पादने निर्यातीसाठी वापरली. त्यांनी सीरियाच्या गरजांपेक्षा फ्रेंच आर्थिक हितासाठी रेल्वे आणि बंदरांसारख्या पायाभूत सुविधांना प्राधान्य दिले. जनतेवर कराचा बोझा लादला. सीरियन अर्थव्यवस्थेची आपल्या फायद्यासाठी फेररचना केली आणि सीरियाच्या आर्थिक व्यवस्थेवर नियंत्रण ठेवले. विशेषतः वस्त्रोद्योगासारख्या स्थानिक उद्योगांवर फ्रेंच आयातीमुळे प्रचंड परिणाम झाला. फ्रान्सने हुकूमशाही सरकार लागू केले, ज्यामध्ये सीरियन लोकांना अर्थपूर्ण राजकीय सहभागापासून वंचित ठेवले गेले. राजकीय कार्यकर्ते आणि राष्ट्रवादी नेत्यांना वारंवार अटक, देशबंदी किंवा फाशी दिली गेली.

## सीरियन जनतेचा स्वातंत्र्यासाठी संघर्ष

सीरियन लोकांचा फ्रेंच वर्चस्वाविरुद्धचा विरोध ठाम आणि सातत्यपूर्ण होता. 1925–1927 च्या काळात सिरीयात मोठा उठाव झाला. फ्रेंच राजवटीविरुद्धचे हे सर्वात मोठे बंड होते, ज्याचे नेतृत्व ड्रूझ नेते सुलतान अल-अत्राश यांनी केले. हे बंड ड्रूझ प्रदेशातून सुरू झाले, पण लवकरच दमास्कस आणि इतर शहरांपर्यंत पसरले, ज्यामुळे विविध वांशिक आणि धार्मिक गटांमध्ये एकता निर्माण झाली. जरी फ्रेंचांनी हे बंड क्रूर सैनिकी शक्ती वापरून चिरडून टाकले, तरी त्याने फ्रेंच राजवटीविरोधातील तीव्र असंतोष प्रकट केला. पुढे सीरियन राष्ट्रवाद्यांनी नॅशनल ब्लॉकसारख्या राजकीय संघटना स्थापन केल्या, ज्यांनी राजकीय आणि अहिंसात्मक मार्गांनी स्वातंत्र्याची मागणी केली. फ्रेंच धोरणांवर आणि ठरावाच्या विस्तारावर विरोध करणारी आंदोलने, संप आणि निदर्शने होत गेली. फ्रेंच सैन्य या आंदोलनांवर हिंसक कारवाई करत राहिले.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात सीरियाच्या स्वातंत्र्यलढ्याचा वेग वाढला. दुसऱ्या महायुद्धादरम्यान सीरिया एक महत्त्वाचे रणांगण बनला. 1941 मध्ये, फ्री फ्रेंच सैन्याने ब्रिटनच्या मदतीने ‘विची फ्रेंच’ सरकारला हटवले जे युद्धात हिटलरचे समर्थन करत होते आणि स्थानिक पाठिंबा मिळवण्यासाठी सीरियन स्वातंत्र्याचे आश्वासन दिले. फ्रान्सच्या जागतिक स्थानातील कमकुवतपणाचा आणि वसाहतिक धोरणांच्या विरोधातील आंतरराष्ट्रीय पाठिंब्याचा सीरियन राष्ट्रवाद्यांनी लाभ घेतला. 1945 मध्ये, फ्रेंच सैन्याने पुन्हा नियंत्रण प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला, ज्याला सीरियन लोकांनी तीव्र विरोध केला. यामुळे आंतरराष्ट्रीय दबाव निर्माण झाला. ब्रिटिश सैन्याने हस्तक्षेप केला, आणि संयुक्त राष्ट्रांनी सीरियाच्या स्वातंत्र्याला समर्थन दिले. 17 एप्रिल 1946 रोजी फ्रेंच सैन्य पूर्णपणे माघारी गेले, ज्यामुळे सीरिया स्वतंत्र झाला.

## सीरियातील स्वातंत्र्योत्तर अस्थिरतेचा काळ

स्वतंत्र सीरियाला एक स्थायी सरकार बनवण्यास खूप अडचणी आल्या. कारण सिरीयात विविध विचारांचे अनेक पक्ष अस्तित्वात होते जे फ्रांसच्या विरोधात एकत्र लढत होते पण स्वातंत्र्यानंतर देश चालवण्यावरून त्यांच्यात मतभेद होते. जसे की धर्मनिरपेक्ष आणि राष्ट्रवादी विचारसरणीची सिरियन सोशल नॅशनलिस्ट पार्टी जी अरब राष्ट्रवादाच्या विरोधात होती. मुस्लिम ब्रदरहूड नावाचा गट जो धर्मनिरपेक्षता, समाजवाद आणि हुकूमशाहीला विरोध करून इस्लामी राज्य स्थापन करण्याचा प्रयत्न करत होता. सोशलिस्ट बाथ पार्टी जी राष्ट्रवादी, सामाजिक-जनवादी विचारसरणीची पार्टी होती, आणि उद्योगांचे राष्ट्रीयीकरण आणि मर्यादित कामगार हक्कांना

पान 15 वर

# साम्राज्यवादी स्पर्धेत भरडली जात आहे सीरियाची जनता

पान 14 वरून

पाठिंबा देत होती, पण वर्ग-संघर्षाच्या विरोधात होती, आणि अरब-राष्ट्रवादी विचारांआधारे अरब राष्ट्रांचे राजकीय, सांस्कृतिक आणि आर्थिक ऐक्य स्थापित करण्यावर तिचा जोर होता. याशिवाय सिरियाची कम्युनिस्ट पार्टी होती जी मार्क्सवाद-लेनिनवादाच्या प्रभावातून वर्ग-संघर्ष आणि क्रांतीद्वारे उद्योगांचे राष्ट्रीयीकरण, जमीन पुनर्विभाजन आणि कामगार हक्कांचे समर्थन करत होती आणि साम्राज्यवाद व सामंतवादाच्या विरोधात होती. सीरियाच्या भांडवली राजकीय विभागणीत शिया आणि सुन्नी पंथांच्या विचारांचा मोठा आधार अस्तित्वात होता. परिणामी सिरियाने 1949 ते 1970 दरम्यान राजकीय अस्थिरतेचा मोठा कालखंड अनुभवला, ज्यात वारंवार लष्करी बंड करून सत्तापालट केले गेले. धर्मनिरपेक्ष, सामाजिक-जनवादी, राष्ट्रवादी आणि इस्लामी गटांमधील तणावामुळे सीरियातील लोकशाही सरकार नेहमीच अस्थिर राहिले. शेवटी 1963 मध्ये, अरब राष्ट्रवादी, सामाजिक-जनवादी बाथ पक्षाने सत्ता हाती घेतली, 1970 मध्ये हाफिज अल-असद सीरियाचे अध्यक्ष बनले आणि एकहाती सत्ता स्थापन केली.

## सिरीयात हाफिज अल-असदचे दुरुस्ती आंदोलन

1970 मधील सीरियातील दुरुस्ती आंदोलन हे 13 नोव्हेंबर 1970 रोजी हाफिज अल-असद याच्या नेतृत्वाखाली झालेले लष्करी बंडच होते, ज्याने सिरियाच्या इतिहासाला एक महत्त्वाचे वळण दिले. अल-असदने त्याचा बंडाला "दुरुस्ती आंदोलन" असे नाव दिले. या दुरुस्ती आंदोलनाने सिरियात राजकीय अस्थैर्याच्या काळाचा शेवट केला. सिरीयात हाफिज अल-असद यांच्या दीर्घकालीन अधिकारशाही राज्याच्या प्रारंभाला सुरवात केली. सत्ता काबीज केल्यानंतर, त्यांनी देशावर आपले नियंत्रण मजबूत केले, राजकीय स्पर्धकांना नष्ट केले आणि एक मजबूत, केंद्रीकृत सरकार स्थापन केले. कल्याणकारी सामाजिक-जनवाद हा बाथ पक्षाच्या विचारसरणीचा मुख्य घटक होता. असदच्या कारकिर्दीत त्याने काही सामाजिक-जनवादी धोरणे राबवली गेली, जसे की तेल, कृषी, आणि बँकिंग यासारख्या प्रमुख उद्योगांचे राष्ट्रीयीकरण; भू-सुधार ज्याद्वारे गरीब शेतकऱ्यांना जमीन पुनर्वाटप करण्याचा प्रयत्न केला गेला; आरोग्य, शिक्षण, आणि गृहनिर्माण सेवा जनतेला उपलब्ध करून देण्यासाठी कल्याणकारी योजना आणल्या. अर्थातच कोणत्याही कल्याणकारी राज्याप्रमाणेच या योजनांचा परिणाम जनतेच्या छोट्या हिश्श्यापर्यंतच मर्यादित राहिला. सत्ताधारी गट, विशेषतः जे शासनाशी निष्ठावान होते, त्यांना सर्वाधिक लाभ झाला, तर सामान्य नागरिकांच्या जीवनमानात फारसा सुधार दिसला नाही. सामाजिक-जनवादी धोरणांच्याच परिणामी श्रीमंत सत्ताधाऱ्यांमध्ये आणि समाजातील उर्वरित घटकांमध्ये आर्थिक अंतर वाढत गेले. भांडवलशाही अधिकाधिक बळकट होत गेली, जिथे असद कुटुंबीय आणि त्यांच्या निष्ठावान साथीदारांच्या मालकीच्या व्यवसायांना सरकारी संसाधनांवर विशेषाधिकार मिळत राहिला, तर अनेक सिरियन नागरिकांना आर्थिक संकटांचा सामना करावा लागला.

1970 च्या दशकाच्या शेवटी, समाजात वाढत्या असंतोषाविरोधात असद यांच्या नेतृत्वाखालील बाथ शासनाने सुद्धा जनतेत फूट पाडणाऱ्या पंथवादाचा मार्ग पकडला आणि सुन्नी-विरोधी धोरण अवलंबले. अधिकृत प्रचाराने 'आलावाइट' (एक शिया इस्लामिक पंथ, असद याच समुदायातून येत होता) शेतकऱ्यांना श्रीमंत सुन्नी जमीनदारांविरोधात भडकवले आणि नियमितपणे सुन्नी व्यापारी व उद्योगधंद्यांवर बंधने लादली. त्यांना राष्ट्रीयीकरणाचा आणि सामाजिक-जनवादी क्रांतीचा शत्रू म्हणून दाखवले. असद शासन आणि बाथ पक्षातील आलावाइट श्रीमंतांविरोधात सुन्नी बहुसंख्येत मोठ्या प्रमाणात तिरस्कार वाढला, ज्यामुळे कामगार वर्गीय क्रांतिकारी पर्यायाच्या अनुपस्थितीत इस्लामी प्रतिकाराचा उदय झाला. मुस्लिम ब्रदरहुडचे प्रमुख नेते, जसे इशाम अल-अत्तार, तुरुंगात टाकले गेले आणि निर्वासित केले गेले. पारंपारिक सिरियन सुन्नी उलेमाँ, मुस्लिम ब्रदरहुडचे आणि इस्लामी कार्यकर्त्यांचे एकत्रित समूह यांनी 1980 मध्ये सिरियन इस्लामिक फ्रंट स्थापन केला, ज्याचे उद्दिष्ट असदला जिहादद्वारे पाडून इस्लामिक राज्य स्थापित करणे होते. त्याच वर्षी, हाफिजने इराकशी चाललेल्या युद्धात इराणला अधिकृतपणे समर्थन दिले. यामुळे देशातील सामाजिक तणाव आणखी वाढला आणि 1982 च्या अखेरीस सिरीयात असद विरोधात व्यापक बंड सुरु झाले ज्याचे इस्लामिक फ्रंटने नेतृत्व केले. असद सरकारने हमा आणि अलेप्पोमध्ये विरोध करणाऱ्या सुन्नी नागरिकांचा नरसंहार केला आणि अनेक मशिदींवर बॉम्ब टाकले, ज्यात सुमारे 20000 - 40000 नागरिक मरण पावले. असदने स्वतःला नेहमीच पॅलिस्टिनियन लोकांचा रक्षक आणि मित्र म्हणून दाखवले; पण त्यांचे पॅलेस्टिनी जनतेसाठीचे समर्थन नेहमीच सिरियातील भांडवलदार वर्गाचे 'राष्ट्रीय हित', आणि स्वतःचे शासन टिकवण्याशी संबंधित होते. त्याने वारंवार इस्रायल आणि अमेरिकेच्या 'क्रोधापासून' वाचण्याचा निर्णय घेतला आणि पॅलेस्टिनी जनतेला तिच्या परिस्थितीवर सोडून दिले.

एकंदरीत पाहता हाफिज अल-असद यांच्या कारकिर्दीत सिरीयात काही काळासाठी स्थैर्य आणि आर्थिक प्रगती दिसून आली, पण लोकशाही स्वातंत्र्य, मानवाधिकार, आणि सामाजिक न्यायाला वेशीस टांगूनच. हाफिज अल-असदच्या मृत्यूनंतर सीरियाचे सरकार त्याचा मुलगा बशर अल-असद याच्या हातात आले. त्यानेसुद्धा वडिलांचा वारसा पुढे चालवत सिरीयात हुकूमशाही, केंद्रीकृत सरकार कायम ठेवले परिणामी सीरियात गृहयुद्धाला सुरवात झाली.

## बशर अल-असद च्या नेतृत्वात सीरिया आणि गृहयुद्ध

गृहयुद्ध सुरू होण्यापूर्वीच, सीरियाची जनता अंतर्गत बेरोजगारी, भ्रष्टाचार आणि राजकीय स्वातंत्र्याच्या अभावी त्रस्त झाली होती. 2010 मध्ये संपूर्ण अरबी जगात हुकूमशाही सरकार विरोधी उठावाची एक शृंखला सुरु झाली. ज्यात ट्युनिशिया आणि इजिप्तच्या जनतेने तेथील हुकूमशाही सरकारला उखडून फेकले. या उठावांतून प्रेरित होऊन सीरियातील जनतेने सुद्धा लोकशाही सत्तेसाठी शांततापूर्ण आंदोलनाला सुरवात केली. परंतु असदने दडपशाहीचा वापर केला, जनआंदोलकांवर प्राणघातक हल्ले केले, शांततापूर्ण आंदोलन चिरडून टाकले. परिणामी त्याच्या विरोधात देशभरात निदर्शने सुरू झाली. जनतेत असंतोष पसरत गेला आणि असदची दडपशाहीही तितकीच वाढली. शांततापूर्वक आंदोलनाने आता उग्र रूप धारण केले होते, असदच्या अनेक विरोधी गटांनी शस्त्र हाती घेतले होते. आधी स्वतःचे संरक्षण करण्यासाठी आणि नंतर भूभाग परत मिळवण्यासाठी असदने लढ्याला 'दहशतवाद' विरोधी संघर्षाचे स्वरूप दिले. इस्लामी मूलतत्त्ववादी आणि इतर अनेक विद्रोही गट निर्माण झाले, देशात गृहयुद्ध सुरु झाले. देशाच्या विविध भागात नेहमीच वेगवेगळ्या शक्तींचे वर्चस्व राहिले. इराण, सिरीया व तुर्कस्थानच्या सरकारांविरोधात एकत्र लढत स्वतंत्र कुर्दीस्तानकरिता लढणाऱ्या कुर्द स्वातंत्र्यलढ्याचाही एका भागावर कब्जा राहीला. या पार्श्वभूमीवर एकीकडे अमेरिकन साम्राज्यवादी शक्ती आणि दुसरीकडे उभारी घेणारी चीन-रशियाकृत साम्राज्यवादी शक्तींनी या संघर्षात पैसे, शस्त्रास्त्र आणि लढवय्ये पाठवून आपले हित पुढे ढकलणे चालू ठेवले. या गृहयुद्धात कट्टरपंथी जिहादी संघटनाही, जसे की इस्लामिक स्टेट (आयएस) गट आणि अल-कायदा, सामील झाले होते. परंतु या गृहयुद्धात भरडली गेली ती सीरियाची सामान्य जनता.

12 वर्षे सुरु असलेल्या या गृहयुद्धात सुमारे 6 लाखांहून अधिक नागरिकांचा बळी गेला आहे. सीरियाच्या युद्धापूर्वीच्या 22 दशलक्ष लोकसंख्येपैकी पंधरा टक्के लोक विस्थापित झाले आहेत. 6.8 दशलक्ष लोक देशाच्या आत विस्थापित झाले असून 2 दशलक्षहून अधिक लोकांना राहुट्यात राहावे लागले आहे. 6 दशलक्ष सीरियन नागरिक परदेशात शरणार्थी किंवा आश्रयार्थी झाले. लेबनान, जॉर्डन आणि टर्की देशांत 5.3 दशलक्ष सीरियन शरणार्थी राहत आहेत. 2013 च्या सुरुवातीला, 15.3 दशलक्ष लोकांना सीरियामध्ये मानवीय मदतीची आवश्यकता होती. 12 दशलक्ष सीरियन नागरिकांना उद्याचे जेवण मिळेल याची शाश्वती राहिली नव्हती. 2013 मध्ये, तुर्कीच्या गाझियांतेप जवळ झालेल्या भूकंपामुळे तेथील मानवीय परिस्थिती अधिक वाईट झाली होती. या भूकंपात 5900 पेक्षा जास्त लोक मरण पावले आणि 8.8 दशलक्ष लोक प्रभावित झाले. हजारो घरे आणि महत्त्वाची पायाभूत सुविधांची नासधूस झाली, ज्यामुळे अनेक लोकांना मूलभूत गरजा मिळणे कठीण झाले. सीरियामध्ये खाद्यान्न आणि इंधनाच्या किमती आधीच वाढत होत्या, कारण चलनाची किमत घटली होती आणि महागाई वाढली होती. आरोग्य सुविधा अत्यंत मर्यादित होती, कारण देशातील केवळ अर्धी रुग्णालयेच पूर्णपणे कार्यरत होती. 600 हून अधिक वैद्यकीय सुविधांवर हल्ले झाल्याची नोंद झाली आहे, ज्यामुळे 942 वैद्यकीय कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्याचा आकडा आहे.

वरील दिलेल्या आकड्यांवरून सीरियातील जनतेला किती भीषण परिस्थितीचा सामना करावा लागला असेल याचा अंदाज येतो. परंतु 53 वर्षे असद घराण्याने सीरियावर राज्य कसे केले आणि आठ दिवसांत बंडखोर गटांनी त्याचा तख्तापालट कसा केला, यामागे कोणते साम्राजवादी देश काम करत होते आणि सीरियाच्या राजकारणात त्यांचे कोणते हित गुंतले आहे हे समजून घेऊयात.

## सिरियातील संघर्ष: साम्राज्यवादी शक्तींच्या आर्थिक-राजकीय स्वार्थांचे गणित

सिरियातील पाच दशकं चाललेल्या युद्धाने लाखो लोकांचे जीवन उद्ध्वस्त केले, पण जागतिक साम्राज्यवादी देशांसाठी हा एक मोठा आर्थिक आणि भू-राजकीय संधीचा खेळ बनला आहे. अमेरिका-ब्रिटनच्या नेतृत्वातील साम्राज्यवादी अक्ष ज्यासोबत तुर्कस्तान, इस्रायल, आखाती देश (यूएई, सौदी अरेबिया, कतार) जोडलेले आहेत, ज्यांनी विविध इस्लामिक मूलतत्त्ववादी गटांना शस्त्र आणि पैसे पुरवले आहेत; तसेच रशिया-चीनच्या नेतृत्वातील साम्राज्यवादी अक्ष ज्यासोबत इराण, असद सरकार, लेबनन मधील हिजबोल्लाह सारखे गट जोडलेले आहेत. या दोन्ही साम्राज्यवादी गटांचा संघर्ष सतत होत राहिला आहे. साम्राज्यवादी शक्तींनी आपले आर्थिक हितसंबंध कसे जपले आहेत ते काही उदाहरणांमधून बघूयात.

## रशिया: लष्करी आणि ऊर्जा क्षेत्रातील प्रचंड नफा

2021 पासून रशियाने सिरियामध्ये 50 अब्ज डॉलरहून अधिक लष्करी खर्च केला आणि दीर्घकालीन लाभ मिळवले जसे की टार्टस बंदर आणि लाटाकिया हवाई तळावर कायमस्वरूपी ताबा, ज्याद्वारे भूमध्य समुद्रातील नौदल वर्चस्व राखण्यात सहाय्य झाले. रशियन तेल कंपन्यांना (स्ट्रॉय-ट्रासगॅझ, गॅझप्रॉम, सोयुझ्न-नेफ्तेगाझ) सिरियाच्या तेल व वायू क्षेत्रात मोठे करार मिळाले. 2020 मध्ये, रशियाने सिरियातील 25 टक्के तेल व वायू क्षेत्राचे व्यवस्थापन हस्तगत करण्याचा करार केला. असद सरकारला पुरवलेली शस्त्रास्त्रे (7 अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त किंमत) युद्धानंतर ताब्यात ठेवण्याचा हक्क दिला. एकंदरीत भूमध्य समुद्रात रशियाचा कायमस्वरूपी सैन्य तळ, शस्त्रास्त्र विक्रीतून मोठा फायदा, आणि सिरियाच्या तेल व वायू स्रोतांवर नियंत्रण मिळाले.

## इराण: 'शिया क्रीसेंट' आणि अब्जावधी डॉलरचे वर्चस्व

रशिया-चीन प्रणित साम्राज्यवादी अक्षाचा प्रमुख हिस्सा असलेल्या इराणने सिरियामध्ये 30 अब्ज डॉलरहून अधिक गुंतवणूक केली. याशिवाय त्यांनी सीरियात 50,000 हून अधिक इराणी सैन्य आणि हिजबुल्ला लढवय्ये तैनात केले. असद सरकारला तेल पुरवण्यासाठी दीर्घकालीन करार केले. युद्ध संपल्यानंतर इराणी कंपन्यांना तेल, वीज आणि बांधकाम प्रकल्पात सिरियात प्रमुख प्रकल्प दिले गेले.

## अमेरिका: कुर्द आणि तेल नियंत्रणातून अब्जावधी डॉलरचा फायदा

अमेरिकेने सिरियात 2.5अब्ज डॉलर्स हून अधिक सैन्य-खर्च केला आहे. परिणामी सिरियाच्या उत्तरेतील 70 टक्के तेल साठे

पान 13 वर

## 2024 - फॅशिस्ट भाजप-संघाच्या यंत्रणेच्या विखारी भाषणे आणि धर्मवादाने माखलेले वर्ष

पान 15 वरून

बनली आहे. हिंदुत्ववादी गट ज्या क्रूरतेने हिंसाचार करत होते, तिही वाढत चालली आहे.

वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर, भाज्या आणि गॅस सिलिंडरसारख्या सामान्य वस्तूंच्या किमती वाढत आहेत. प्रत्येक क्षेत्रात भ्रष्टाचाराचे नवे नवे विक्रम प्रस्थापित होत आहेत. भारत हा जागतिक स्तरावर युवा बेरोजगारीमध्ये आघाडीच्या देशांपैकी एक म्हणून नोंदवला जात आहे. या मुद्द्यांवर जनतेला एकत्र येण्यापासून रोखण्यासाठी, आपल्याला धर्माच्या आधारावर लढण्यास सांगितले जात आहे. लव्ह जिहाद, लँड जिहाद, थूक जिहाद, यूपीएससी जिहाद सारखे मुद्दे उपस्थित करून वाढती महागाई, बेरोजगारी, निरक्षरता, खाजगीकरण, पर्यावरणीय संकट, भ्रष्टाचार इत्यादीसारख्या खऱ्या समस्यांपासून जनतेचे लक्ष विचलित केले जात आहे! मुस्लिमांच्या नावाखाली एक बनावट शत्रू आपल्या सर्व समस्यांसाठी जबाबदार म्हणून उभा केला जात आहे. त्यांना धार्मिक विषाचा अतिरेक केला जात आहे जेणेकरून फूट आणखी वाढेल. भांडवलदार वर्ग आणि त्याची सेवा करणारी भांडवली सत्ताच सामान्य जनतेच्या दुःख, असुरक्षितता, लूट आणि लूटमारीसाठी जबाबदार आहेत. म्हणूनच, केवळ अल्पसंख्याक मुस्लिमच नाही तर ट्रेड युनियन्स, कम्युनिस्ट, आकुंचन पावत चाललेल्या लोकशाही नागरी हक्कांविरुद्ध आवाज उठवतारे कार्यकर्ते, यांनाही 'राष्ट्रविरोधी' म्हणत शत्रूरूपी प्रस्तुत केले जात आहे.

आज, संघाच्या या अजेंड्याला हाणून पाडण्यासाठी, सामान्य कामकरी आणि कामगार वर्गाला या बनावट मुद्द्यांमध्ये अडकण्याऐवजी त्यांचे खरे प्रश्न ओळखावे लागतील. यासोबतच, त्यांना या दंगलखोरांना आपल्या रस्त्यांवरून आणि परिसरातून बाहेर काढावे लागेल. कोणत्याही किंमतीत हिंदुत्ववादी फॅशिस्टांच्या अजेंड्याला अजेंड्याला बळी पडता कामा नये आणि हे देखील समजून घेतले पाहिजे की फॅशिझम धर्म, जात, पंथ, राष्ट्र इत्यादींचा वापर करतो आणि भांडवलाच्या शक्तींची उघडपणे सेवा करण्याच्या उद्देशाने जनतेची एकता तोडतो. जितक्या लवकर आपण त्याचे वास्तव समजून घेऊ, तितक्या लवकर आपण आपल्या विखुरलेल्या शक्तींना संघटित करू शकू आणि फॅसिझमचा निर्णायक पराभव करू शकू.

शहीद भगतसिंहाचे शब्द या काळात आठवणे अत्यंत गरजेचे आहे:

*“लोकांचे परस्परांशी होणारे झगडे थांबविण्यासाठी लोकांमध्ये वर्ग भावना रुजणे आवश्यक आहे. गरीब, कष्टकरी व शेतकरी यांना हे स्पष्टपणे समजावून सांगितले पाहिजे, की तुमचे खरे शत्रू भांडवलदार आहेत. म्हणून तुम्ही त्यांच्या हातचलाखीपासून स्वतःला शाबूत ठेवले पाहिजे. त्यांच्या तावडीत सापडून काहीही करता कामा नये. जगातील सर्व गोरगरिबांचे, मग ते कोणत्याही जातीचे, वर्णाचे, धर्माचे वा राष्ट्राचे असोत, अधिकार सारखे आहेत. धर्म, वर्ण, वंश आणि राष्ट्रीयतेचे भेदभाव संपवून तुम्ही एकजूट व्हावे आणि सरकारची शक्ती आपल्या हाती घेण्यासाठी प्रयत्न करावेत, यातच तुमचे भले आहे. या प्रयत्नांमुळे तुमचे काही एक नुकसान होणार नाही. उलट एक ना एक दिवस तुमच्या बेड्या तुटून पडतील आणि तुम्हाला आर्थिक स्वातंत्र्य मिळेल.”*

- 'धार्मिक दंगली आणि त्यावरील उपाय' मध्ये शहीद भगतसिंह

## साम्राज्यवादी स्पर्धेत भरडली जात आहे सीरियाची जनता

पान 15 वरून

अमेरिकन सैन्य आणि त्यांचे सहयोगी एस.डी.एफ. (सिरीयन डेमोक्रॅटीक फोर्सेस) यांच्या ताब्यात आहेत. 2019 मध्ये, अमेरिकेच्या डेल्टा क्रिसेंट एनर्जी या खासगी कंपनीला सिरियाच्या तेल शुद्धीकरणासाठी परवाना दिला गेला. “आयसीस विरोधी युद्ध” या नावाखाली अमेरिकी सैन्याने शस्त्रास्त्र निर्मात्या कंपन्यांसाठी मोठा नफा कमावला. एकंदरीत अमेरिकेने सिरियातील तेल व वायू उत्पादनाचा मोठा हिस्सा, आणि शस्त्रास्त्र विक्रीतून मोठा महसूल मिळवला आहे.

### तुर्कस्तान: कुर्दिश प्रभाव रोखण्यासाठी युद्ध आणि व्यापार

तुर्कस्तानने सिरियाच्या उत्तर भागात सैन्य तळ उभारले आणि 10 अब्ज डॉल्र्सहून अधिक खर्च केला आहे. परिणामी उत्तर सिरियातील तेल स्रोत तुर्कस्तानकडे पाठवले जातात आणि कमी किमतीत खरेदी केले जातात. तुर्की कंपन्या सिरियाच्या उत्तर भागात गृहनिर्माण आणि मूलभूत सुविधा प्रकल्प चालवत आहेत. याद्वारे कुर्दिश स्वातंत्र्याचा लढा रोखण्यासाठी सतत हल्ले आणि सैन्य कारवाई करण्याची मुभा सुद्धा तुर्कस्थानला मिळाली.

### संयुक्त अरब अमिराती (UAE) आणि आखाती देश

कतार, सौदी अरेबिया, आणि यूएई यांनी सुरुवातीला 15 अब्ज डॉलर्सहून अधिक खर्च करून असदविरोधी बंडखोरांना मदत केली. परंतु 2023 मध्ये यूएई आणि सौदी अरेबियाने असद सरकारशी आर्थिक संबंध सुधारले आणि पुनर्बांधणी प्रकल्पात गुंतवणूक केली आणि बांधकाम आणि व्यापार करारातून मोठा महसूल मिळवला.

### असादचा पाडाव - सीरियातील राजकारणाला निर्णायक वळण

असद सरकारचा 2024 च्या अखेरीस झालेला पाडाव हा देशांतर्गत संघर्ष, आर्थिक संकट, आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर रशिया, इराण, आणि युएई या मुख्य सहकाऱ्यांनी पाठिंबा मागे घेतल्याचा आणि अमेरिकेच्या धोरणात्मक भूमिकेचा एकत्रित परिणाम होता. अनेक वर्षे रशिया हा असदचा सर्वात मोठा लष्करी व राजकीय पाठीराखा होता, पण 2024 च्या मध्यापर्यंत युक्रेन युद्धामुळे निर्माण झालेल्या आर्थिक अडचणी, पाश्चिमात्य देशांच्या कडक निर्बंधांमुळे आणि देशांतर्गत वाढत्या विरोधामुळे रशियाने सीरियामधून जवळपास 40 टक्के लष्करी सल्लागार आणि लढाऊ दल मागे घेतले. रशियाच्या हवाई दलाच्या साहाय्याशिवाय आणि आधुनिक शस्त्रास्त्रांशिवाय असदची फौज युद्धभूमीवर कमजोर पडली.

त्याच वेळी, असदचा प्रमुख धार्मिक आणि लष्करी आधारस्तंभ असलेला इराणही आर्थिक संकट, देशांतर्गत बंडाळ्या, आणि अमेरिकेच्या निर्बंधांमुळे सीरियामधील मदत कमी करू लागला. इराणने अरब गार्ड (IRGC) आणि हिजबुल्लाहच्या हजारो लढाऊंना मागे घेतले, ज्यामुळे असदची जमिनीवरील लढाऊ ताकद ढासळली. युएईने, जी असदसोबत संबंध सुधारण्याचा प्रयत्न करत होती आणि पुनर्बांधणीमध्ये गुंतवणूक करत होती, तिनेही असदने इराण व हिजबुल्लाहशी संबंध तोडण्यास नकार दिल्यावर राजकीय व आर्थिक पाठिंबा थांबवला. इराणचा प्रभाव कमी करण्यासाठी आणि प्रादेशिक स्थैर्यासाठी युएईने गुपचूपपणे पर्यायी विरोधी गटांना पाठिंबा द्यायला सुरुवात केली.

दरम्यान, अमेरिकेने असदच्या राजवटीच्या पाडावात निर्णायक भूमिका बजावली. अमेरिकेने विखुरलेल्या सीरियन विरोधकांना — ज्यात मध्यममार्गी बंडखोर गट आणि कुर्दिश नेतृत्वाखालील 'सीरियन डेमोक्रॅटिक फोर्सेस' यांचा समावेश होता — एकत्र केले. अमेरिकेने प्रगत शस्त्रास्त्रं, गुप्तचर माहिती, आणि हवाई मदतीच्या माध्यमातून या गटांना असदच्या प्रमुख किल्ल्यांवर आक्रमण करण्यास सक्षम केलं. याचबरोबर, अमेरिकेच्या दबावामुळे सौदी अरेबिया व कतारने पुन्हा एकदा बंडखोरांना आर्थिक व लष्करी मदत दिली, ज्यामुळे विरोधक मजबूत झाले. अमेरिकेच्या दबावामुळे असद सरकारला कोणतीही आंतरराष्ट्रीय आर्थिक मदत मिळाली नाही, ज्यामुळे युद्धाने आधीच उद्ध्वस्त झालेली सीरियाची अर्थव्यवस्था पूर्णपणे कोसळली.

2024 च्या अखेरीस, देशांतर्गत उठाव, लष्करी पराभव, मोठ्या प्रमाणातील फौजी व अधिकाऱ्यांचे फरार होणे, आणि आर्थिक घसरण यास्थितीत हरक्त तहरीर अल-शाम (एच टी एस) या इस्लामिक कट्टरतावदी गटाच्या नेतृत्वातील सैन्याने हल्ला केला, दमास्कस ताब्यात घेतले आणि बशर अल-असदला देश सोडून पळून जावं लागले. असदच्या दशकांपासून सुरू असलेल्या हुकूमशाही राजवटीचा शेवट झाला.

### सीरियाचे अंतरिम सरकार आणि जनतेचे भविष्य

अंतरिम राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर अहमद अल-शरा यांनी सिरियाचा पुर्नविकास लोकशाही, सर्वसमावेशक आणि सार्वभौम राष्ट्र म्हणून घडवण्याचा आपला दृष्टिकोन मांडत दशकांपासून चालत आलेल्या असद राजवटीच्या हुकूमशाहीपासून दूर जाऊन, सिरियाला एक मुक्त आणि न्याय्य राष्ट्र बनवण्याचा संकल्प जाहीर केला आहे. तसेच सर्व पंथ/धर्मांप्रती समभावाचे धोरण मांडले आहे. परंतु या सरकारपुढे इस्लामिक मूलतत्ववादी विचारांच्या प्रभावाखाली वाढलेल्या एच.टी. एस सारख्या अनेक संघटनांना आणि या विचारावर पोसलेल्या सैनिकी गटांना ताब्यात ठेवत, देशातील धार्मिक-वांशिक विचारधारात्मक संघर्षांना ताब्यात ठेवत भांडवली अर्थव्यवस्थेची घडी बसवण्याचे आव्हान आहे. अलवाइट समुदायाच्या नुकत्याच झालेल्या नरसंहारातून हे आव्हान दिसून आले आहे. दुसरीकडे पाठीराख्या अमेरिका-तुर्की साम्राज्यवादाचे हितसंबंध जपणे सुद्धा सक्तीचे आहे.

15 फेब्रुवारी 2025 रोजी “नवीन सिरियन प्रजासत्ताकाचे संविधान” या नावाचे एक नवीन अंतरिम संविधान लागू केले गेले. या नवीन संविधानाच्या मुख्य वैशिष्ट्यांमध्ये राष्ट्राध्यक्ष पदाच्या अधिकारांवर मर्यादा घालणे, तसेच, विचारस्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य, महिलांचे हक्क, अल्पसंख्याक समुदायांचे संरक्षण, स्वतंत्र न्यायव्यवस्था, संघराज्य व्यवस्था, धर्मसत्ताक लष्करी गटांवर बंदी, सशस्त्र गटांचे निशस्त्रीकरण याबद्दल बोलले गेले आहे. परंतु लागलीच सिरियन डेमोक्रॅटीक कौन्सिल, कुर्द गट, आणि काही ड्रुझे ध्रामिक नेत्यांनी या संविधानाला विरोध जाहीर केला आहे. म्हणायला धार्मिक स्वातंत्र्याची घोषणा करणारे, परंतु शरियत वर आधारित इस्लामी राजवट लागू करणारे हे अंतरिम संविधान सिरियातील सर्व गटांना किती एकत्रित करू शकेल याबद्दल शंका आहेतच.

अहमद अल-शराला अमेरिका, तुर्कस्तान, संयुक्त अरब अमिराती (UAE), सौदी अरेबिया आणि इस्रायल यांचा ठोस पाठिंबा मिळतो आहे. अमेरिकेचा उद्देश हा रशिया-इराणचा सिरियामधील प्रभाव कमी करणे हा आहे, तर तुर्कस्तान सिरियामध्ये स्वत:च्या राजकीय आणि आर्थिक हितसंबंधांना पूरक सरकार आणू पहात आहे. रशिया, चीन, इराणने नवीन सरकारशी संवाद सुरू केला आहे. सर्व शक्तींचे प्रमुख हितसंबंध म्हणजे सिरियामध्ये राजकीय वर्चस्व मिळवणे, तेल आणि वायू सारख्या नैसर्गिक संसाधनांवर नियंत्रण मिळवणे, आणि युद्धोत्तर पुनर्बांधणी प्रकल्पांमधून अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक आणि नफा कमावणे. एकंदरीत रशिया आणि इराण हे अजूनही असद सरकारला पाठिंबा देत वर्चस्व पुन्हा सत्ता मिळवू पहात आहेत आणि त्याचवेळी नवीन सरकारसोबतही संबंध स्थापित करत आहेत, तर अमेरिका, तुर्कस्तान आणि आखाती देश (यूएई, सौदी) नव्या सरकारला पाठिंबा देऊन त्यांचं नियंत्रण प्रस्थापित करू पाहत आहेत.

दोन्ही साम्राज्यवादी शक्तींमधील संघर्षाचा आघाडा बनलेला सिरियातील अंतर्गत संघर्ष लगेच मावळेल याची स्थिती दिसत नाही. यातून सिरियातील सामान्य नागरिक मात्र देशोधडीला लागले असून लाखो लोक विस्थापित झाले आहेत, आणि महासत्तांसाठी आणि त्यांच्याशी हातमिलवणी केलेल्या सिरियातील स्थानिक गटांसाठी मात्र हा संघर्ष अब्जावधी डॉलरच्या सौद्यांचा खेळ ठरला आहे.

# डोनाल्ड ट्रम्प यांची सत्तेत परतणी: कामगार वर्गासाठी धोक्याचे निहितार्थ

✎ शशांक

2024 मध्ये अमेरिकेचे अध्यक्ष म्हणून पुन्हा निवडून येऊन डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेत आणि जगभरात खळबळ माजवली आहे. ट्रम्प यांनी व्हाईट हाऊस जिंकणारे पहिले दोषसिद्ध गुन्हेगार आणि सर्वात वयस्कर व्यक्ती म्हणून इतिहासात स्वत:ची नोंद केली आहे. त्यांच्या पहिला कार्यकाळाने आणि मागील निवडणूकीतील पराभव स्वीकारण्यास नकाराने जगातील प्रसार माध्यमांवर वर्चस्व गाजवले होते, पण आता त्यांच्या राजकीय पुनरागमनामुळे जगभरात गोंधळ आणि अनागोंदीची एक नवीन लाट आली आहे. ट्रम्प यांनी एकामागून एक मोठ्या घोषणा आणि कार्यकारी आदेशांद्वारे तणाव निर्माण केले आहेत, ज्यात अनेक देशांवर उच्च आयातकर लावण्यापासून, लिंगभेदाच्या आणि गर्भपाताच्या अधिकारांबद्दल परंपरावादी मतांना प्रोत्साहन देणे, स्थलांतरितांना गुन्हेगार म्हणून चित्रित करणे आणि कॅनडा किंवा मेक्सिको सारख्या इतर देशांना खरेदी करण्याबद्दल किंवा अमेरिकेला जोडण्याबद्दल अगडबंब विधाने करणे सामील आहे. या परिघटनेचा जागतिक कामगार वर्गाने बारकाईने अभ्यास केला पाहिजे, कारण त्याच्या कृती केवळ आपल्या वर्तमानासाठीच नव्हे तर भविष्यातील पिढ्यांसाठी सुद्धा दूरगामी परिणाम करणार आहेत.

### ट्रम्प यांना युद्ध थांबविण्यात रस नाही

ट्रंप यांचा दुसरा कार्यकाळ सुरु असताना, दोन महत्त्वाची युद्धे जगात सुरू आहेत: रशियाने युक्रेनवर केलेला हल्ला आणि इस्त्रायलद्वारे पॅलेस्टाईनमध्ये सुरू असलेले मानव-वंशहत्याकांड.

काहींना, ट्रम्पच्या पॅलेस्टाईनकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात एक दुहेरी रणनीती असल्याचे वाटते, परंतु तसे अजिबात नाही. एकीकडे त्यांनी पॅलेस्टिनी अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी 50 अब्ज डॉलर्सची 'गुंतवणूक' करण्याचे वचन दिले आहे आणि इस्त्रायली हल्ला थांबवण्यात 'हस्तक्षेप' केला आहे, आणि दुसरीकडे अगोदरच्या कार्यकालातच जेरुसलेमला इस्रायलची राजधानी म्हणून मान्यता देत पॅलेस्टिनी अधिकार नाकारले आहेत. 2018 मध्येच ट्रम्प यांनी युनायटेड नेशन्स रिलीफ अँड वर्क्स एजन्सीचा (यूएनआरडब्ल्यूए) सर्व अमेरिकन निधी संपवून लाखो पॅलेस्टाईन लोकांना आवश्यक मदत बंद करण्याचे पाऊल टाकले होते. आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणजे वादग्रस्त गोलन हाइट्सवरील इस्रायली सार्वभौमत्वाचा दावा नुकताच मान्य करणे, ज्यामुळे या भागातील भू-राजकीय शक्ती-संतुलन अस्थिर झाले आहे. वास्तवात, इस्रायलने तयार केलेल्या राजकीय नियंत्रणाचा वापर करून, पॅलेस्टिनी लोकांचा आवाज दडपून, पॅलेस्टाईनमधील अमेरिकन गुंतवणूकीसाठी मार्ग तयार करण्यासाठीच त्यांनी इस्रायलने चालवलेला नरसंहार थांबविण्यासाठी हस्तक्षेप केला होता. पॅलेस्टाईनवर नियंत्रण वाढवण्यात आणि हल्ल्यात लक्षणीय वाढ करण्यात ट्रम्पचे अतुलनीय समर्थन इस्रायलला मदतकारकच ठरणार आहे.

पॅलेस्टाईनवरील अमेरिकन धोरणाची पुढील दिशा यातूनच दिसून येते की माइक हकाबी यांची इस्रायलमधील अमेरिकेच्या राजदूत पदी आणि मार्को रुबिओ यांची अमेरिकेचे सेक्रेटरी ऑफ स्टेट म्हणून नियुक्ती केली गेली आहे. हकाबी आणि रुबिओ या दोघांनीही गाझामधील युद्धबंदीला उघडपणे विरोध केला होता आणि वेस्ट बँक येथील इस्रायली वसाहतींना पाठिंबा दर्शविला होता. त्यांच्या नेमणुका स्पष्टपणे दाखवतात की इस्रायलच्या नरसंहाराला आणि दहशतवादी धोरणांना अमेरिकेचे जोरदार समर्थन चालू राहील.

ट्रम्प यांनी आपल्या निवडणूक प्रचारमोहिमेदरम्यान युक्रेनच्या मुद्द्यावर युद्ध



संपविण्याच्या महत्वावर वारंवार जोर दिला आणि शांततेसाठी मुत्सद्दी प्रयत्नांचे नेतृत्व करण्याचा आपला हेतू व्यक्त केला. तथापि, अशी "शांतता" तात्पुरतीच असेल, आणि ट्रंप ज्यांची सेवा करतात त्या अमेरिकेतील भांडवलदार वर्गाच्या दीर्घकालीन रणनीतिक हितसंबंधांवर आधारलेली असेल. ट्रम्प युक्रेनियन अध्यक्ष व्होलोदिमिर झेलेन्स्की यांचे बोलके टीकाकार आहेत आणि त्यांनी रशियन अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांचे 'कौतुक' कधीही लपवलेले नाही. झेलेन्स्की यांच्या नुकत्याच झालेल्या व्हाईट हाऊसच्या भेटीदरम्यान, जगाने पाहिले की पत्रकार परिषदेत ट्रम्प आणि उपाध्यक्ष जेडी व्हान्स यांनी युक्रेनियन अध्यक्षांना जाहीरपणे धमकावले. या दबावाचे उद्दिष्ट युक्रेन युद्ध थांबवून, अमेरिकेला युक्रेनमधील खनिज साठ्यांमध्ये वाटा मिळवून देणे हे आहे.

याचा अर्थ कोणत्याही प्रकारे एखादी नवीन 'अमेरिका-रशिया' मैत्री लावता कामा नये. अमेरिकेचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार माईक वॉल्ट्झ यांनी अलीकडेच महटले आहे की युक्रेनमध्ये युरोपियन 'शांतीसैन्य' राहील हे रशियाला स्वीकारावे लागेल. दुसरीकडे युक्रेनवर हा दबाव आणला जात आहे की त्यांनी रशियाकरिता भूभाग सोडावा,युद्ध संपवावे, आणि नाटोच्या सदस्यतेची आशाही सोडावी. हे स्पष्ट आहे की की ट्रम्प काहीही बोलोत, युक्रेनमधील संघर्ष कायमचा संपणार नाही. ट्रम्प यांनी झेलेन्स्कीवर जबरदस्तीने तडजोड लादल्यामुळे कदाचित युक्रेनमध्ये आणखी एक 'राष्ट्रवादी' प्रतिक्रिया पेटेल आणि युरोपियन शक्तींच्या मदतीने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष, प्रदीर्घ संघर्ष सुरूच राहील. ट्रंपला फक्त एका गोष्टीत रस आहे, आणि तो म्हणजे युक्रेनच्या खनिज संसाधनांमध्ये अमेरिकन भांडवलदार वर्गाचे हितसंबंध. यातून कोणत्याही प्रकारे अमेरिका विरुद्ध चीन-रशिया साम्राज्यवादी स्पर्धा कमी झाल्याचा अर्थ काढला जाऊ शकत नाही.

### आयातकर आणि डी.ओ.जी.ए. (डोज, DOGE)

पहिल्या कार्यकाळात ट्रम्प यांनी व्यापार युद्ध सुरू केले. यावेळी, त्यांच्या योजना आणखी 'महत्वाकांक्षी' आहेत. कार्यकाळाच्या पहिल्या दिवसापासूनच आपण कॅनडा, मेक्सिको, चीन आणि कोलंबियासारख्या देशांवर आयातकर लावले जाताना, आणि रोखले जातानाही पाहिले आहेत. या व्यापार युद्धामुळे बऱ्याच देशांमध्ये आयातकर उंचावले जातील, ज्यामुळे बऱ्याच वस्तूंच्या किंमती जास्त वाढतील, ज्यामुळे कामकरी जनतेचे आयुष्य अधिकच हलाखीचे होईल. या वाढीव आयातकराच्या समर्थनात अनेक तर्क दिले गेले आहेत, जसे की अमेरिकेतील उत्पादनव्यवस्थेला पुनरुज्जीवित करण्यापासून आणि उत्पादन आणि रोजगारास चालना देण्यापासून ते 'राष्ट्रीय' सुरक्षा उद्दिष्टे साध्य करण्यापर्यंत. हे उपाय प्रतीकात्मक आणि व्यावहारिक दोन्ही उद्दिष्ट साध्य करतात. प्रतीकात्मकदृष्ट्या, ते अमेरिकेच्या श्वेतवर्णीय कामगार वर्गाला चुचकारतात, ज्याने भांडवली जागतिकीकरणाचा मार झेलला आहे, पण ज्यामध्ये हे रूजवले गेले आहे की याला इतर देश जबाबदार आहेत. वास्तवात मात्र ही पावले आर्थिक संकटाच्या काळात अमेरिकन भांडवलदार वर्गाच्या रक्षणाकरिता बनवली गेली आहेत.

आणखी एक महत्त्वपूर्ण बाब म्हणजे सोशल मीडिया जायंट एक्स, टेस्ला यांचा मालक आणि जगातील सर्वात श्रीमंत व्यक्तींपैकी एक एलोन मस्क यांच्या नेतृत्वात सरकारी कार्यक्षमता विभाग (डोजे) ची भूमिका. त्याच्या सर्वात विवादास्पद प्रस्तावांपैकी एक म्हणजे शिक्षण विभाग बंद करण्याची योजना - ज्यामुळे मोठ्या प्रमाणात प्रतिक्रिया निर्माण झाली आहे. या निर्णयामुळे अगोदरच कर्जाच्या बोजाखाली दबलेल्या तरुणांची स्थिती अधिकच बिकट होणार आहे. या डोजे योजनेचे उद्दिष्ट आहे की बड्या भांडवलाकरिता प्रतिकूल असलेल्या सरकारी शिक्षण घटकांना हटवणे, जेणेकरून खाजगीकरण आणि कामगार वर्गाच्या शोषणाकरिता अतिरिक्त संधी निर्माण करता येतील.

### स्थलांतरितांवर दोषारोप आणि हवामान संकटाकडे दुर्लक्ष

उजव्या विचारसरणीच्या इतर नेत्यांप्रमाणेच ट्रम्प सुद्धा भांडवलशाहीच्या व्यवस्थागत संकटाचे खापर सर्वाधिक असुरक्षित लोकांवर फोडत आले आहेत. त्यांच्या संपूर्ण प्रचारमोहिमेमध्ये, त्यांनी दक्षिण अमेरिकन स्थलांतरितांना गुन्हेगार ठरवणारे पारंपारिक षडयंत्र सिद्धांत वापरले, असे स्थलांतरित ज्यांपैकी अनेक जण तर अमेरिकन साम्राज्यवादी हस्तक्षेपांमुळे निर्मिलेल्या अनागोंदीमुळेच आपली जन्मभूमी सोडून आले होते. अमेरिकेत अंदाजे 11 ते 12 दशलक्ष अनधिकृत स्थलांतरित आहेत, ज्यापैकी बहुतेक लोक कायदा पाळणारे, उत्पादक व्यक्ती आणि कुटुंबे आहेत. अमेरिकेने त्यांना राहण्याची आणि काम करण्याची परवानगी देण्याचे कारण म्हणजे त्यांच्या सर्वाधिक असुरक्षित स्थितीमुळे त्यांनी वास्तव-वेतन खाली आणले ज्यामुळे अमेरिकन भांडवलदार वर्गाचा नफा वाढला. अशा प्रकारच्या स्थलांतरितांची एक मोठी संख्या एक दशकापेक्षा जास्त काळ अमेरिकेत राहत आहे आणि त्यांनी आपापल्या समुदायांमध्ये खोलवर संपर्क जाळी विकसित केली आहेत. असे असूनही, ट्रम्प यांनी या सर्वांना हद्दपार करण्याची घोषणा केली आहे.

त्याच्या प्रशासनाच्या पहिल्या 50 दिवसांमध्ये, इमिग्रेशन आणि कस्टम एन्फोर्समेंट (आयसीई) ने 32,809 जणांना सक्ती अटक केली आहे. तुलना करायची तर, आयसीईच्या एन्फोर्समेंट आणि रिमूवल खात्याने संपूर्ण 2024 आर्थिक वर्षात 33,242 जणांना अटक केली होती. भाजपने 'भारतीयांच्या प्रतिष्ठे' विषयी तयार केलेल्या गाजावाजाच्या विपरित भारतीय स्थलांतरित कामगारांना सुद्धा त्याच पद्धतीने वागले गेले. गेल्या महिन्यात, 109 कामगारांना हातकड्या घालून, अपमान करत, परत भारतात हद्दपार करण्यात आले आणि"विश्वगुरू भारत" असा दावा करणारे भारताचे पंतप्रधान गप्प राहिले. ट्रम्प त्यांच्या मोठ्या प्रमाणात हद्दपारीच्या योजनेत यशस्वी होतील की नाही हे अनिश्चित आहे, परंतु ही घडामोड अमेरिकेच्या आधीपासूनच्या अमानुष इतिहासातील आणखी एक गडद अध्याय आहे.

दरम्यान, कॅलिफोर्नियाला अमेरिकेतील सर्वात विध्वंसक अशा एका वणव्याचा सामना करावा लागला, आणि त्यावर ट्रम्प यांची कारवाई अत्यंत असमाधानकारक होती. तथापि, ट्रम्प आणि रिपब्लिकन पार्टी हे हवामान बदलालाच नाकारणारे विचार फार पूर्वीपासून पसरवत आहेत हे पाहता त्यांचे वागणे आश्चर्य वाटण्यासारखे नाही. ट्रम्प यांना सातत्याने कोळसा, तेल आणि गॅस उद्योगांनी पूर्ण पाठिंबा दर्शविला आहे. खरं तर, ट्रंप यांनी तेल काढण्याची सर्वात पर्यावरणीय हानीकारक पद्धत असलेल्या फ्रॅकिंगचे सतत समर्थन केले आहे.

अलीकडील वैज्ञानिक आकडेवारीवरून असे दिसून आले आहे की जागतिक तापमान वाढीने प्रथमच औद्योगिक-पूर्व पातळीपेक्षा 1.5 डिग्री सेल्सिअसपेक्षा जास्त उंची गाठली आहे. आधुनिक हवामान चळवळीचे प्रणेते डॉ. जेम्स हॅन्सेन यांनी असा इशारा दिला आहे की जागतिक तापमान वाढ यापूर्वीच 2 डिग्री सेल्सियसवर पोहोचली आहे. शास्त्रज्ञांनी असा इशारा दिला आहे की , या उंबरठ्यापलीकडे वनस्पती आणि प्राणी प्रजातींचे नामशेष होणे वेगाने वाढेल. हे भयावह सत्य समोर असूनही, ट्रम्प प्रशासनाने पॅरिस करारापासून माघार घेतली आहे, एक असा करार जो भांडवली सरकारांद्वारे जागतिक तापमान वाढीची कबुली होता. निश्चितपणे ट्रंप अमेरिकन भांडवलदार वर्गाच्या सर्वाधिक निर्दय प्रतिनिधींपैकी एक आहे, जो या वर्गाच्या हितांकरिता कोणतीही पातळी गाठू शकतो.

वर नमूद केलेल्या कृती नवीन ट्रम्प प्रशासनाची काही ठळक वैशिष्ट्ये आहेत, ज्यामुळे अनेक निरीक्षकांनी त्याला फॅशिस्ट म्हणून विशेषण लावले आहे; परंतु अशाप्रकारची विशेषणे सावधगिरीने वापरली पाहिजेत. एखाद्या घटनेस अचूकपणे समजूनच आपण तिला सामोरे जाण्यासाठी एक प्रभावी रणनीती विकसित करू शकतो.

### ट्रम्प फॅशिस्ट आहे का?

डोनाल्ड ट्रम्प यांना फॅशिस्ट म्हटले जाऊ शकते की नाही याचे मूल्यांकन करण्यासाठी, फॅशिझमची काही पारिभाषिक वैशिष्ट्ये, जसे की निम्न-भांडवलदार वर्गाची एक संघटित प्रतिक्रियावादी चळवळ असणे आणि एक कॅडर आधारित चळवळ असणे, याचे मूल्यांकन आवश्यक आहे. ट्रम्प यांना अमेरिकन लोकांच्या एका भागाचा भरीव पाठिंबा मिळाला आहे, परंतु हे समर्थन निम्न-भांडवलदार वर्गाच्या संघटित प्रतिक्रियावादी चळवळीतून उद्भवत नाही. खरेतर, एका संघटित फॅशिस्ट

पान 10 वर

# 2024 : फॅशिस्ट भाजप-संघाच्या यंत्रणेच्या विखारी भाषणांनी आणि धर्मवादाने माखलेले वर्ष

✍ललिता

सेंटर फॉर स्टडी ऑफ ऑर्गानाईझ्ड हेट (संघटित विद्वेषाच्या अभ्यासाकरिता केंद्र) या अमेरिकेतील वॉशिंग्टन डी.सी. येथील अभ्यासगटातर्फे 2024 मध्ये भारतात 165 व्यक्तिगत विद्वेषी भाषणांची नोंद केली गेली आहे. म्हणजे दिवसाला जवळपास 3 विद्वेषी भाषणे. मुस्लिम समुदायाच्या नरसंहाराची मागणी करणारी भाषणे, विरोधकांना निशाणा बनवण्यासाठी केली गेलेली धर्मवादी भाषणे, लव्ह जिहाद आणि लँड जिहाद सारख्या नकली मुद्यांना उचलत धार्मिक द्वेष पसरवणारी भाषणे, गेल्या वर्षभरात सतत हिंदू-मुस्लिम तणाव निर्माण करण्यासाठी फॅशिस्ट संघ-भाजप परिवाराकडून दिली गेलीत. राजकीय सभांपासून ते धार्मिक मिरवणूकांपर्यंत अनेक प्रसंगी 74.4 टक्क्यांपर्यंत विद्वेषी भाषणांमध्ये वाढ झालेली दिसते, ज्यांना भाजप, हिंदू राष्ट्रवादी गट, आणि अनिर्बंध सोशल मीडियाने वेगाने पसरवले. हरियाणा आणि महाराष्ट्रातील सर्वसाधारण निवडणुकांनी अशा धर्मवादी आणि विद्वेषी भाषणांकरिता सुपिक जमीन पुरवली. उत्तर प्रदेशात 2024 मध्ये सर्वाधिक विद्वेषी भाषणांची नोंद झाली आहे.

सेंटर फॉर स्टडी ऑफ सोसायटी अँड सेक्युलरिझम (समाज आणि धर्मनिरपेक्षतेच्या अभ्यासाकरिता केंद्र) द्वारे प्रसारित एका अहवालात म्हटले आहे की केंद्रबिंदू बनलेल्या महाराष्ट्रात धार्मिक दंगलींमध्ये 84 टक्के वाढ झाली आहे, आणि देशात 2024 मध्ये झालेल्या 59 पैकी 12 दंगली राज्यात झाल्या आहेत. या वाढीतून दिसून येते की महाराष्ट्रात फॅशिस्ट परियोजना जोरात राबवली जात आहे. या धार्मिक दंगलींमध्ये 3 हिंदू आणि 10 मुस्लिम मिळून 13 जीव गेले. यापैकी बहुसंख्य धार्मिक दंगली या धार्मिक मिरवणुका किंवा उत्सवादरम्यान भडकावल्या गेल्या, ज्यात अयोध्येतील राम मंदिराची प्राणपतिष्ठापना (जानेवारीत चार दंगली), सरस्वती पूजा मिरवणूक (सात), गणपती उत्सव (चार) आणि बकरी ईद (दोन) सामील आहेत. अहवालात म्हटले आहे की 2024 मध्ये 13 जमावाद्वारे हत्येच्या घटना झाल्या, ज्यात 11 मृत्यू झालेत, ज्यात एक हिंदू, एक ख्रिश्चन आणि नऊ मुस्लिम मरण पावले आहेत.

या सर्व संघटित, नियोजित, लक्ष्यवेधी हिंसेला सत्तेचे समर्थन लाभले आहे. महाराष्ट्रात जुलै मध्ये विशाळगढ किल्ल्यावर अतिक्रमण विरोधी मोहिमेच्या वेळी हिंसा भडकली. जवळपासच्या गावातील मुस्लिम कुटुंबांच्या घरांवर एका फॅशिस्ट जमावाने हल्ला करत मालमत्तेची नासधूस केली आणि यात मोठे नुकसान व इजा झाल्या. नोव्हेंबर मध्ये उत्तरप्रदेशातील संभल येथे शाही जामा मशिदीच्या न्यायालयाने दिलेल्या आदेशाद्वारे सर्वेच्या दरम्यान धार्मिक हिंसा भडकली. उत्तरप्रदेशातील बहारीच येथे ऑक्टोबर मध्ये एका हिंदू व्यक्तीच्या हत्येनंतर धार्मिक दंगली झाल्या, ज्यात लूटमार आणि संपत्तीचे नुकसान झाले. मंदिरांच्या जागी मशिदी आहेत, मशिदी बेकायदेशीर आहेत असे म्हणत मशिदी ध्वस्त कराव्या यासाठी हिमाचल प्रदेशातील मंडी आणि शिमल्यातील मलिआना येथे सप्टेंबर महिन्यात फॅशिस्ट गुंडसेनांनी "निषेध" केला.

जून 2024 मध्ये, छत्तीसगडमधील रायपूर येथे, एका जमावाने गोवंश वाहतूक करणाऱ्यांवर हल्ला केला आणि त्यांना मारहाण केली, ज्यामुळे दोघांचा जागीच मृत्यू झाला आणि दहा दिवसांनी एकाचा मृत्यू झाला. गुजरातमधील आणंदमध्ये, जून 2024 मध्ये चिखोदरा गावात क्रिकेट सामन्यादरम्यान जमावाने सलमान वोहरा या 23 वर्षीय मुस्लिम तरुणाला मारहाण करून ठार मारले. हरियाणातील चरखी दादरी येथे, ऑक्टोबर 2024 मध्ये हंसवास खुर्द गावात, गोमांस खात असल्याचा आरोप करून जमावाने कचरा वेचणाऱ्यांवर हल्ला केला. पश्चिम बंगालमधील 26 वर्षीय स्थलांतरित कामगार साबीर मलिक याला मारहाण करून ठार मारण्यात आले, तर त्याचा काका असीरुद्दीन पळून गेल्यामुळे बचावला. 10 जणांवर आरोप ठेवण्यात आले आहेत, परंतु 6 जण अजूनही फरार आहेत. हरियाणातील फरिदाबादमध्ये, 12 वीचा विद्यार्थी आर्यन मिश्राचा 30 किलोमीटरपर्यंत पाठलाग करण्यात आला आणि गोरक्षकांनी त्याला गोवंश तस्कर समजून गोळ्या घालून ठार मारले. धुळे येथे धावत्या ट्रेनमध्ये, मुंबईजवळील इगतपुरीजवळ एका वृद्ध मुस्लिम व्यक्तीवर तरुण गुंडांनी गोमांस घेऊन जात असल्याचा संशय घेऊन हल्ला केला. अनेक प्रकरणांमध्ये, जनतेच्या संतापामुळे पोलिसांनी काही लोकांना अटक केली, परंतु जेव्हा राग शांत होतो आणि खटला थंड्या बस्त्यात गुंडाळला जातो, हे सर्वांना माहिती आहे. गोरक्षकांकडून गोहत्या किंवा तस्करी करणाऱ्यांना ठार मारण्याचे उघड आवाहन ऑनलाइन फिरत असल्याचे दिसून येते आणि याला सरकारचे समर्थनही मिळते. अनेक प्रकरणांमध्ये, असे आढळून आले आहे की पीडित व्यक्तीच्या ताब्यात सापडलेले मांस गोमांस नाही, तरीही गोरक्षकांमुळे अनेक जीव गेले आहेत.




भाजप थेट विद्वेषी भाषण कार्यक्रमांचा सर्वात मोठा आयोजक म्हणून उदयास आला आहे. त्यांनी 340 अशा मेळाव्यांचे आयोजन केले आहे जे सर्व नोंद झालेल्या प्रकरणांपैकी २९.२ टक्के आहे. विहिंप आणि बजरंग दलाने 279 विद्वेषी भाषण कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. महाराष्ट्रातील फॅसिस्ट संघटनांची युती असलेला 'सकल हिंदू समाज' (एसएचएस) 56 विद्वेषी भाषण कार्यक्रमांसाठी जबाबदार होता, ज्यात सुरेश चव्हाणके, काजल हिंदुस्तानी आणि भाजप आमदार टी. राजा सिंह आणि नितीश राणे सारखे विखारी वक्ते बोलावले गेले होते. 2014 मध्ये एका मुस्लिम तंत्रज्ञान व्यावसायिकाच्या हत्येतील आरोपी असलेल्या धनंजय देसाई यांच्या नेतृत्वाखालील हिंदू राष्ट्र सेनेने (एचआरएस) देखील आपल्या कार्याचा विस्तार केला, आणि 19 विद्वेषी भाषण कार्यक्रम आयोजित केले. हिंदू जनजागृती समिती (एचजेएस), राष्ट्रीय हिंदू शेर सेना, शिवशक्ती आखाडा आणि श्री राम सेना यासारख्या लहान गटांनी देखील मुस्लिमविरोधी आणि ख्रिश्चनविरोधी प्रचार पसरवण्यात भूमिका बजावली. मुस्लिम व्यवसायांवर आर्थिक बहिष्कार घालण्याचे समर्थन करणारी 111 भाषणे आणि मशिदी आणि मुस्लिम घरे उद्ध्वस्त करण्याचे आवाहन करणारी 274 भाषणे आयएचएल अहवालात नोंदवली गेली आहेत. किमान 123 भाषणांमध्ये हिंदूंना मुस्लिमांविरुद्ध सशस्त्र होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अहवालात ख्रिश्चनांना लक्ष्य करणाऱ्या 115 विद्वेषी भाषणांच्या घटनांचा समावेश आहे, ज्याचा पडताळा चर्च आणि ख्रिश्चन संस्थांवरील हल्ल्यांमध्ये वाढ होण्यात दिसून येतो. सिटीझन्स फॉर जस्टिस अँड पीसने त्यांच्या 'नफरत का नक्षा' या नकाशावर जातीय भाषणे, चिथावणी यांचा बारकाईने मागोवा घेतला आहे.

सरकार आणि पोलिसांकडून या भाषणांवर फारसा अंकुश ठेवला जात नाही किंवा शिक्षाही होत नाही, आणि अशी भाषणे देणाऱ्या फॅशिस्टांवर दाखल केलेले खटले ही धुळीला मिळतात. सर्वोच्च न्यायालयाने अशा प्रकरणांमध्ये कारवाई करण्याचे निर्देश देऊनही, एकट्या महाराष्ट्रात 19 गुन्ह्यांमध्ये चार्जशीट दाखल झालेले नाहीत. निवडणूक आयोग, पोलिस आणि न्यायालयांची निष्क्रियता हे समाजाचे फॅशिस्टीकरण कसे पूर्ण झाले आहे याचे पुरावे आहेत. भारतीय राज्यसत्तेच्या सर्व अवयवांना अंतर्गतरित्या ताब्यात घेण्यात आले आहे कारण फॅशिस्ट समाजाच्या प्रत्येक मज्जापेशीत शिरले आहेत. हिंदुत्व फॅशिस्टांनी तळागाळातील सर्व सत्तासंस्था आणि संघटनांमध्ये खोलवर प्रवेश केला आहे.

बांगलादेशमधील विद्यार्थ्यांच्या नेतृत्वातील बंड, शेख हसीनाची हकालपट्टी आणि हिंदूविरोधी हिंसाचार, विशेषतः हिंदू भिक्षू चिन्मय दास यांच्या अटकेनंतर, भारतात मुस्लिमविरोधी मोर्चे निघाले, जिथे शेजारील देशातील धर्मवादाचा वापर भारतात धर्मवादी हल्ल्यांना खतपाणी घालण्यासाठी केला गेला. नोव्हेंबर 2024 मध्ये, दास यांच्यासाठी देशभरात निषेध होत असताना, उत्तर प्रदेशातील संभल येथे मुघलकालीन शाही जामा मशिदीच्या (जी हिंदू मंदिरावर बांधल्याचा आरोप होता) पुरातत्व सर्वेक्षणाला विरोध केल्याबद्दल चार मुस्लिम पुरुषांची हत्या करण्यात आली.

झारखंड निवडणुकीत भाजपने बांगलादेशी "घुसखोर"च्या बागुलबुवाचा वापर करून निवडणुकीत फायदा मिळवला. नरेंद्र मोदी आणि आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा शर्मा यांनी झारखंड मुक्ती मोर्चावर घुसखोरीला प्रोत्साहन देण्याचा आरोप केला. भाजपची निवडणूक रणनीती भीती आणि धार्मिक असंतोष निर्माण करण्यावर मोठ्या प्रमाणात अवलंबून होती. एक सामान्य कथन असे बनवले गेले होते की विरोधी पक्ष, विशेषतः कॉंग्रेस आणि भारत आघाडी, हिंदूंचे हक्क हिरावून घेण्याचे आणि त्यांच्या संसाधनांचे मुस्लिमांना पुनर्वितरण करण्याचे काम करत होते. बांसवाडा येथे मोदींनी दावा केला की विरोधी कॉंग्रेस पक्ष हिंदू महिलांच्या दागिन्यांसह सर्व काही विकणार आहे आणि त्यांची संपत्ती मुस्लिमांमध्ये पुनर्वितरण करणार आहे. मोदी, आदित्यनाथ आणि शहा यांनी वारंवार दावा केला की विरोधी पक्ष हिंदूंची मालमत्ता काढून घेतील आणि ती "बांगलादेशी घुसखोर आणि रोहिंग्या निर्वासितांना" देतील. जाती आणि धर्माच्या आधारावर विभागून कामगार जनतेला एकमेकांविरुद्ध उभे करण्याचा, आणि काळजीने जपलेल्या मौल्यवान वस्तू गमावण्याच्या भीतीचा वापर जातीय उन्माद निर्माण करण्यासाठी करण्याचा हा त्यांचा प्रयत्न आहे.

आयएचएलच्या अहवालात सोशल मीडियाचाही मागोवा घेण्यात आला आहे ज्यामध्ये फेसबुक, यूट्यूब, व्हॉट्सअॅप आणि टेलिग्रामवर प्रत्यक्ष द्वेषपूर्ण भाषणांचे 995 व्हिडिओ आल्याचे दर्शविले आहे. एकट्या फेसबुकने 495 द्वेषपूर्ण भाषणाचे व्हिडिओ प्रसारित केले गेले होते, तर 211 यूट्यूबवर टाकण्यात आले होते. याव्यतिरिक्त, भाजप नेत्यांनी दिलेली 266 अल्पसंख्याकविरोधी द्वेषपूर्ण भाषणे एकाच वेळी अनेक प्लॅटफॉर्मवर लाईव्ह-स्ट्रीम करण्यात आली. यावरून दिसून येते की द्वेषपूर्ण भाषणाविरुद्धची धोरणे घोषित केलेली असूनही सोशल मीडिया प्लॅटफॉर्मने धार्मिक विद्वेषी प्रचाराचा प्रमुख मंच म्हणून काम केले. मृत्युदंडाच्या धमक्या, मुस्लिम महिलांचे फोटो अश्लील फोटोंमध्ये रूपांतरित करणे, खोटेपणा आणि चुकीची माहिती पसरवणे यासारख्या गोष्टी दाखवतात की आज सोशल मीडिया द्वेषाचे डबके बनले आहे.

प्रत्येक उत्सव आता मांस विक्रीच्या नावाखाली हल्ले करण्याचा एक प्रसंग आहे; प्रत्येक मशिदीखाली संशयास्पदपणे एक मंदिर आहे; प्रत्येक चित्रपट, प्रत्येक कार्यक्रम, प्रत्येक संस्था आता फॅसिस्टांना पोसण्याची आणि मुस्लिमांवर हल्ले वाढवण्याची प्रयोगशाळा

पान 13 वर

# उच्चभ्रूंसाठी ‘कोल्डप्ले’ चा शो, बाकीच्यांसाठी दैन्य!



✎ **शशांक**

कोल्डप्ले या जगातील एका प्रसिद्ध बँडच्या जानेवारी 2025 मध्ये मुंबईत आणि अहमदाबादेत झालेल्या शो चे कवित्व अजून संपलेले नाही. कोल्डप्लेच्या मुंबईतील कॉन्सर्टचे वर्णन द टाईम्स ऑफ इंडियाने “जीवनात शोभेलसे साहस” असे केले होते, तर हिंदुस्तान टाईम्सने अहमदाबाद कॉन्सर्टचे “आतापर्यंतचा सर्वात मोठा” म्हणून कौतुक केले. अशा मथळ्यांनी मुख्य प्रवाहातील माध्यमांवर वर्चस्व गाजवले, देशाच्या “विश्वगुरू” दर्जाचा (ही पदवी आपल्या पंतप्रधानांनी देशाला दिली आहे) पुरावा म्हणून ब्रिटिश रॉक बँडचे भारतात आगमन अभिमानाने साजरे केले गेले. भारतीय जनता पक्षाच्या सोशल मीडिया हँडल्सने या गोष्टीचा जोरदार प्रचार केला आणि अगदी भारताला कॉन्सर्टसाठी “जागतिक राजधानी” घोषित केले. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी “कॉन्सर्ट अर्थव्यवस्थेतील अफाट शक्यता” देखील अधोरेखित केल्या, आणि या शो ला भारताच्या वाढत्या जागतिक प्रभावाचे प्रतीक म्हणून मांडले.

सरकार आणि कॉर्पोरेट-नियंत्रित माध्यमांच्या मते, उर्वरित जग गंभीर आर्थिक आव्हानांना तोंड देत असतानाही भारत पूर्वीपेक्षा जास्त तेजस्वीपणे चमकत आहे. आता अजून काय मागावे बरे? शेवटी, कोल्डप्लेचे क्रिस मार्टिन त्यांच्यासाठी आतापर्यंतच्या सर्वात भव्य व्यासपीठावर प्रस्तुती करत होते. अशा भव्यदिव्य शों द्वारे देशाची प्रतिमा झळकत असताना, वाढती बेरोजगारी, वाढत्या विद्यार्थ्यांच्या आत्महत्या किंवा महागाईबद्दल काळजी का करावी? “नव्या भारतात” आपले स्वागत आहे, जिथे सरकार प्रगतीची काळजीपूर्वक तयार केलेली प्रतिमा चमकावण्यासाठी करदात्यांच्या कोट्यवधी रुपयांचा चुराडा करत आहे.

भारत चकाकत आहे, परंतु कोणासाठी तर लोकसंख्येच्या सर्वात श्रीमंत 10-20 टक्के लोकांसाठी. “अच्छे दिनच्या” युगात राहणाऱ्या या अल्पसंख्याक लोकांसाठी यापेक्षा चांगले दिवस तर कधीच नव्हते. पण उर्वरित 80-90 टक्के लोकांचे काय? या बहुसंख्यांक लोकांसाठी जीवन म्हणजे भारतीय भांडवलदार वर्गाच्या विकासाच्या कथेशी जुळवून घेत जगण्याचा एक दैनंदिन संघर्ष आहे. आंतरराष्ट्रीय संगीत कार्यक्रम आणि जागतिक मान्यता यांच्या कोडकौतुकात उच्चभ्रू लोक मिरवत असताना, उर्वरित लोकसंख्येला मात्र समृद्धीचा हा भ्रम टिकवून ठेवण्याचा भार उचलावा लागतो आहे.

## एकीकडे हजारोंची तिकिटे , दुसरीकडे 25,000 रुपयांपेक्षा कमी कमावणारे 90 टक्के लोक !

जेव्हा या संगीत कार्यक्रमाची तिकिट-विक्री सुरू झाली, तेव्हा असे वृत्त आले की श्रीमंत लोक काळ्या बाजारात तिकिटे खरेदी करून कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी लाखो रुपये देण्यास तयार होते. हे आपल्या देशातील तीव्र विषमतेवर प्रकाश टाकते. 2014 पासून परिस्थिती आणखी बिकट झाली आहे; कारण फॅसिस्ट मोदी सरकारने मागील प्रशासनाकडून वारशाने मिळालेल्या नवउदारमतवादी धोरणांना आक्रमकपणे तीव्र केले आहे. अलीकडेच, “भारतात उत्पन्न आणि संपत्तीची असमानता, 1922-2023: अब्जाधीशांच्या राज्याचा उदय” या शीर्षकाच्या एका पेपरमध्ये असे नमूद केले आहे की 2022-23 मध्ये लोकसंख्येच्या वरच्या 1% लोकांचा उत्पन्नातील आणि संपत्तीतील वाटा अनुक्रमे 22.6% आणि 40.1% पर्यंत वाढला, त्याचवेळी वरच्या 10% लोकांचा संपत्तीमध्ये वाटा 65% होता आणि खालच्या 50% लोकांचा वाटा फक्त 6.4% होता.

कामगार वर्गाच्या नियमित आणि वाढत्या भांडवली शोषणाव्यतिरिक्त, नवउदारमतवादी धोरणांनी बहुराष्ट्रीय कंपन्यांकरिता आणि श्रीमंतांकरिता कर कपात आणि कर्जमाफीला प्राधान्य दिले आहे, तर उर्वरित लोकसंख्येवर अप्रत्यक्ष करांचा भार टाकला आहे ज्यामुळे आवश्यक वस्तूंच्या किमती वाढल्या आहेत. उदाहरणार्थ, द हिंदूने केलेल्या एका तपासणीत असे दिसून आले आहे की 2019 मध्ये सवलतीच्या कर प्रणालीद्वारे भारतातील सर्वात मोठ्या कंपन्यांनी अंदाजे 3.14 लाख कोटी रुपयांचे कर वाचवले आहेत. दरम्यान, गेल्या 10 वर्षांत बँकांनी 16.5 लाख कोटी रुपयांचे बुडीत कर्ज माफ केले आहे. ही बुडीत कर्जे माफ करण्यासाठी निधी कुठून आला? तो या बँकांमध्ये जमा केलेल्या सामान्य भारतीयांच्या बचतीतूनच आला. कष्टकरी जनतेकडून श्रीमंतांकडे संपत्तीचे हस्तांतरण पद्धतशीरपणे सुव्यवस्थित केले गेले आहे आणि सरकारने हे वास्तव उघड करणारे अहवाल दडपण्यासाठी सक्रियपणे काम केले आहे. खरं तर, असे म्हटले पाहिजे की देशातील सर्वात वेगाने वाढणारे क्षेत्र आयटी, उत्पादन किंवा सेवा नाही - तर असमानता आहे.

## श्रीमंतांसाठी वाहतूक नियोजन; सामान्यांसाठी चेंगराचेंगरी आणि मृत्यू

कोल्डप्लेसारख्या घटनांमुळे पुन्हा एकदा हे स्पष्ट झाले आहे की आपल्या सरकारांसाठी सामान्य कामकऱ्यांचे जीवन निरुपयोगी आहे तर श्रीमंतांच्या कार्यक्रमांना सार्वजनिक पैशाने सर्व संरक्षण दिले जाते.

कोल्डप्ले कॉन्सर्टसाठी नवी मुंबईत अनेक प्रवास निर्बंध लागू करण्यात आले होते, ज्यामुळे मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर मोठी वाहतूक कोंडी झाली. तुर्भे पासुन खारघर पर्यंत 8-10 किलोमीटर लांबीची वाहतूक कोंडी झाली. मजेची बाब म्हणजे, तथाकथित ‘उच्च-मध्यमवर्गीय’, जे क्वचितच वाहतूक कोंडीबद्दल तक्रार करण्याची संधी सोडतात, त्यांना या गर्दीची पर्वा नव्हती, कारण ती त्यांच्या आवडत्या ब्रिटिश रॉक बँडच्या कार्यक्रमाकरिता झाली होती. नवी मुंबईतील नेरुळ आणि जुईनगरमध्ये पोलिसांच्या मोठ्या तैनातीतून सरकारने दिलेले लक्ष स्पष्टपणे दिसून येत होते.

मुंबईतील कॉन्सर्टमध्ये उपस्थितांसाठी एक विशेष रेल्वे सेवा देखील उपलब्ध करून देण्यात आली होती. याच मुंबईत 2023 मध्ये गर्दीने भरलेल्या लोकल ट्रेनमध्ये दररोज किमान सात मृत्यू झाले होते; या अनुभवाच्या, शहरातील कामगार वर्गीय प्रवाशांच्या दैनंदिन संघर्षांच्या अगदी विरुद्ध कोल्डप्ले चे चित्र आहे. स्पष्टपणे, लोकल ट्रेनवर अवलंबून असलेल्या सामान्य लोकांच्या जीवनाची सरकारला काळजी नाहीये, तर कोल्डप्लेसारख्या धंद्याची नफ्याची गणिते सांभाळणे जास्त गरजेचे वाटते.

अजून एक उदाहरण घेऊयात. अलाहाबादमधील महाकुंभात, ज्याच्या नियोजनाचा मोठा गाजावाजा केला गेला, एक स्पष्ट वर्गीय दरी उघड झाली आहे. इथे ‘व्हीआयपी’ पाहुण्यांना मोकळे रस्ते उपलब्ध करवले गेले आणि सामान्य लोकांना लांबच्या लांब रांगांमध्ये उभे राहण्यास भाग पाडले गेले. या गैरव्यवस्थापनामुळे 29 जानेवारी रोजी चेंगराचेंगरी झाली, ज्यामुळे किमान 79 लोकांचा मृत्यू झाला. अधिकृत आकडेवारी केवळ 30 मृत्यूंचा दावा करत असली तरी, ही तफावत अजून काही नाही तर उत्तर प्रदेशातील भाजप सरकारच्या अपयशावर पांघरूण घालण्याचा आणखी एक प्रयत्न आहे

म्हणून, ‘न्यू इंडिया’मध्ये, जर तुम्ही वरच्या वर्गात असाल, तरच तुमचे जीवन मूल्यवान आहे.

## कोल्डप्लेचे क्रिस मार्टिन यांनी स्टेजवर “जय श्री राम” असे म्हटले आणि गर्दी बेभान झाली

मुंबईत एक अनपेक्षित क्षण घडला जेव्हा बँडचा मुख्य कलाकार क्रिस मार्टिन याने चाहत्यांनी धरलेल्या फलकांपैकी एकावर “जय श्री राम” असे पाहिले, आणि नारा दिला. प्रेक्षकांकडून या कृतीचे जोरदार “स्वागत” करण्यात आले.


डोळेझाक करणाऱ्यांना सोडून सर्वांना माहीत आहे की देशभरात जातीय तणाव निर्माण करण्यासाठी फॅसिस्ट शक्तींनी या जयघोषाचा वापर केला आहे. सेंटर फॉर द स्टडी ऑफ सोसायटी अँड सेक्युलरिझमच्या मते, 2024 मध्ये भारतात जातीय हिंसाचारात 84 टक्के वाढ झाली आहे. श्रीमंतांमध्ये अशा जयघोषांचे सामान्यीकरण आश्चर्यकारक नाही, कारण त्यांना या तणावांचा फटका बसत नाही. ते त्यांच्या ‘गेटेड सोसायटीत’ सुरक्षितपणे राहतात आणि त्यांच्या मुलांना शिक्षणासाठी आणि परदेशात स्थायिक होण्यासाठी पाठवतात, परंतु अशा घटनांच्या परिणामी कामगार वर्गातील कुटुंबे उद्ध्वस्त होतात. आपल्या देशातील विशेषाधिकारप्राप्त लोकांसाठी जो क्षण मनोरंजनाचा बनला आहे, तो प्रत्यक्षात जातीय विषाचे बळी ठरणाऱ्यांसाठी आघाताचा स्रोत आहे. कोल्डप्लेने या घोषणेचा वापर केल्याने हे दिसून येते की कोल्डप्ले सारख्या व्यावसायिक बँडना फॅशिस्ट विचारांबद्दल तीव्र ओढ आहे आणि ते नफ्यासाठी कोणत्याही प्रकारच्या राजकीय घोषणा वापरण्यास तयार असतात.

हा बँड इंग्लंडला परतला आहे, धार्मिक आणि जातीय रेषांवर आधीच खोलवर ध्रुवीकरण झालेला देश मागे सोडून. तथापि, भारतात आपण जे पाहतो ती विसंगती नाही तर जगभरातील सर्व भांडवली समाजांचे सामान्य वास्तव आहे. व्यवस्थागत विषमता आणि तिला लपवण्यासाठी अस्मितेच्या आधारावर समाजाची विभागणी हे भांडवली व्यवस्थेचे सार्वत्रिक वास्तव आहे. कार्ल मार्क्सने ‘कॅपिटल’ मध्ये वर्णन केल्याप्रमाणे, भांडवली समाजाचे वैशिष्ट्य म्हणजे एका ध्रुवावर संपत्तीचा संचय आणि त्याच वेळी विरुद्ध ध्रुवावर दैन्य, कष्टाची वेदना, गुलामगिरी, अज्ञान, क्रूरता आणि मानसिक अधोगतीचा संचय. सत्ताधारी भांडवलदार वर्ग त्यांचे राज्य चालू ठेवण्यासाठी, समाजातील ही खरी दरी लपवण्यासाठी आणि कामकरी जनतेमध्ये खोटे विभाजन निर्माण करण्यासाठी सर्व प्रयत्न करत असतो.

सर्व भांडवली सरकारे भांडवलदार वर्गाची सेवा करण्यासाठीच अस्तित्वात आहेत. म्हणूनच बेरोजगारी, महागाई आणि सुविधांचे असमान वाटप यासारख्या समस्या अपघाती नाहीत; तर त्या व्यवस्थेच्या रचनेचा भाग आहेत. दरम्यान, बहुसंख्यांक जनतेला विभाजित करून आपले राज्य टिकवून ठेवण्यासाठी भांडवली व्यवस्थेचे लाभार्थी जातीयवाद, धर्मवाद आणि इतर प्रकारच्या भेदभावी प्रचाराचा वापर करतात. या व्यवस्थेत, कोल्डप्ले सारख्या कार्यक्रमांचे उद्दिष्ट उन्मादाला प्रोत्साहन देणे, सामाजिक जाणीवेला सुन्न करणे, प्रगतीबद्दल खोट्या कल्पना निर्माण करणे आणि शासक वर्गाची वर्ग एकता वाढवणे आहे.

श्रीमंत, त्यांचा कॉर्पोरेट मीडिया आणि त्यांची सरकारे, कोल्डप्ले सारख्या व्यावसायिक कलाकारांच्या मदतीने आपल्याला ‘अच्छे दिन’चे खोटे स्वप्न पटवून देण्याचा प्रयत्न करत असताना, त्यांच्या प्रचाराचा पर्दाफाश करण्यासाठी आणि ही व्यवस्था, जी ऐतखाऊ आणि कामकऱ्यांमधील दरी वाढवत राहते, नष्ट करण्यासाठी आपल्याला कामगार-कष्टकऱ्यांच्या सांस्कृतिक आंदोलनाची, आपली कामगार वर्गीय संस्कृती विकसित करत रुजवण्याची गरज आहे.

# मॅक्सिम गॉर्कीच्या वाढदिवसानिमित्त (28 मार्च) एक साहित्यिक परिचय



✎ राजकुमार

मॅक्सिम गॉर्की (28 मार्च 1868 - 18 जून 1936) हे एक महान क्रांतिकारी लेखक आणि समाजवादी वास्तववादाचे प्रणेते म्हणून जगभरात ओळखले जातात. रशियातील झारशाही राजवटीत 1907 च्या अयशस्वी क्रांतीपासून ते 1917 च्या ऑक्टोबर समाजवादी क्रांती आणि त्यानंतरच्या समाजवादी बांधणीपर्यंतच्या दीर्घ काळात, मॅक्सिम गॉर्कीने आपल्या कथा, नाटके, लेख आणि कादंबऱ्यांद्वारे लोकांना त्यांच्या परिस्थितीविरुद्ध लढण्यासाठी प्रत्येक पावलावर प्रेरित केले. तो त्याच्या काळातील शोषित लोकांच्या आत्मिक भावनांचा आवाज म्हणून उदयास आला. विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून ते ऑक्टोबर क्रांतीनंतर सुमारे 40 वर्षांपर्यंत, गॉर्की यांनी त्यांच्या लेखणीने रशियन साहित्यात आणि लोकांमध्ये परिवर्तनाची नवी ऊर्मी निर्माण केली. शिवाय, त्यांचे सर्व सृजन लोकांच्या जीवनाशी आणि संघर्षांशी जवळून जोडलेले होते.

लहानपणापासूनच समाजातील शोषित वर्गांशी थेट संपर्कात असलेल्या गॉर्कीच्या लेखनाकडे त्यांच्या जीवनाच्या आणि त्या काळातील रशियन समाजाच्या दृष्टिकोनातून पाहिले तर त्यांच्या साहित्यनिर्मितीचा स्रोत काय होता हे स्पष्ट होते. गॉर्कीचे आईवडील त्याच्या बालपणातच वारले आणि त्याने त्याचे बालपण त्याच्या आजीकडे घालवले, जिथे त्याला रशियन मध्यमवर्गीय कौटुंबिक वातावरणाचा अनुभव आला. आजीच्या मृत्यूनंतर, कुटुंबात मालमत्तेवरून भांडणे सुरू झाली, त्यानंतर गोर्कीने वयाच्या 13 व्या वर्षी घर सोडले आणि रशियामध्ये प्रवास केला, अनेक वेळा नोकरी बदलली. या काळात त्यांना समाजाचे अधिक जवळून निरीक्षण करण्याची संधी मिळाली आणि ते अनेक प्रकारच्या लोकांच्या संपर्कात आले. अशाप्रकारे गोर्की लहानपणापासूनच मजूर म्हणून वाढला आणि त्याचे बालपण कठोर परिश्रम आणि संघर्ष करण्यात गेले, घरकामांपासून ते बेकरी कारखाने, जहाजे आणि शेतांपर्यंत विविध कामे करण्यात.

येणाऱ्या काळात, बालपणीचे हे अनुभव त्यांच्या साहित्यकृतींचा आधार बनले आणि ते लोकांच्या मुक्ती संग्रामाचा एक भाग म्हणून उदयास आले. त्यांच्या संपूर्ण साहित्यकृतींमध्ये, गॉर्की रशियन जीवनातील कठोर वास्तवांचे एखाद्या व्यक्तीच्या दृष्टिकोनातून वास्तववादी चित्रण सादर करत नाहीत, तर त्या परिस्थिती बदलण्यासाठी प्रेरणास्रोत म्हणून ते वाचकासमोर येतात. गॉर्कीच्या शब्दांत सांगायचे तर, "दयेपेक्षा सत्य महत्त्वाचे आहे. आणि आज मी स्वतःची नाही, तर सामान्य रशियन लोक ज्या भयानक, गुदमरणाऱ्या वातावरणात जगत होते आणि अजूनही जगत आहेत, त्याची कहाणी लिहिण्यासाठी बसलो आहे." "जुने जग निश्चितच एका प्राणघातक आजाराने ग्रस्त आहे आणि आपण त्या जगापासून लवकरात लवकर मुक्त झाले पाहिजे जेणेकरून त्याची विखारी हवेने आपल्यावर परिणाम करू नये."

बालपणी, गॉर्कीची रशियातील झारशाहीच्या हुकूमशाही आणि दडपशाहीविरुद्ध लढणाऱ्या क्रांतिकारकांशी वेळोवेळी ओळख झाली. त्यांच्या जीवनाचा त्याच्यावर खोलवर परिणाम झाला. "आणि अशा असंख्य लोकांच्या समूहातील एका व्यक्तीशी माझी पहिली मैत्री संपली, असे लोक जे स्वतःच्या देशात परदेशी आहेत, पण प्रत्यक्षात त्याचे सर्वोत्तम पुत्र आहेत..." या लोकांशी संपर्क साधल्याने गॉर्कीला पुस्तकांची ओळख झाली. गॉर्कीच्या जीवनातील परिस्थितीमुळे त्यांना कोणत्याही शाळेत किंवा विद्यापीठात शिक्षण घेण्याची संधी मिळाली नाही, परंतु त्यांनी स्व-अभ्यासाला आणि जनतेशी जोडून मिळवलेल्या अनुभवाला स्वतःच्या शिक्षणाचे केंद्र बनवले. गॉर्कीच्या शब्दात सांगायचे तर, "मी स्वतःची तुलना मधमाश्यांच्या पोळ्याशी करू शकतो, जिथे देशातील असंख्य सामान्य लोकांनी त्यांच्या ज्ञानाचा आणि तत्वज्ञानाचा मध गोळा केला आहे. सर्वांच्या मौल्यवान योगदानामुळे माझे चारित्र्य विकसित झाले. अनेकदा देणाऱ्याने घाणेरडा आणि कडू मध दिला, तरीही तो ज्ञानाचा मध होता."

गॉर्कीने त्याच्या बालपणातच झारशाहीतील रशियन लोकांची गरिबी आणि अत्याचार पाहिले होते आणि त्या समाजात एक मोठ्या भागास शोषित वर्ग म्हणून जगण्यास आणि प्राण्यांसारखे जीवन जगण्यास भाग पाडले जात होते याची त्याला जाणीव होती. "मला त्यांच्यामध्ये स्वतःबद्दल जळत्या अंगाऱ्यात टाकलेल्या जळत्या लोखंडाच्या तुकड्यासारखे वाटत असे - दररोज मला अनेक तिखट अनुभव येत होते. माणसं त्यांच्या पूर्ण नग्नतेत - स्वार्थ आणि लोभाचे मूर्त स्वरूप म्हणून दिसू लागली. जीवनाबद्दलचा त्यांचा राग, जगातील प्रत्येक गोष्टीबद्दलचा त्यांचे उपहासात्मक शत्रुत्व आणि त्याच वेळी स्वतःबद्दलचा त्यांचा बेफिकीरपणा -"

त्यांच्या साहित्यिक कारकिर्दीच्या सुरुवातीला, गॉर्कीची ओळख टॉल्स्टॉय आणि चेखोव्ह सारख्या महान रशियन वास्तववादी लेखकांशी झाली. गॉर्की त्याच्या सुरुवातीच्या काळापासून क्रांतिकारी चळवळींशी संबंधित होते. नंतर, ते बोल्शेविक कम्युनिस्ट पार्टीमध्ये सामील झाले आणि लोकांच्या संघर्षांमध्ये जवळून सहभागी झाले आणि या काळात त्यांनी पक्षात सहभागी असलेल्या कामगार आणि क्रांतिकारकांच्या जीवनावर आणि संघर्षावर आधारित त्यांची जगप्रसिद्ध कादंबरी 'आई' (1906) लिहिली. जिच्याबद्दल लेनिन म्हणाले होते की ती वाचल्याने क्रांतीची उद्दिष्टे समजून घेण्यासाठी उत्स्फूर्तपणे चळवळीत सामील झालेल्या सर्व कामगारांना मदत होईल.

आजही, जेव्हा जगभरातील कामगार चळवळी गतिरोधित आहेत आणि प्रगतीवर प्रतिरोध वर्चस्व गाजवत आहे, तेव्हा गॉर्कीच्या कादंबऱ्या आणि कथा जगभरातील लोकांच्या संघर्षांशी अत्यंत प्रासंगिक आहेत. आजही त्यांचे लिखाण संपूर्ण जगातील कष्टकरी लोकांना समतावादी समाजाच्या निर्मितीसाठी, परिस्थिती बदलण्यासाठी, क्रांतिकारी इच्छाशक्ती निर्माण करण्यासाठी आणि सर्वहारा वर्ग जाणीव विकसित करण्यासाठी उभे राहून लढण्यासाठी प्रेरित करते. गॉर्कीचे साहित्य आपल्या मनात सध्याच्या समाजातील लोकांच्या दयनीय परिस्थितीबद्दल द्वेष निर्माण करतेच, शिवाय त्या परिस्थितीविरुद्ध लढण्याची आणि त्या बदलण्याची इच्छाही निर्माण करते.

गॉर्की त्यांच्या 'आई' या कादंबरीत एका कामगाराच्या शब्दात आपले विचार व्यक्त करतात, "आपण फक्त पोट भरण्याची काळजी करतो का? नक्कीच नाही." "आपल्या मानेवर बसलेल्या आणि डोळ्यांवर पट्टी बांधणाऱ्यांना आपण हे दाखवून दिले पाहिजे की आपल्याला सर्व काही दिसते. आपण मूर्ख नाही किंवा जनावरं नाहीत की आपल्याला पोट भरण्याशिवाय इतर कशाचीही चिंता नाही. आपल्याला माणसांसारखे जीवन जगायचे आहे! आपण हे सिद्ध केले पाहिजे की त्यांनी आपल्यावर लादलेले कठोर परिश्रमाचे जीवन आपल्याला बुद्धिमत्तेत त्यांच्यापेक्षा पुढे जाण्यापासून रोखू शकत नाही!"

गॉर्कीने आपल्या साहित्यात रशियातील शोषित लोकांचे जीवन जितके जवळून पाहिले तितकेच स्पष्टपणे चित्रित केले आणि व्यापक जनतेला शिक्षित करण्यात त्यांनी अतिशय ऐतिहासिक भूमिका बजावली. त्यांच्या आत्मचरित्रात, गॉर्की यांनी लिहिले आहे की, "परिस्थितीच्या बंधनांना सहन करण्याची आणि त्यांच्या अधीन होण्याची गरज जितकी भयंकर आहे तितकी जगात कोणतीही गोष्ट माणसाला अपंग बनवत नाही." गॉर्कीने त्यांच्या कथा, नाटके, कादंबऱ्या आणि लेखांमधून समाजाचे चित्रणच केले नाही तर त्यांचा वापर एक शस्त्र म्हणूनही केला, "अशा घृणास्पद गोष्टींचे वर्णन इतक्या प्रमाणात करणे आवश्यक आहे का? हो, ते आवश्यक आहे! हे आवश्यक आहे, साहेब, जेणेकरून तुमची फसवणूक होऊ नये, जेणेकरून तुम्हाला असे वाटू नये की अशा गोष्टी फक्त भूतकाळात घडल्या आहेत! आजही तुम्ही बनावट आणि काल्पनिक भयानक घटनांमध्ये रस घेता, सुंदर लिहिलेल्या भयानक कथा आणि कथा वाचण्यास तुम्हाला आवडते. अंगावर काटा आणणाऱ्या विचारांनी तुम्ही तुमचे हृदयाला भुलवण्यात घालमेल करत नाही. पण मी खऱ्या भयानक घटनांशी, दैनंदिन जीवनातील भयानक घटनांशी परिचित आहे आणि हा माझा अविभाज्य अधिकार आहे की त्यांचे वर्णन करून तुमचे हृदयाला ओरबाडणे, त्यात ठणका निर्माण करणे जेणेकरून तुम्हाला नेमके कळेल की तुम्ही कोणत्या जगात आणि कोणत्या प्रकारचे जीवन जगता." "आपण सर्वजण जगत असलेले हे नीच आणि घाणेरडे घृणास्पद जीवन आहे." "मला मानवजातीवर प्रेम आहे आणि मी तिला कोणत्याही प्रकारचे दुःख देऊ इच्छित नाही, परंतु यासाठी आपण भावनिकता स्वीकारू नये किंवा चमकदार शब्द आणि सुंदर खोट्या गोष्टींचे जाळे बांधून जीवनाचे भयानक सत्य लपवू नये! आपण जीवनाकडे वळले पाहिजे आणि आपल्या हृदयात आणि मनात जे काही चांगले आणि मानवीय आहे ते जीवनात ओतले पाहिजे."

भौतिकवादी म्हणून, गॉर्कीने मानवी स्वभावासाठी परिस्थितीला जबाबदार धरले आणि याकरिता जीवनातील भौतिक परिस्थिती बदलण्याचा आग्रह धरला: "रशियन लोक त्यांच्या गरिबी आणि एकाकीपणामुळे हे करतात. व्यथा आणि दुःख हे त्यांच्या मनोरंजनाचे साधन आहे." "जेव्हा जीवनाचा प्रवाह एकसंध असतो, तेव्हा संकटे देखील मनोरंजनाचे साधन बनतात. घरात आग देखील नवीनतेचा आनंद प्रदान करते."

गॉर्की, त्यांच्या काळातील वर्तमान जीवनावर टीका करण्याबरोबरच, वर्गीय समाजातील स्पर्धेच्या शर्यतीत मानवांच्या वैयक्तिक विघटनावरही जोरदार टीका करत होते आणि त्यांचा असा विश्वास होता की जोपर्यंत काही परजीवी कष्टकऱ्यांचे कष्ट हिसकावत राहतात तोपर्यंत समाजात शांतता प्रस्थापित होऊ शकत नाही. "संपूर्ण वातावरणात एकमेकांना गिळंकृत करण्याची एक अराजक प्रक्रिया सतत सुरू आहे; सर्व मानव एकमेकांचे शत्रू आहेत; स्वतःचे पोट भरण्यासाठी या घाणेरड्या लढाईत सहभागी होणारा प्रत्येक माणूस फक्त स्वतःचा विचार करतो आणि आजूबाजूला संशयाने पाहतो, जेणेकरून त्याच्या शेजाऱ्याने त्याचा गळा दाबू नये. या थकवणाऱ्या, क्रूर लढाईच्या भोवऱ्यात अडकून, बुद्धिमत्तेच्या सर्वोत्तम शक्ती इतरांपासून स्वतःचे रक्षण करण्यात वाया जातात; मानवी अनुभवाची ती प्राप्ती जिला "मी" म्हणतात ती एक अंधारे तळघर बनते ज्यात अनुभवाला अधिक समृद्ध न करण्याच्या आणि जुन्या अनुभवाला तळघराच्या गुदमरणाऱ्या खोल्यांमध्ये बंद ठेवण्याच्या क्षुद्र प्रवृत्ती वर्चस्व गाजवतात. भरलेल्या पोटाशिवाय माणसाला आणखी काय हवे आहे? हे ध्येय साध्य करण्यासाठी, माणूस त्याच्या उदात्त आदर्शांपासून घसरला आहे आणि जखमी अवस्थेत, डोळे फाडून वेदनेने ओरडत आणि कण्हत आहे."

लोकांच्या मुक्तीलढ्यावर पूर्ण विश्वास असल्याने आणि क्रांतिकारी म्हणून त्या लढ्यात सहभागी असल्याने, गॉर्कीचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन आशावादाने भरलेला होता आणि लोकांवर दृढ विश्वास होता, "आपल्या जीवनाचे वेगळेपण असे नाही की ते पाशविकता आणि क्रूरतेच्या जाड थरात गुंडाळलेले आहे, तर या थराखाली तेजस्वी, बलवान, सर्जनशील आणि चांगल्या शक्ती विजयी होत आहेत आणि एक दृढ आशा निर्माण करत आहेत की तो दिवस दूर नाही जेव्हा आपल्या देशातील लोकांच्या जीवनात सौंदर्य आणि तेजस्वी मानवतेचा सूर्य उगवेल आणि तो नक्कीच उगवेल."

गॉर्कीचे संपूर्ण जीवन आणि त्यांचे साहित्यिक कार्य जगभरातील कामगारांसाठी प्रेरणास्रोत आहे आणि आपल्याला प्रत्येक पावलावर अन्यायाविरुद्ध लढण्यास प्रोत्साहित करते. त्यांचा असा विश्वास होता की, "भांडवली समाजात, माणूस एकूणच निरर्थक ध्येये साध्य करण्यासाठी आपली अद्भुत क्षमता वाया घालवतो. स्वतःकडे लक्ष वेधण्यासाठी, त्याला रस्त्यावर हातावर चालावे लागते, कमी किंवा काहीच व्यावहारिक मूल्य नसलेले वेगाचे रेकॉर्ड प्रस्थापित करावे लागतात, एकाच वेळी वीस लोकांसोबत बुद्धिबळाचे सामने खेळावे लागतात, आश्चर्यकारक कसरती आणि कविते रचनेचे खोटे पराक्रम करावे लागतात आणि सामान्यतः अशा सर्व प्रकारच्या निरर्थक कृती कराव्या लागतात ज्यामुळे कंटाळलेल्या आणि थकलेल्या लोकांचे मनोरंजन करता येईल...."

ऑक्टोबर क्रांतीनंतर, गॉर्की त्यांच्या शेवटच्या दिवसांपर्यंत सोव्हिएत युनियनमधील समाजवादी छावणीतील अनेक तरुण लेखकांचे उत्साहाने नेतृत्व करत राहिले. "पोलादाला चढले पाणी (अग्निदीक्षा)" या कादंबरीचे लेखक निकोलाई ओस्त्रोव्स्की यांनी 1936 मध्ये गॉर्कीबद्दल लिहिले: "आमच्या तुकडीतील कमांडर, एक उंच, पांढऱ्या केसांचा कमांडर – प्रसिद्ध आणि आदरणीय, त्याच्या कलेत पारंगत. मिशावर ताव मारत, हळू आणि अतिशय गंभीर स्वरात म्हणतो: 'मी या डॅ्रगर्सचे काय करावे? ते मागे कुठेतरी बसून नाश्ता करत असतील'. ते पुढच्या पथकापेक्षा 50 मैल मागे असतील. त्यांचे स्वयंपाकघर मागे कुठेतरी दलदलीत बुडाले आहे. माझ्या केसाना लाजवताहेत ते. हा एक विनोद आहे, पण एक कटू विनोद आहे, त्यात सत्य कमी नाही."

शेवटी, गॉर्कीच्या स्वतःच्या शब्दांत, "माझ्यासाठी, विचार माणसाच्या पलीकडे अस्तित्वात नाहीत. माझ्यासाठी, माणूस आणि

पान 18 वर

# बुलडोझर 'न्याय' नव्हे, बुलडोझर दडपशाही!
## निशाण्यावर कामगार-कष्टकरी आहेत, फक्त मुस्लिम नाहीत!




✏ **मिराज**

फाशिस्ट मोदी सरकारकडून गेल्या काही वर्षांपासून या देशात एक विचार सातत्याने जनमानसात रुजवण्यात येत आहे. तो म्हणजे या देशातील अल्पसंख्य असलेल्या मुस्लिम समुदायाच्या इमारतींवर म्हणजेच त्यांच्या घरांवर, दुकानांवर व धार्मिक जागांवर, कायद्याची प्रक्रिया धाब्यावर बसवत सूड भावनेने बुलडोझर चालवून जागा उध्वस्त करणे आणि याला दंडात्मक कारवाई म्हणून जनमानसात प्रस्थापित करणे.

महाराष्ट्रात गेल्याच आठवड्यात नागपूर मध्ये घडलेल्या धर्मांध दंगलीनंतर तथाकथित संशयित मुस्लिम आरोपीच्या घरावर बुलडोझर चालवण्यात आला. त्याच्याच काही आठवड्यांपूर्वी मालवण मधील एका मुस्लिम कुटुंबाचे भंगाराचे दुकान बुलडोझरने उद्ध्वस्त करण्यात आले होते. या कुटुंबातील एका अल्पवयीन मुलाकडून भारत-पाकिस्तान क्रिकेट सामन्यादरम्यान 'देश विरोधी' नारे दिल्याचे आणि धार्मिक भावना दुखावल्या गेल्याचे सांगत मालवण नगरपालिकेकडून ही कारवाई केली गेली होती. गेल्या काही वर्षांमध्ये उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, आसाम, गुजरात, सारख्या भाजपशासित राज्यांमध्ये अशा कारवायांच्या संख्येत वाढ झाली आहे व याचा "बुलडोझर न्याय" म्हणून प्रचार करत त्याचे गौरवीकरण करण्यात आले आहे. याची सुरुवात उत्तर प्रदेश मध्ये योगी आदित्यनाथच्या सरकारने गुन्हेगार आणि गँगस्टर लोकांच्या संपत्तीवर बुलडोझर चालवण्यापासून केली होती ज्यामध्ये बहुतांश गुन्हेगार हे 'योगायोगाने' मुस्लिम समाजातीलच होते. यामुळे योगी आदित्यनाथ याची 'बुलडोझर बाबा' म्हणून छवीही प्रस्थापित केली गेली. योगी आदित्यनाथचे उदाहरण घेऊन मध्यप्रदेश मध्ये शिवराज सिंग चौहान, गुजरात मध्ये भूपेंद्र पटेल, आसाम मध्ये हेमंत बिश्व शर्मा यांनी त्यांच्या राज्यातही अशा कारवाया करण्यास सुरुवात केली. आणि आता देवेंद्र फडणवीस आणि महायुतीचे सरकार त्यांच्याच पावलावर पाऊल टाकून महाराष्ट्रातही अशा कारवाया करत आहे. बहुतांश वेळा अशा कारवाया, पूर्वनियोजित घडवून आणलेल्या धार्मिक दंगलींच्या पश्चातच त्या विशिष्ट परिसरातल्या मुस्लिम वस्त्यांवर करण्यात आल्या आहेत. पण लगेचच अशा कारवाया सर्वसामान्य कष्टकरी जनतेच्या घरांवर सुद्धा होऊ लागल्या आहेत.

जरी अशा कारवायांच्यामागे नेहमीच सरकार आणि प्रशासनाद्वारे अतिक्रमणाचे औपचारिक कारण दिले गेले आहे तरी याचे मुख्य उद्दिष्ट एकीकडे मुस्लिमांवरील कारवायांद्वारे हिंदुत्ववादी आधाराला मजबूत करणे, भाजप -संघाने निर्माण केलेल्या धार्मिक उन्मादी गर्दीमध्ये स्वतःची एक आकर्षक, आक्रमक हिंदूंचा मसीहा असल्याची छबी निर्माना करणे आहे, आणि दुसरीकडे सरकारबद्दल सामान्य कष्टकरी जनतेच्या मनात दहशत निर्माण करणे आहे.

या परिघटनेचा एक साचा बनला आहे. सुरुवातीला बजरंग दल किंवा विश्व हिंदू परिषद सारख्या हिंदुत्ववादी संघटनांकडून भव्य रॅली काढली जाते. ती रॅली जाणूनबुजून मुस्लिम बहुल क्षेत्रातून नेली जाते. मग कधी डीजेवर उन्मादी, भडकाऊ गाणी लावून किंवा इतर प्रकारे जाणूनबुजून उसकवले जाते; किंवा काही घटनांमध्ये एखाद्या हिंदुत्ववादी संघटने कडून मुस्लिम धर्माविरुद्ध काही आक्षेपार्ह विधाने करण्यात येतात. यातूनच मग कधी अपेक्षित प्रतिरोध निर्माण होतो आणि मुद्दा भडकवायला वाव मिळतो. यातून झडपा वा दंगली घडल्याच्या काहीच दिवसात तिथल्या प्रशासनाद्वारे त्या क्षेत्रातील मुस्लिम घरांवर बुलडोझर चढवून कारवाई केली जाते. मीडियाद्वारे अशा कारवायांना "दोषीवर" झालेल्या दंडात्मक कारवायांचा तर्क देऊन न्याय्य ठरवण्याचा प्रयत्न केला जातो व अशा कारवायांचे जुजबीकरण केले जाते. प्रशासन नेहमीच अशा कारवाया अतिक्रमणाच्या नावाखाली करते, पण कायद्याची प्रक्रिया धाब्यावर बसवून. गेल्या काही वर्षात याची अनेक उदाहरणे आहेत.

2022 मध्ये दिल्लीमधील जहांगीपुरी नावाच्या मुस्लिम बहुल क्षेत्रातून रामनवमीची रॅली काढण्यात आली व तिथे दंगे भडकवण्यात आले. या घटनेच्या काहीच दिवसात तिथल्या स्थानिक भाजपा नेत्याच्या आव्हानानंतर दिल्ली महानगरपालिकेद्वारे जहांगीरपुरीतील मुस्लिम वस्त्यांवर, दुकानांवर बुलडोझर चढवण्यात आला. अर्थातच, या कारवाईला अतिक्रमण विरोधात केलेल्या कारवाईचे रूप देण्यात आले; पण यात कुठल्याच कायदेशीर प्रक्रियेचं पालन करण्यात आले नाही. तिथल्या रहिवाशांना ना कुठली नोटीस दिली गेली, ना त्यांच्या पुनर्वसनाची कोणती योजना आखण्यात आली. अशाच घटना मध्य प्रदेशातील खारगाव आणि सेंधवा मध्ये, गुजरात मधील खंबात आणि हिम्मतनगर मध्ये, आसामच्या नागाव मध्ये, आणि उत्तर प्रदेशच्या प्रयागराज मध्ये घडल्या. जानेवारी 2024 मध्ये झालेल्या राम मंदिराच्या प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमादरम्यान मुंबईतील मीरा रोड भागातही अशाच प्रकारची दंगल पेटवली गेली. त्याच्या दोन दिवसानंतर मीरा भाईंदर नगरपालिकेकडून त्या भागातील दुकानांवर बुलडोझर कारवाई करण्यात आली. महाराष्ट्रात आता अशा कारवायांची वारंवारता वाढली आहे..

सर्व फॅशिस्टांप्रमाणेच आपल्या देशातील सांप्रदायिक फॅशिस्ट शक्तींनीही यशस्वीरित्या एका खोट्या शत्रूच्या रूपात मुस्लिमांची छबी निर्माण केली आहे. महागाई, बेरोजगारी, उपासमार अशा जनतेच्या खऱ्या समस्यांपासून तिला भरकटवण्यासाठी एका खोट्या शत्रूची गरज असते. व्यापक कुप्रचाराद्वारे आणि भांडवली मीडियाचा पुरेपूर वापर करून फॅशिस्ट संघ आणि भाजपने हे काम सुव्यवस्थितरित्या केले आहे. बुलडोझर कारवाया याच प्रक्रियेचा भाग आहेत. फॅशिस्टकाळात याच खोट्या शत्रूरूपी मुस्लिम समाजाला दुय्यम दर्जाचे नागरिक म्हणून प्रस्थापित करण्यात अशा कारवाया कामी येतात. दैनंदिन जीवनात सामाजिक आणि आर्थिक बहिष्काराला व भेदभावाला सामोरे जावे लागते व याची तीव्रता दिवसेंदिवस वाढत चाललेली आहे. याचे टोक अगदी त्यांच्या लिंचिंग पर्यंतही जाते. अशा स्थितीत जेव्हा या समाजाकडून स्वाभाविक प्रतिरोधाचे प्रयत्न घडतात तेव्हा त्यांना त्यांची जागा दाखवून द्यायला आणि त्यांच्यामध्ये दहशत निर्माण करायला अशा बुलडोझर कारवायांचा वापर केला जातो. यासोबतच उन्मादी हिंदुत्ववादी जमावाच्या द्वेष भावनेला तृप्त करून त्यांच्यात आपली पकड अजून मजबूत करण्याचे कामही फॅशिस्ट ताकदी करतात.

नोव्हेंबर 2024 मध्ये सुप्रीम कोर्टाने अशा "बुलडोझर न्याय" च्या घटनांची दखल घेत त्यावर रोक लावावी असा निर्णय दिला. पण हा निर्णय फक्त कागदावरच राहिला. अशा कारवायांमध्ये झालेल्या नुकसानाची भरपाई किंवा त्या नागरिकांच्या पुनर्वसनाची काहीही ठोस तरतूद करण्यात आलेली नाही.

या कारवायांद्वारे सरकार हे स्थापित करू पहात आहे की ते सर्वशक्तिशाली आहेत, त्यांना कोणीही अडवू शकत नाही, त्यांना त्यांच्या मर्जीने वाटेल ते करता येईल आणि विरोधकाला चिरडले जाईल, आणि या सर्वांना कायदा आडवा आला तरी त्याची पर्वा केली जाणार नाही. स्पष्ट आहे की दहशत आज जरी मुस्लिमांविरोधात जास्त वापरली जाते आहे असे दिसले तरी याच्या निशाण्यावर देशातील कामगार कष्टकरी जनताच आहे. हे "राज्य" नाही तर खुली दडपशाही आहे!

आणि वास्तवात आता अशा कारवाया फक्त मुस्लिम अल्पसंख्यांक पर्यंत मर्यादित राहिलेल्या नाहीत. फॅशिस्ट मोदी सरकार आता स्वतःच्या प्रत्येक राजकीय शत्रूला देशाचा किंवा हिंदूंचा शत्रू घोषित करून त्यावरही बुलडोझर कारवाई करत आहे. नुकत्याच घडलेल्या घटनेत स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा याने त्याच्या शोमध्ये एकनाथ शिंदेंवर केलेल्या विनोदामुळे कार्यक्रमाच्या जागेवर मुंबई महानगरपालिकेकडून अतिक्रमणाच्या नावाखाली दंडात्मक कारवाई करण्यात आली. पिंपरी चिंचवड मध्ये तर हिंदू-मुस्लिम अशी सर्वांची शेकडो एकर जमिनीवरील हजारो घरे एका दिवसात बुलडोझरने तोडली गेली. भविष्यातही सरकारच्या विरोधात जाणाऱ्या प्रत्येक आवाजाला या बुलडोझर दडपशाहीचा सामना करावा लागणार आहे हे स्पष्ट आहे.

अशा कारवायांचा सर्वाधिक फटका सर्वसामान्य गरीब जनतेलाच बसतो. आवासाच्या अधिकारापासून आधीपासून वंचित असलेल्या कष्टकरी गरीब जनतेला अशा कारवाया पूर्णपणे उध्वस्त करतात. आपली घरे, आणि व्यवसायांवर बुलडोजर चालवून त्यांचे अस्तित्वच नष्ट करण्यात येते. अनेकदा अशा कारवायांमध्ये सर्वच धर्मातील गरीब कुटुंब ही उध्वस्त होतात. त्यामुळे आज गरज आहे की या "बुलडोझर राज"ला प्रखर विरोध केला पाहिजे जो की या देशातील सर्वसामान्य कष्टकरी गरीब जनतेच्या जगण्याच्या अधिकारावरच हल्ला आहे.

## मॅक्सिम गॉर्कीच्या वाढदिवसानिमित्त

पान 18 वरून

फक्त माणूसच सर्व गोष्टींचा आणि सर्व कल्पनांचा निर्माता आहे. तोच चमत्कार घडवणारा आहे आणि तोच निसर्गाच्या भविष्यातील सर्व शक्तींचा स्वामी आहे. आपल्या जगात जे काही सर्वात सुंदर आहे ते मानवी श्रम आणि त्याच्या कुशल हातांनी निर्माण केले आहे. आपल्या सर्व भावना आणि कल्पना श्रमाच्या प्रक्रियेत उद्भवतात आणि कला, विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा इतिहास याची पुष्टी करतो. विचार या वस्तुस्थितीचे अनुसरण करतात. मी माणसाला सलाम करतो कारण मला या जगात असे काहीही दिसत नाही जे त्याच्या ज्ञानाचे, त्याच्या कल्पनाशक्तीचे आणि त्याच्या निष्कर्षाचे मूर्त स्वरूप नाही."

"जर एखाद्या "पवित्र" गोष्टीवर चर्चा करायची असेल, तर ती म्हणजे माणसाचा स्वतःबद्दलचा असंतोष, तो जे आहे त्यापेक्षा चांगले बनण्याची त्याची इच्छा. त्याने स्वतः जन्म दिलेल्या जीवनातील सर्व घाणेरड्या गोष्टींबद्दलचा त्याचा द्वेष मी पवित्र मानतो. जगातील लोकांमधील मत्सर, पैशाचा लोभ, गुन्हेगारी, रोग, युद्ध आणि शत्रुत्व संपवण्याची त्याची इच्छा आणि त्याचे श्रम मी पवित्र मानतो."

मूळ लेख: मजदूर बिगूल, मार्च 2013

अनुवाद: राहुल

## लँगस्टन ह्यूज यांची एक कविता

*कोणतीही आशा शिल्लक आहे का?*
*नक्कीच आशा शिल्लक आहे.*
*आशा आहे की आपण अनुभवू*
*की अजूनही जमीन पुरेशी आहे येथे,*
*अन्नही पुरेसे आहे*
*आणि पाणी सुद्धा पुरेसे आहे*
*इतके की मिळू शकेल*
*सर्व मनुष्यांना शांती*
*आणि काही प्रमाणात आरामही.*
*आशा आहे की*
*आपल्या सर्वांकडे स्वप्ने शिल्लक आहेत,*
*आणि अजूनही*
*बहुतांश लोकांची स्वप्ने साकारली जाऊ शकतात...*

*स्वप्नांना मजबुतीने पकडून ठेवा*
*कारण जर स्वप्ने मेली*
*तर जीवन एका पंख छाटलेल्या पक्ष्यासारखे होईल,*
*जो कधीही उडू शकत नाही.*

*• लँगस्टन ह्यूज*

*अनुवाद: स्वप्नजा*

# गोष्ट निवडणुकीच्या धंद्याची...

✍ **रवि**

खुर्ची असो लोखंडाची, खुर्ची असो लाकडाची,
खुर्ची असो माकडाची ते सिंहत्व पावे.
खुर्ची म्हणजेचि सत्ता, खुर्ची म्हणजेचि भत्ता,
खुर्ची म्हणजे सुबत्ता पाच पिढ्या.
खुर्चीस असती चार पाय, ते न धरिता होतो अपाय,
या चार पायांपुढे उपाय न चले कुणाचा.
खुर्ची असता बुडाखाली पंडित गर्दभाची करी हमाली,
खुर्ची नसता बुडाखाली हमालही पुसेना.
खुर्चीसाठी स्फुरे मती, खुर्चीसाठी सगळी गती,
खुर्चीसाठी राष्ट्रपती, तिरुपती जाये.


- मंगेश पाडगावकर (खुर्चीस्तवन, उदासबोध)

*"आमदार घ्या, आमदार! 'गरम गरम' आमदार! काम करणारा, नाही करणारा, मत खाणारा, मत विकणारा, विकत घेणार, कोणता पाहिजे? ...ताई, लाडकी बहीण घेता का? नको? मग, सभा घ्या. 500 रुपयात एक सभा. ...ए! तू, तू! हा तूच! बेरोजगार ना? पत्रक वाटणार का? आणि स्लिपा? तुम्ही दोघे जा. 1500 रुपयात एवढ्या वस्तीत वाटून टाका... ओ काका! कुठे चालले? चला दादांनी बोलावलंय. कशाला? अहो, निवडणूक आली आहे. काय काम?! असं कसं म्हणता! अहो, तुम्हीच आमचे माय-बाप... पुढचे पाच वर्ष सत्तेत कोण बसणार, लोकशाहीचे ओझे कोण वाहणार ठरवायला नको का? यासाठीच तर तुमचा वेळ पाहिजे. चार पैसे जास्त कमवा. वेळ नाहीये? मग तुमचं मत आहे की. एका मताचे एक हजार. म्हणजे आपल्या घरात 4000 रुपये. हा! हा! दिवाळीच आली म्हणायची!..."*

भांडवलशाही ही माल उत्पादनाची व्यवस्था आहे. इथे प्रत्येक गोष्ट माल बनत जाते. निवडणूका याला कशा अपवाद असतील? भारताला सर्वात मोठा लोकशाही देश म्हणून ओळखले जाते. दर पाच वर्षातून येणारी लोकसभेची निवडणूक तर लोकशाहीचा उत्सव म्हणून साजरा केला जातो. वरवर पाहता जनताच देशातल्या सत्ताधाऱ्यांना निवडून देते असा भास या भांडवली निवडणुकांमधून होत असला तरी **वास्तवात मात्र जो पक्ष भांडवलदार वर्गाच्या प्रमुख मर्जीतला आहे, आणि त्यांनी दिलेल्या भरभक्कम निधीच्या जोरावर ज्याची निवडणूक बाजारातली वट मोठी आहे, म्हणजेच जो पक्ष प्रचारयंत्रणा, प्रसारमाध्यमे इतकेच नव्हे तर मते आणि मतदान यंत्रणासुद्धा विकत घेऊ शकतो त्याचीच जिंकण्याची शक्यता सर्वाधिक असते. कसे ते पाहूयात.**

भांडवलशाहीत निवडणूका या नेहमीच बाजारातील शक्तीच्या जोरावर लढल्या गेल्या आहेत. **परंतु आज एका अभूतपूर्व स्तरावर हा बाजार पोहोचला आहे.** आज निवडणूक साहित्य, भाषणं, गाणी, सभा, रॅल्या, जाहिराती, प्रचार ऑटो, बॅनरबाजी, प्रचाराचे नियोजन, मीडिया नियंत्रण, अधिकाऱ्याशी व आयोगाशी संधान, इत्यादी सगळ्यांचा बाजार झाला आहे. "जनतेचे समर्थन", "कार्यकर्त्यांचे बळ", "वैचारिक आधार" यासारख्या गोष्टी लोकशाहीच्या "नृत्याला" घडवत नाहीत, तर बाजारातील उलाढाली निवडणुक करवतात. अनेक भांडवली पक्षांकडे वैचारिक समजदारी किंवा कार्यक्रमावर आधारित जोडलेल्या कार्यकर्त्यांच्या जाळ्याची तर वाणवा आहेच, भाजपसारख्या कॅडर आधारित पक्षाचाही निवडणूक यंत्रणेचा प्रमुख आधार बाजारातील शक्ती बनलेल्या आहेत. **भांडवली निवडणूकांच्या बाजारी रूपाच्या एकेका मुद्याकडे नजर टाकूयात.**

हे तर सर्वांना दिसूनच येते की प्रचाराकरिता



वापरले जाणारे झेंडे, टोप्या, गणवेश यांचा मोठा व्यवसाय आहे, आणि सर्वच प्रमुख पक्ष कोट्यवधी खर्च करून या सर्व गोष्टी बाजारातूनच विकत घेतात. त्याहीपुढे प्रचाराची रंगीबेरंगी पत्रके, अनेक पानी पुस्तिका व्यावसायिकांकडून बनवून घेतली जातात. उमेदवारांचे पैसे देऊनच केले गेलेले फोटो सेशन त्याचाच एक भाग आहे. प्रचाराकरिता लागणाऱ्या शेकडो रिक्षा, टेंपो, डीजे यंत्रणा पुरवणारे बाजार तर इतके विकसित आहेत की निवडणूका जाहीर होताच हे सर्व व्यावसायिक आपले दर चांगलेच वाढवतात. मोटारसायकलच्या रॅल्यांकरिता दिवसाला 500 ते 2000 रुपये घेऊन सध्याच्या दराने पाहिजे तेवढी माणसे मिळू शकतात. एखाद्या वस्तीत जर प्रचाराला गेले तर उमेदवाराला ओवाळण्यापासून ते त्याच्या हातात एखाद्याचे मूल देऊन फोटो काढण्याकरिता सुद्धा दर ठरलेले आहेत. सभेला गर्दी जमवायची असेल तर लाखोंच्या संख्येने माणसे 300, 500, ते काही हजार रुपयांच्या दराने सहज उपलब्ध करवली जातात, आणि ही गर्दी जमवणारे कंत्राटदार पक्षाचा आणि झेंड्यांचा फरक न बघता अगदी व्यावसायिकपणे कुठेही गर्दी जमवतात. आता तर विद्यापीठांमधील बेरोजगार युवकांना सुद्धा दिवसाचे 1000-2000 रुपये देऊन "युवकांची" गर्दी जमवली जाते. याचे असंख्य व्हिडिओ प्रसारमाध्यमांवर तर फिरतच असतात, पण तू नंगा म्हणणारे सगळे भांडवली पक्षही एकमेकांवर हे आरोप करत असतात. निवडणुकीच्या दिवशी बूथ लावण्याकरिता, मतदान प्रतिनिधी म्हणून आणि मतमोजणीकरिता सुद्धा मोजणी प्रतिनिधी म्हणून पाहिजे तेवढी माणसे भाड्याने मिळतात! आणि शेवटी राहिली मतं, तर ती सुद्धा बाजारातील मालच आहेत हे सर्वज्ञात आहे. झोपडपट्ट्याच नव्हे तर उच्चमध्यमवर्गीय सोसायट्यांमध्ये सुद्धा मतांचे दर लागतात आणि 4-5 हजारांतही मत विकले जाते. थोडक्यात जर तुमच्याकडे कोट्यवधी रुपये असतील, आणि आजच राजकारण सुरू करायचे असेल, **तर अगदी एका दिवसात पैसे फेकून संपूर्ण प्रचारयंत्रणा तयार करता येते,** त्याहीपुढे जाऊन निवडून आलेले आमदार-खासदारही विकत मिळतात, आणि आयाराम-गयारामचे खेळ चालुच राहतात. मंत्रीपदाकरिता सुद्धा बोल्या लागतात, आणि जास्त निधीची मंत्रीपदे (जसे की नगरविकास, महसुल, गृह, इत्यादी) मिळवायची तर मोलभाव होतोच होतो.

उमेदवारांचा बाजार फार पूर्वीपासूनच चालत आलाय. सर्व मोठ्या भांडवली पक्षांच्या उमेदवारीकरिताच कोट्यवधी रुपये खर्चण्याची क्षमता पक्षाला दाखवावी लागते आणि अनेकदा पक्षप्रमुखांना नजराणेही द्यावे लागतात हे सर्वज्ञात आहे. भांडवलशाही नेहमीच असमान संधी निर्माण करते. "लोकशाही" निवडणुकांमध्येही ज्या उमेदवारामागे भांडवलदारांच्या निधीचे पाठबळ असेल, त्याचाच वरचा हात राहण्याची जास्त शक्यता आहे. म्हणूनच करोडपती उमेदवाराला सर्व भांडवली पक्षांमध्ये उमेदवारी देण्यास प्रथम पसंती आहे. त्यापुढे जाऊन खोट्या उमेदवारांचा खेळ रचला जातो. उदा. 2024 च्या विधानसभा निवडणुकीत भाजप, राष्ट्रवादी, शिवसेना यांच्या महायुतीने महाविकास आघाडीची मतं खाण्यासाठी किमान 3 जागांवर सारख्या नावाचे डमी अपक्ष उमेदवार (अर्थातच पैसे खर्चून) उभे केले. उदाहरणार्थ सांगलीत तासगाव, पुण्यात वडगावशेरी आणि पर्वती मतदार संघांमध्ये. राष्ट्रवादी (शपा) गटाची मतं खाण्यासाठी अनेक ठिकाणी तुतारी सारख्या दिसणाऱ्या पिपाणी चिन्हाची भरघोस मागणी अपक्ष उमेदवारांनी केली. अनेक ठिकाणी मुस्लीम धर्मियांची, दलितांची, किंवा एखाद्या जात-धर्म समुदायाची मतं कापण्यासाठी त्या धर्माचे/जातीचे डमी उमेदवार उभे केले जातात. वंचित बहुजन आघाडी किंवा एमआयएम किंवा बसपा सारख्या पक्षांचे उमेदवार अनेकदा भाजप (किंवा काँग्रेस) सारख्या पक्षांच्या निधीवर मते खाण्यासाठी आणि आपल्या पक्षाची मतदान टक्केवारी वाढवण्यासाठी निवडणुका लढतात. पैसे घेऊन उमेदवार उभे केल्याचे, उमेदवारी मागे घेतल्याचे चुकून रेकॉर्ड झालेले अनेक ऑडियो-व्हिडियो निवडणुकीच्या काळात समोर येत असतात.

**त्यापुढे जाऊन आता या बाजाराला जे "शास्त्रशुद्ध" बाजाराचे रूप येत आहे, ते जाणले पाहिजे.** आज प्रचाराचे तंत्र, पद्धत, मुख्य मुद्दे, शैली, इत्यादी ठरवण्यासाठी अनेक राजकीय रणनीतीकार आणि राजकीय सल्लागार कंपन्यांचा सुळसुळाट झाला आहे. पगारी लोकांद्वारे माहिती गोळा करणे, तज्ञ विदातज्ञाची (डेटा एक्सपर्ट, डेटा सायंस शिकलेले, वगैरे) सेवा घेऊन जात-धर्म इत्यादीवर आधारित धोरण ठरवणे, सतत सांख्यिकी माहिती गोळा करून जनतेची नाडी तपासत राहणे, स्थानिक आणि राष्ट्रीय मुद्यांवरचे मत तपासत राहणे, अशा अनेक प्रकारांनी हे काम आता पैसे देऊन व्यावसायिकरित्या करवले जाते.

**राजकीय सल्लागार निवडणुकीच्या आधी पक्षाच्या नेत्यांसोबत करार करून निवडणुकीच्या प्रचाराचे कंत्राट त्यांना देतात. हे सल्लागार कोणत्याही विचारांचा प्रचार करण्यास तयार असतात.** अनेक बैठकांमधून राजकीय लक्ष्य आणि अपेक्षा जाणून घेऊन एक रणनीती बनवली जाते, जीचा प्रभावीपणा वेळोवेळी तपासला जातो. त्यानंतर जमिनी स्तरावरचे आणि डिजिटल डेटा वापरून सर्वेक्षण केले जातात. डिजिटल सर्वेक्षण करण्यासाठी बहुतांशवेळी भारतामध्ये डेटा सुरक्षेचे नियम नसल्यामुळे मतदात्यांचा डेटा विकला जातो आणि त्यामुळे व्यक्तिनिहाय माहिती काढणेसुद्धा शक्य बनते. या सर्वेक्षणांचा वापर करून कोणत्या मतदारसंघात कोणता उमेदवार उभा करावा किंवा कोणत्या मतदारसंघामध्ये प्रचाराचे मुद्दे काय असले पाहिजेत असे महत्त्वाचे निर्णय घेतले जातात. याच कंपन्यांद्वारे सोशल मीडिया, व्हॉट्सअॅप मेसेजिंग, कॉल सेंटर, बॅनरबाजी, जमिनी प्रचार, रॅल्या, सभा, ऑटो आणि एलईडी टेंपो प्रचार, स्लिप वाटप अशा सर्व जबाबदाऱ्यांचे नियोजन केले जाते.

प्रचाराच्या काळात पक्षाच्या प्रचारकांच्या वेळेचे नियोजन करणे अतिशय महत्त्वाचे ठरते. भाजपसारख्या पक्षासाठी कॅडर व्यवस्थापन करण्यासाठी विशेष अॅप बनवले गेले, ज्याचा वापर प्रत्येक कार्यकर्त्याची वैयक्तिक माहिती बघण्यासाठी, दिवसभराच्या कामांचे नियोजन, तसेच कॅडरकडून कार्यक्रमाबद्दल जमिनी माहिती गोळा करण्यासाठी केला गेला. 2000 ते 2500 कोटींचा निवडणूक सल्लागाराचा धंदा आज जवळपास 30 हजार पेक्षा जास्त व्यक्तींना पगारावर ठेवतो. आता देशातल्या प्रतिष्ठित बिझनेस स्कूल्स, आयआयटी, आयआयएम मधूनसुद्धा विद्यार्थ्यांना इथे नोकऱ्या दिल्या जात आहेत. प्रशांत किशोर, सुनिल कानुगोलु, निरंजन बाबू, नरेश अरोरा, रजत सेठी असे अनेक निवडणूक सल्लागार आज भारतात प्रसिद्ध आहेत.

टीव्हीवरील जाहिराती, रोजच्या प्रचाराच्या पोस्ट, युट्यूबवरील व्हिडियो, गुगलवर दिलेल्या ॲड्स या सर्वांच्या व्यवस्थापनासाठी **अनेक सोशल मिडिया व्यवस्थापन कंपन्या राजकीय पक्षांसोबत करारबद्ध होतात.** फेसबूक, इंस्टाग्रामच्या फीडचे विश्लेषण करून जनतेचा मानस जाणून घेण्याचा प्रयत्न केला जातो. पक्षाच्या पोस्टवर आलेल्या कमेंट्सवर उत्तर देण्यासाठी एक पगारी लोकांची टीम बनवली जाते. तसेच, कमेंट्सवरून जनतेचा मानस जाणून घेण्यासाठी सॉफ्टवेअरचा वापर केला जातो. पोस्ट लिहिण्यासाठी, प्रचार व्हिडियोची स्क्रिप्ट लिहिण्यासाठी, प्रचारगीत बनवण्यासाठी, प्रचाराची टॅगलाईन बनवण्यासाठी तज्ञ व्यक्तींना कामाला लावले जाते. आता तर कृत्रिम बुद्धिमत्तेचा(एआय) वापर करून प्रभावी व्हिडियो आणि पोस्ट्स बनवल्या जात आहेत. त्याचसोबत डीपफेक तंत्रज्ञानाचा वापर करून एखाद्या उमेदवाराचे खोटे व्हिडियोदेखील प्रसारित केले जात आहेत. या सर्वांचा वापर निवडणुकीच्या काळात जनतेच्या मनात उमेदवार आणि पक्षाची छबी निर्माण करण्यासाठी केला जातो.

निवडणुकीच्या प्रचारात आता एका नियोजनबद्ध केंद्रीय पद्धतीने, चिवटपणे, सूक्ष्म

**पान 20 वर**

# स्मृतिदिन (10 मार्च) विशेष : सावित्रीबाई फुले यांचा क्रांतिकारी वारसा

✍स्वप्रजा

भारताच्या समाजसुधारणेच्या इतिहासात जोतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे योगदान क्रांतिकारी आणि प्रेरणादायी आहे. सावित्रीबाई फुले यांचा जन्म 3 जानेवारी 1831 रोजी झाला. त्या काळात शिक्षणावर ब्राह्मणवादी शक्तींची मक्तेदारी असताना, 1848 साली पुण्यातील बुधवार पेठेतील भिडे वाड्यात त्यांनी आणि जोतीराव फुल्यांनी मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. स्त्रिया आणि दलितांना शिक्षण मिळावे, जातीभेद नष्ट व्हावेत, केशवपनासारख्या अमानवी रुढी बंद पडाव्यात, समाजाद्वारे “बहिष्कृतां”साठी मूलभूत सोयी उपलब्ध व्हाव्यात, अशा अनेक गोष्टींसाठी फुले दांपत्याने अथक संघर्ष केला. सामाजिक परिवर्तनाचा संघर्ष करत असतानाच जोतीरावांनी ब्रिटीश सत्तेचे भांडवली चरित्र सुद्धा ओळखले आणि जाती प्रश्नावरील संघर्षाला सत्तेविरोधातील संघर्षाशीही जोडले. त्यांचे कार्य केवळ शिक्षणापुरते मर्यादित नसून, संपूर्ण सामाजिक परिवर्तनाच्या लढ्यापर्यंत पसरलेले आहे.

### सावित्रीबाई फुले: सामाजिक बंडखोरीचे प्रतीक

सावित्रीबाईंचे घराबाहेर पडणे, स्वतः शिकून मग शिक्षिका होणे ही कृती स्वतःहूनच क्रांतिकारक होती. 19व्या शतकात महिला घराच्या चौकटीत, चूल आणि मूल यामध्ये बंदिस्त होत्या. या काळात जेव्हा महिलांना आणि दलितांना शिक्षणावर बंदी होती अशा परिस्थितीत सावित्रीबाईंनी शिक्षणाचा प्रसार करून महिलांना स्वतःच्या हक्कांसाठी लढण्याची प्रेरणा दिली. जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी वंचितांच्या शिक्षणासाठी अधिकाधिक प्रयत्न केले. मनुस्मृतीच्या घोषित शिक्षण बंदीच्या विरुद्ध हा प्रखर विद्रोह होता. सावित्रीबाईंवर शाळेत येता-जाता उच्चवर्णीयांकडून दगड धोंड्यांचा वर्षाव झाला. त्या शाळेत जात असताना लोक दगडफेक करत, चिखल किंवा शेण फेकत, ज्यामुळे सावित्रीबाई आपल्या झोळीत नेहमी दोन साड्या घेऊन जात; एक रस्त्यात खराब झाली, तर दुसरी शाळेत वापरण्यासाठी होती, जेणेकरून आपल्या कामात कुठलीही अडचण येऊ नये. सावित्रीबाई आणि जोतिबा फुले यांना जातीय भेदभाव आणि सामाजिक अत्याचारांमुळे पुण्यातील घर सोडावे लागले, तेव्हा फातिमा शेख आणि त्यांच्या भाऊ उस्मान शेख यांनी आपल्या घरात आसरा दिला. फातिमा शेख यांच्याच घरातून 1848 मध्ये सावित्रीबाईंनी मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली.

### ब्राह्मण विधवांच्या सक्षमीकरणाचा लढा

सावित्रीबाईंनी “फसविल्या” गेलेल्या ब्राह्मण विधवांच्या मदतीसाठी 1863 साली स्वतःच्या घरी “बालहत्या प्रतिबंधक गृह” सुरू केले. त्या काळात विधवांना समाजाने पिळवटून टाकले होते. ब्राह्मण विधवांवर एकेकाळी सामाजिक रुढींचा भाग म्हणून त्यांचे केस कापण्याची सक्ती केली जात असे. या अन्यायी प्रथेविरुद्ध आवाज उठवण्यासाठी नाभिकांना फुले दांपत्याने जागृत केले आणि त्यांनी केशवपनाच्या प्रथेमध्ये सहभागी होण्यास नकार देत संप केला. 23 मार्च 1890 या संपाच्या दरम्यान 500 न्हावी उपस्थित होते.

### जाती निर्मूलनासाठी महत्त्वपूर्ण पावले

सावित्रीबाई फुले यांनी जातीपातीने विभागलेल्या आणि सामाजिक विषमतेने भरलेल्या समाजाला एकत्र आणण्यासाठी अनेक उल्लेखनीय कार्ये केली. त्याकाळी अस्पृश्यांना पाणी, शिक्षण आणि मंदिर प्रवेशासह मूलभूत हक्कही नाकारले जात होते. सावित्रीबाई आणि जोतिबा फुले यांनी आपल्या घरातील पाण्याचा हौद अस्पृश्यांसाठी खुला करून जातीव्यवस्थेच्या रुढींना मोठा धक्का दिला. ही कृती सामाजिक बंधनांच्या विरोधातील क्रांतिकारक पाऊल होते. हौद खुला करणे म्हणजे अस्पृश्यतेचा स्पष्ट निषेध करणे आणि सर्वांना समान हक्क मिळावेत यासाठीचा प्रतीकात्मक संदेश होता. सावित्रीबाई आणि जोतीराव यांनी फक्त महिलांसाठीच नव्हे, तर दलित मुला-मुलींसाठीही शाळा सुरू केल्या, जिथे मुलांना जातिभेदाच्या भिंतींपलीकडे शिक्षणाचा प्रकाश मिळाला. त्या काळात अशा मुलांना शिक्षण देणे म्हणजे समाजातील ‘उच्च’वर्णीयांचा रोष ओढवून घेणे होते.



### शिक्षण आणि समाज सुधारणा: एक व्यापक दृष्टीकोन

1818 मध्ये पेशवाई संपुष्टात आली आणि महाराष्ट्रात ब्रिटिश राजवटीचा अंमल सुरू झाला. ब्रिटिश राजवटीत शिक्षणाची मक्तेदारी ‘उच्च’वर्णीय ब्राह्मणांकडे होती. इतर जातींना व महिलांना शिक्षण मिळणे हे धोकादायक मानले जात होते. जोतिबा सोबत सावित्रीबाई आणि फातिमा शेख यांनी या व्यवस्थेला आव्हान दिले. इंग्रजांनी भारतामध्ये ज्या औपचारिक शिक्षणाची सुरुवात केली त्याचा उद्देश “शरीराने भारतीय पण मनानं इंग्रज” क्लर्क जन्माला घालणं होता. फुले दांपत्याने शिक्षण हे केवळ साक्षरतेच्या औपचारिकतेकरिता चालवले नाही तर त्यामध्ये तार्किकता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन असण्याला महत्व दिले.

ज्या काळात सावित्रीबाई फुले, जोतिबा फुले आणि फातिमा शेख यांनी हे क्रांतिकारी कार्य

पान 21 वर

# गोष्ट निवडणुकीच्या धंद्याची...

पान 19 वरून

गोष्टींचेही नियोजन करण्यासाठी नवनव्या बाजारू तंत्रांचा वापर केला जात आहे. याच "प्रोफेशनल" प्रचारयंत्रणेने निर्माण केलेल्या प्रचाराची उदाहरणे बघूयात. महाराष्ट्र आणि झारखंड या दोन्ही ठिकाणी एकाच वेळी विधानसभेच्या निवडणूक झाल्या. परंतु, या दोन्ही ठिकाणी भाजपने प्रचारतंत्र वेगवेगळे वापरले. महाराष्ट्रात धर्मवादाच्या प्रचारावर कमी जोर देत लाडकी बहीण, रोजगार, कर्जमाफी अशा मुद्द्यांना जवळ केले गेले, तर झारखंडमध्ये मुस्लिमांना बांग्लादेशी घुसखोर ठरविण्याच्या प्रचाराला निवडणुकीचा मुख्य अजेंडा बनवले गेले. कॉंग्रेसने लाल संविधान प्रचारात वापरून संविधानाचे रक्षक म्हणून जनतेत छबी निर्माण करण्याचा प्रयत्न केला. राष्ट्रवादी अजित पवार गटाने महिलांची मतं वळवण्यासाठी रॅल्या, सभांमध्ये गुलाबी रंगाची थीम वापरली. “एक है तो सेफ है”, “बटेंगे तो कटेंगे”चे नारे बनवण्यात आले. अजित पवारांनी घातलेल्या गुलाबी जॅकेटपासून ते फडणवीसांनी आपल्या नावामध्ये घातलेले स्वतःच्या आईचे नाव अशा सर्व कवायती **प्रत्येक निवडणुकीमध्ये एक कथानक उभे करण्यासाठी ठरवून केल्या जात आहेत आणि त्यासाठी भरमसाठ पैसा ओतला जात आहे.**

आता सगळ्याच प्रचारतंत्राचा बाजार झाल्यावरही या पक्षांची एकमेकांसोबत स्पर्धा संपत नाही. **याच्या पुढचे पाऊल आहे — सरकारी योजनांचेच निवडणुकीकरिता बाजारीकरण.** उदाहरण द्यायचे झाले तर लाडकी बहीण योजना. निवडणुकीच्या तोंडावर लोकसभेच्या अपयशानंतर सुरू केलेली योजना महाराष्ट्रात निकाल उलटविण्याचे मोठे कारण बनले. अनेक भाषणांमध्ये महायुतीच्या नेत्यांनी लाडकी बहीण योजना चालू ठेवण्यासाठी मत द्या असा प्रचार केला. अनेक ठिकाणी योजनेची रक्कम वाढविण्याचे आमिष दिले तर काही ठिकाणी मत नाही दिले तर योजनेतून नाव काढून टाकण्याची धमकी दिली गेली! कल्याणकारी योजनांकडे बघण्याचा दृष्टिकोण अत्यंत व्यावहारिक बनवला गेला. गेल्या 5 वर्षांच्या महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार, महिला अत्याचार, कामगारांचे शोषण या सर्वांवर पडदा टाकण्यासाठी 1500 रुपयांचे आमिष दाखवले गेले.

**या भांडवली संपत्तीधार्जिण्या लोकशाहीच्या बाजारापासून निवडणूक आयोग आणि कायदा तरी कसा अस्पर्शित राहू शकेल.** देशातील निवडणुक यंत्रणेचे नियमच बाजार धार्जिणे बनवले गेले आहेत. उमेदवाराच्या प्रचाराच्या प्रत्येक साहित्याचा खर्च निवडणूक आयोगाला दाखवावा लागतो. स्वयंसेवी पद्धतीने जनता पक्षाला किंवा उमेदवाराला साहाय्य करू शकते, अशी कल्पनाच आयोगाकडे अस्तित्वात नाही, जेव्हा की जनतेच्या विविध प्रकारच्या सहयोगावरच अनेक डाव्या उमेदवारांनी इतिहासात निवडणुका लढवल्या आहेत. प्रचारात आलेल्या कार्यकर्त्यांच्या चहाचा खर्च, पेट्रोलचा खर्च, झेंड्यांपासून ते पत्रकापर्यंत प्रत्येक वस्तूचा खर्च दाखवावा लागतो. कारण आयोग हेच मानतो की या सर्वाचा "खर्च" तर होतच असेल! विधानसभा निवडणुकीत प्रचार करण्यासाठी प्रति उमेदवार 40 लाख आणि लोकसभेसाठी 95 लाख अशी मर्यादा निवडणूक आयोगाने घालून दिलेली आहे. कोणताही व्यावहारिक विचार करणारा व्यक्ती सांगू शकेल की एका मोठ्या सभेसाठी कोट्यावधी रुपये खर्च केले जातात, त्यामुळेच या मर्यादांना काहीही अर्थ राहिलेला नाही. पण या मर्यादा दाखवतात की बाजाराच्या जोरावरच निवडणूका लढवल्या जातात हे आता विधीमान्य आहे. एवढेच नाही तर आयोगाने स्वतःच बाजार उघडला आहे. निवडणूक आयोगाने उपलब्ध केलेल्या मतदारांच्या याद्या वापरून लाखो रुपये खर्च करून वेगवेगळ्या धंदेबाज कंपन्यांकडून प्रत्येक मतदार संघासाठी उमेदवाराचे ॲप बनवले जाते, ज्यात मतदार शोधणे, स्लिप काढून देणे अतिशय सोपे झाले आहे. उमेदवाराला या याद्या प्रिंट करून पाहिजे असतील तर त्याचा खर्च मोजावा लागतो.

**या बाजाराची दुसरी बाजू आहे ती "ग्राहकांची".** निवडणुकीच्या बाजारात विकणाऱ्यांनाही लोकशाही प्रक्रियेशी काही देणेघेणे नसते. सरकार कोणाचेही आले तरी पुढच्या पाच वर्षात आपली परिस्थिती गुणात्मकरित्या किंवा संख्यात्मकरित्या काहीही बदलणार नाही, हे जनतेच्या उन्नत चेतनेच्या तबक्याला अनुभवातून समजले आहे. परंतु, भांडवली निवडणुकांकडे ऐतिहासिक दृष्टिकोणातून बघण्याच्या अभावामुळे जनतेच्या एका हिश्श्यात आजही संसदीय लोकशाहीबद्दल अंधविश्वास आहे, आणि एका हिश्श्यात निवडणुकीकडे 'संधी' म्हणून बघण्याची मानसिकता. गरिबी, महागाईच्या रेट्याखाली आणि क्रांतिकारी राजकीय चेतनेच्या अभावात, देहापासून ते स्वाभिमानापर्यंत सर्वच गोष्टी विकण्यास कष्टकरी जनतेच्या एका हिश्श्याला मजबूर बनवले आहे. सभा, रॅल्यांना गर्दी म्हणून, पत्रकं आणि स्लिप वाटण्यासाठी म्हणून अनेक जण निवडणुकीच्या काळात काम शोधत असतात. पक्षाची विचारधारा कितीही जनविरोधी असली तरीही निवडणुकीतून पैसा कमावण्यासाठी अनेकजण पुढे सरसावताना दिसतात. एवढेच नाही तर शेवटी आपले मत, ज्याच्यामुळे ही व्यवस्था लोकशाही असल्याचा आव आणला जातो, ते विकण्यासाठीसुद्धा जनता आज तयार आहे. मताकडेसुद्धा माल म्हणून बघण्यापर्यंत या व्यवस्थेत वस्तूकरणाची प्रक्रिया पोहोचली आहे.

**जनतेच्या संघटित शक्तीची जाणीव नसल्यामुळे आणि एका योग्य क्रांतिकारी नेतृत्वकारी शक्तीच्या अभावामुळे बाजाराच्या विचारांच्या बेड्यांनी कामगार-कष्टकरी वर्गाला राजकारणातही जखडून ठेवले आहे.** कष्टकरी जनतेला आज हे जाणावे लागेल की आपण फक्त गर्दी नाही आहोत. भांडवली लोकशाहीने दिलेल्या मर्यादित अधिकारांपैकी एक असा मतदानाचा अधिकार आपण काही हजार रुपयांसाठी विकणे म्हणजे आपला स्वतंत्रपणे विचार करू शकणारी व्यक्ती असण्याचा स्वाभिमान विकण्यासारखेच आहे. जी भांडवली व्यवस्था आपले रोज शोषण करते, आपल्याला अत्यल्प मजुरीत राबवते आणि आपला सन्मानाने जगण्याचा हक्क नाकारते, त्या व्यवस्थेचे यश यात आहे की ती देवाणघेवाणीच्या, बाजाराच्या मानसिकतेला आपल्यात रुजवते आणि त्याशिवाय जगण्याची कल्पनासुद्धा अवघड बनवते. राजकारणाचे बाजारीकरण भांडवलशाही करतच आली आहे, परंतु आपण कामगार वर्गाने या विरोधात उभे ठाकले पाहिजे आणि **बाजाराच्या मार्गाने नाही तर कामगार वर्गीय विचारधारा, मेहनत, सामूहिक शक्ती आणि प्रयत्न, संघर्ष, एकता यावर आधारित राजकारण उभे केले पाहिजे.**

# चिखली-कुदळवाडीत अतिक्रमण हटाव मोहीमेच्या नावाखाली बांधकाम व्यावसायिकांच्या घशात जमिनी घालण्याची मोहीम!

✎ प्रवीण एकडे

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने 8 फेब्रुवारी ते 14 फेब्रुवारी दरम्यान चालवलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेअंतर्गत महानगरपालिका हद्दीतील चिखली-कुदळवाडी परिसरात 827 एकरांमधील तब्बल 4111 तथाकथित बेकायदेशीर बांधकामे जमीनदोस्त केली गेली. मागील काही वर्षांत महाराष्ट्र सरकारने केलेली ही सर्वात मोठी कारवाई होती. “नियोजित विकासकामे आणि नागरिकांच्या सुविधांसाठी” आरक्षित असलेल्या जागांवरील अनधिकृत बांधकामे हटवण्यासाठी ही मोहिम हातात घेण्यात आली होती असे स्पष्टीकरण महानगरपालिकेने दिले आहे. परंतु ही “नियोजित विकासकामे” नक्की आहेत तरी काय याचे स्पष्टीकरण द्यायला प्रशासन सोयीस्करपणे विसरले आहे.


ही मोहीम किती मोठी होती याचा अंदाज यात वापरण्यात आलेल्या यंत्र सामग्री आणि मनुष्यबळ यांच्या माध्यमातून लक्षात येते. या मोहिमेत महापालिका अतिक्रमण धडक कारवाई पथकामधील 4 कार्यकारी अभियंते, 16 उपअभियंते, महाराष्ट्र सुरक्षा दलाचे 180 जवान, 600 पोलीस आणि मजूर कर्मचारी सहभागी होते; सोबतच 47 पोकलेन उत्खनक यंत्रे, 8 जेसीबी (JCB) वाहने, 1 क्रेन (crane) आणि 4 कटर (cutter) यांचा वापर करण्यात आला.

कामगार-कष्टकरी जनता राहत असलेल्या आणि काम करत असलेल्या चिखली-कुदळवाडी या भागात मोठ्या प्रमाणात भंगाराची छोटी-मोठी दुकाने, लहान उद्योगधंदे आणि वर्कशॉप्स आहेत. अंदाजे 1 लाख ते 2.5 लाख कामगार चिखली-कुदाळवाडीतील या भागात काम करतात आणि त्यांचा उदरनिर्वाह चालवतात. या मोहिमेमुळे या सर्व कामगारांचे आयुष्य उध्वस्त झाले आहे. सरकारने या कामगारांना ना पर्यायी रोजगार उपलब्ध करुन दिला आहे, ना नवीन काम मिळेपर्यंत उदरनिर्वाहासाठी भत्ता. फडणवीस-शिंदे-पवार सरकार इतके असंवेदनशील आहे की या कामगारांनी त्यांना पर्यायी काम मिळेपर्यंत घरे आणि इतर इमारती पाडू नये अशी विनंतीही प्रशासनाला केली परंतु ती विनंतीही प्रशासनाने फेटाळून लावली. स्पष्ट आहे की सरकारला कामगार-कष्टकऱ्यांच्या जीवनाबद्दल काहीएक देणेघेणे नाहीये. सरकारने या परिसरात काम करणाऱ्या असंख्य कामगारांची आणि त्यांच्यावर अवलंबून असलेल्या त्यांच्या कुटुंबाची विचारणा सुद्धा केली नाही.

## रोहिंग्या मुस्लिमांचा बहाणा, कामगार कष्टकरी आहेत निशाणा

चिखली-कुदळवाडी भागात मोठ्या प्रमाणात उत्तर प्रदेश, बिहार मधून येणारे प्रवासी कामगार भंगाराची स्क्रॅप गोदामे, लहान उद्योगधंदे आणि वर्कशॉप्समध्ये काम करतात. विशेषकरून या प्रवासी कामगारांना लक्ष्य करण्यात आले. महाराष्ट्रातील तसेच उत्तर प्रदेश, बिहार मधून आलेल्या मुस्लिम कामगारांना म्यानमार मधील पीडित रोहिंग्या मुस्लिमांच्या नावाने उद्देशून त्यांच्या विरोधात धार्मिक भावना भडकवण्याचे काम सरकारने केले आणि या पाडकामाला “नैतिक” पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न केला.

आज देशात बेरोजगारीने सर्व उच्चांक तोडले आहेत. रोजगार देण्यात हे फॅशिस्ट



सरकार सपशेल अपयशी ठरले आहे. हे अपयश आणि असमान विकास नेहमीच राहिला आहे. त्यामुळेच महाराष्ट्रात, उत्तर प्रदेश आणि बिहार अशा इतर राज्यांतून असंख्य कामगार कामाच्या शोधात येतात आणि शहरातील गलिच्छ असुरक्षित वस्त्यांमध्ये राहण्यास मजबूर असतात. कामाच्या शोधात आपले घरदार सोडून एवढ्या दूर येऊनही काम मिळेल याची काही शाश्वती नसते. पण आपला नाकर्तेपणा लपवण्यासाठी फॅशिस्ट सरकार सतत नकली मुद्दे उभे करत, म्यानमारमधील पीडित रोहिंग्या मुस्लिमांचे नाव घेत महाराष्ट्रातील तसेच उत्तर प्रदेश, बिहार इत्यादी राज्यांतून येणाऱ्या कधी परप्रांतीयांच्या विरोधात तर कधी मुस्लिम प्रवासी कामगारांच्या विरोधात जनतेला उभे करत आहे. थोडक्यात कामगार वर्गात फूट पाडण्याचे काम सतत केले जाते.

नजीकच्या काळात झोपडपट्टी पुनर्वसन आणि निर्मूलन, शहर सौंदर्यीकरण, पर्यावरण संरक्षण तसेच रस्ते, मेट्रो प्रकल्प, विमानतळ आणि सरकारी इमारतींसाठी कामगार-कष्टकऱ्यांची घरे पाडण्याचे प्रमाण वाढले आहे. मग ते दिल्लीतील खोरी गाव असू द्या, मुंबईतील शिवाजीनगर येथील डब्बा कंपनीच्या वस्त्या, कोलकत्यातील वस्त्या किंवा पुण्यातील कामगार पुतळा वसाहत असू द्या. या सर्व प्रकरणात नागरिकांना राहण्यासाठी पर्यायी चांगली घरे न देता त्यांची घरे जमीनदोस्त करण्यात आली. काही ठिकाणी पर्यायी घरे दिली तरी ती कामाच्या दृष्टीने गैरसोयीचीच असतात. याचे उदाहरण पुण्यातील कामगार पुतळा वसाहतीतील लोकांना दिली गेलेली पर्यायी घरे आहेत. कामगार पुतळा वसाहतीतील बहुसंख्य जनतेला पुणे शहराच्या मध्यवर्ती भागापासून खूप दूरची घरे देण्यात आली. जेव्हा की कामगार पुतळा वसाहत शहराच्या मध्यवर्ती भागात आहे आणि तेथील बहुसंख्य जनता याच वस्तीच्या नजीकच्या परिसरात काम करते. वस्तीपासून दूर घरे मिळाल्यामुळे अनेकांना मुश्किलीने मिळालेले काम सोडून द्यावे लागले. मोदी सरकारच्या काळात देशाने बेरोजगारीचे सर्व उच्चांक गाठले असताना कामगार वसाहतीतील अनेकांना सरकारने कामाच्या ठिकाणापासून फार दूर घरे दिल्यामुळे कामगारांना काम सोडावे लागले आणि पुन्हा काम शोधण्याचा मनःस्ताप सहन करावा लागला. काम न मिळाल्यामुळे अनेकांवर उपासमारीची सुध्दा वेळ आली.

## अतिक्रमण विरोधी मोहिमेचा फायदा मोठ्या बांधकाम व्यावसायिकांनाच

या अतिक्रमण विरोधी मोहिमेमुळे चिखली-कुदळवाडी परिसरात मोठ्या प्रमाणात जमीनी रिकाम्या केल्या गेल्या आहेत. औद्योगिक पट्ट्यात असलेल्या या भागात जमिनींना कोट्यवधी रुपयांचा भाव आला आहे. त्यामुळेच या जमिनींवर मोठमोठ्या इमारती बांधण्यासाठी बांधकाम व्यावसायिकांची नजर आहे. नुकत्याच जमीनदोस्त करण्यात आलेल्या या भागाच्या अवतीभोवती सरकारी इमारती असल्यामुळे या भागातील जमिनीच्या किंमती कोटींच्या घरात आहेत आणि म्हणूनच बांधकाम व्यावसायिकांची या जमिनीवर आधीपासूनच नजर आहे. सरकारने तेथील ‘बेकायदेशीर’ घरे आणि इतर व्यावसायिक इमारती पाडण्याची मोहीम हाती घेतल्यानंतर तेथील जमिनींच्या किंमतीत अजून वाढ झाल्याच्या बातम्या अनेक वर्तमानपत्रांत आल्या आहेत. लाखो कामगारांना असुरक्षितता, बेरोजगारी आणि उपासमारीच्या जाळ्यात अडकवून तेथील जमिनी मोठ्या बांधकाम व्यावसायिकांच्या घशात घालण्याचे काम हे फॅसिस्ट सरकार करत आहे.

कामगार-कष्टकऱ्यांची घरे तसेच ते काम करत असलेली लहान उद्योगांची आणि वर्कशॉप्सची ठिकाणे पाडून मोठ्या भांडवलदारांना त्या जमीनी कवडीमोलाच्या भावात देण्याच्या विरोधात जेव्हाही उच्च न्यायालयाचे किंवा सर्वोच्च न्यायालयाचे दार थोटावले जाते तेव्हा सुद्धा न्यायालये सहसा कामगार-कष्टकरी वर्गाविरोधात भांडवलदार वर्गाच्या बाजूनेच निर्णय देतात. मग ते दिल्लीतील खोरी गाव येथे झालेल्या घटनेत असूद्या किंवा पिंपरी चिंचवड मधील या घटनेत असुद्या, न्यायालयाने भांडवलदार वर्गाच्या बाजूनेच निकाल दिले आहेत. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने नोटीस दिल्यानंतर चिखली-कुदळवाडी येथील नागरिकांनी त्या विरोधात उच्च न्यायालयात दाद मागितली. परंतु उच्च न्यायालयाने ती याचिका फेटाळून लावली. त्याविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागितल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने सुद्धा चिखली-कुदळवाडीतील नागरिकांच्या विरोधातच निर्णय दिला. ह्या आणि इतर अनेक निकालांवरून न्यायालयांचे भांडवली चरित्र स्पष्ट दिसते.

पर्यायी पक्का रोजगार तसेच पर्यायी पक्के घर उपलब्ध करून दिल्याशिवाय कामगार-कष्टकरी राहत असलेली किंवा काम करत असलेली ठिकाणे सरकारने पाडू नयेत, यासाठी कामगार-कष्टकऱ्यांनी आणि न्यायप्रिय नागरिकांनी संघटित होऊन त्याचा विरोध करणे गरजेचे आहे. हे होऊ नये याकरिताच सतत आपल्यात जात-धर्माची दरी निर्माण केली जाते. भांडवलदारांच्या सेवेत गुंतलेल्या फॅशिस्ट सरकारकडून हिंदू-धर्मीय कामगारांना मुस्लिम-धर्मीय कामगारांच्या विरोधात उभे करण्याच्या प्रयत्नांना हाणून पाडण्यासाठी, सर्व जातीधर्मातील कामगारांना आपल्या खऱ्या मागण्यांभोवती आणि धर्माच्या राजकारणाविरोधात संघटित व्हावेच लागेल.

# स्मृतिदिन (10 मार्च) विशेष : सावित्रीबाई फुले यांचा क्रांतिकारी वारसा

पान 20 वरून

सुरु केलं, तेव्हा सर्वच कष्टकरी शिक्षणापासून वंचित होते आणि दलित तर त्याहूनही जास्त वंचित. आजही स्थिती फारशी वेगळी नाही. 1991 पासून खाजगीकरण उदारीकरणाची धोरणे राबवल्यानंतर इतर सगळ्या क्षेत्रांसारखंच शिक्षणाचे सुद्धा पूर्णतः बाजारीकरण झालेलं आहे. आज खासगीकरणामुळे उच्च शिक्षणाचे दरवाजे फक्त ज्यांच्या खिशात पैसा आहे त्यांच्यासाठीच खुले आहेत. कुठलाही कोर्स किंवा डिग्री घेण्यासाठी हजारो लाखो रुपयांची फी मोजावी लागते. काही इंजिनियरिंग व मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेशासाठी करोडो रुपयांचे डोनेशन मोजावे लागते आणि गेल्या दहा वर्षांमध्ये या गोष्टीत अधिकच भर पडली आहे. अनेक सरकारी शाळांना कुलूप लावले गेले आहे. याचा अर्थ स्पष्ट आहे: फॅसिस्ट मोदी सरकार आणि भांडवली व्यवस्था स्पष्टपणे हेच म्हणत आहेत की कामगार-कष्टकऱ्यांच्या, गरिबांच्या मुलामुलींनी शिकूच नये. या अघोषित शिक्षण बंदीचा विरोध आपण सर्वांनीच ठामपणे केला पाहिजे. आजच्या काळात शिक्षण व्यवस्थेवर वाढत्या फॅसिस्ट हल्ल्यांचा सामना करताना सावित्रीबाई, जोतिबा फुले, फातिमा शेख आणि इतर क्रांतिकारकांच्या विचारांचा वारसा जपणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

आज सावित्रीबाई फुले, फातिमा शेख, जोतिबा फुले यांच्या क्रांतिकारी वारशाची आठवण काढत आपल्याला हा विचार करावा लागेल की त्यांनी सुरू केलेल्या संघर्षाचं आज काय झालंय? या नवीन अघोषित शिक्षण बंदीचा विरोध करत कामगार-कष्टकऱ्यांना, मेहनत करणाऱ्यांना, “सर्वांना समान मोफत दर्जेदार शिक्षण” आणि “सर्वांना पक्का रोजगार” या मागणीला घेऊन एकजूट व्हावं लागेल. खऱ्या अर्थानं स्त्रीमुक्तीच्या दिशेने पाऊल उचलावे लागेल, स्त्रियांना चूल आणि मूल या चौकटीत अडकवणाऱ्या या पितृसत्तेच्या विरोधात आणि सोबतच तिला टिकवणाऱ्या भांडवली व्यवस्थेविरोधात सक्रिय आंदोलन उभं करावं लागेल. जातीवादाविरोधात आणि जातीअंतासाठी पाऊल उचलावे लागेल अगदी शेण गोळे, दगड धोंडेच सहन करावे लागले, तरीही. जोतिबा फुले यांच्या मृत्यूनंतर सुद्धा सावित्रीबाई फुले सतत जनकार्यामध्ये सक्रीय होत्या. 1897 मध्ये प्लेगग्रस्तांना मदत करताना सावित्रीबाईंचे निधन झाले. त्यांनी आपल्या जीवनाची 50 वर्षे जनतेच्या सेवेत समर्पित केली. सावित्रीबाईंच्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने सावित्रा-जोतिबांना साथ देणाऱ्या फातिमा शेख यांचेही योगदान विसरता येणार नाही. त्यांच्या कार्याचा प्रसार करणे आणि तो पुढे नेणे, त्यांच्या स्वप्नांना साकार करणे, हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

# महाराष्ट्र विशेष 'जन सुरक्षा' विधेयक; नव्हे, जन दडपशाही विधेयक!

पान 1 वरून

"संघटना" शब्दाचा अर्थ सांगताना "व्यक्तींचे कोणतेही संयोजन, निकाय, किंवा गट, मग तो कोणत्याही विशिष्ट नावाने ओळखला जात असो किंवा नसो, आणि मग तो कोणत्याही संबद्ध कायद्याखाली नोंदणी केलेला असो किंवा नसो आणि कोणत्याही लिखित घटनेद्वारे त्याचे नियमन केले जात असो किंवा नसो" असा केला आहे. थोडक्यात या व्याख्येनुसार कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तीसमूहाला हा कायदा बेकायदेशीर घोषित करू शकतो, मग ती एखादी क्रांतिकारी विद्यार्थी-युवक संघटना असो, कामगार युनियन असो, जनसंघटना असो, कार्यकर्त्यांचा गट असो, एखादा राजकीय पक्ष असो, किंवा अगदी खेळाचा किंवा मनोरंजनाचा क्लब किंवा ज्येष्ठ नागरिकांचे मंडळही असो. लोकशाही मार्गाने स्वत:च्या संघटनेची घटना बनवून कारभार होत असेल तरीही सरकार त्या संघटनेला बेकायदेशीर ठरवू शकते. इतकेच नव्हे तर सरकार अस्तित्वात नसलेल्या संघटनेलाही नाव देऊन आरोप करू शकते!

"बेकायदेशीर कृत्य" याची व्याख्या करताना तर इतर अनेक तरतुदींसह असे कृत्य जे (1) सरकारी कर्मचाऱ्यांच्या कामात हस्तक्षेप करते, किंवा हस्तक्षेप करण्याकडे कल आहे (कलम 2-च-तीन) (2) रेल्वे, रस्ते, हवाई किवा जलमार्ग यामार्गे होणाऱ्या दळणवळणात व्यत्यय आणणारे (कलम 2-च-पाच) (3) कायद्याची किंवा कायद्याद्वारे स्थापित संस्थांची अवज्ञा करण्यास प्रोत्साहन देणारे किंवा उपदेश देणारे आहे (कलम 2-च-सहा) (4) बेकायदेशीर कृत्ये करण्यासाठी पैसे किंवा वस्तू गोळा करणारे (2-च-सात), (5) सार्वजनिक शांतता, सुव्यवस्था याला धोका, संकट निर्माण करणे (2-च-एक) किंवा सुव्यवस्थेत हस्तक्षेप करणे वा **करण्याकडे कल असणे** (2-च-दोन) अशा तरतुदींचाही समावेश आहे. आता कोणत्या कृत्याने शांतता भंग होऊ शकते हे कोण ठरवणार? तर सरकारच!

देशात मुळात आंदोलन करण्यास परवानगी लागते यातूनच लोकशाही अधिकार किती संकुचित आहेत हे दिसून येते! परंतु आंदोलनांना औपचारिक परवानगी न देणे, आणि महाराष्ट्रात तर अगोदरच आयोजकांना नोटीस देणे आता नित्याचे झाले आहे. याकरिता वापरली जात आहे ती जमावबंदीची सोय. खरेतर जमावबंदी तेव्हाच लागू होऊ शकते जेव्हा कायदा सुव्यवस्था ढासळलेली असेल, आणि तिचे लागू होणे सरकारचे अपयशच मानले गेले पाहिजे, परंतु हे तर सर्वज्ञात आहे की चार पेक्षा जास्त जणांना एकत्र येणे बेकायदेशीर ठरवणारी जमावबंदी राज्यात सतत लागू असते, आणि तिचे उद्दिष्ट फक्त जनतेच्या आंदोलनांना परवानग्या नाकारण्याची संधी सरकारला व पोलिसांना देणे हेच असते. अशामध्ये आता "विना परवानगी' झालेल्या कोणत्याही (म्हणजे संघ-भाजपाची सोडता, जवळपास सर्वच) आंदोलनांना या कायद्याखाली अत्यंत कठोर शिक्षा देण्याचा अधिकार सरकारला मिळतो.

याचा अर्थ असा होतो की आजवर होत आलेली रास्ता रोको आंदोलने, एखाद्या सरकारी कार्यालयाला टाळे ठोकणे, पोलिसांनी 'परवानगी' नाकारली असताना शांततामय आंदोलन करणे, जेल भरो आंदोलन करणे, बस-रेल्वे इत्यादीमध्ये एखाद्या मुद्यावर प्रचार करणे, हे तर सोडाच पोलिस किंवा सरकार विरोधात नारे देणे, एखादे व्याख्यान, सभा, शांततेने केलेले कोणतेही आंदोलन, बेरोजगारी, भ्रष्टाचार, महागाई, धर्मवादाविरोधात किंवा पाणीप्रश्न, पर्यावरण, गरीब शेतकऱ्यांचे प्रश्न, यावर उठलेला कोणताही आवाज, याविरोधात काढलेले एखादे पत्रक, ऑनलाईन मेसेज, लिहिलेला लेख, किंबहुना तुम्ही वाचत असलेला हा लेख, जनांदोलनाला दिलेले समर्थन अशी असंख्य कृत्ये किंवा सरकारच्या मते असे काहीतरी करण्याचा तुमचा 'कल' असणे, अशी सर्वच कृत्ये आता साधे गुन्हे नाहीत तर थेट सर्वाधिक गंभीर गुन्हे बनतात. थोडक्यात सरकारच्या मर्जीत नसलेल्या कोणत्याही व्यक्तीचा सार्वजनिक सुव्यवस्था बिघडवण्याकडे **'कल' आहे असे वाटले तर ती व्यक्ती गुन्हेगार ठरू शकते. याकरिता सरकारला फक्त "वाटणे" पुरेसे असेल!**

कायद्याचा भंग झाला आहे की नाही हे ठरवणे आजवर न्यायालयांचे काम होते. सरकार आरोप करू शकत होते, परंतु न्यायालयांद्वारे निर्णय येईपर्यंत गुन्हा सिद्ध मानले जात नव्हते. परंतु या कायद्याने एखादी संघटना बेकायदेशीर आहे की नाही ते ठरवण्याचा प्रभावी अधिकार सरकारलाच दिला आहे. कलम-3 नुसार सरकार राजपत्रात अधिसूचना काढून कोणत्याही संघटनेस बेकायदेशीर ठरवू शकते, आणि कलम-3(2) नुसार त्याची कारणे देणेही सरकारला बंधनकारक नाही. दिखाव्याकरिता एक सल्लागार (!) मंडळ सरकार बनवणार आहे (कलम-6), ज्याकडे बेकायदेशीर घोषित संघटनेला दाद मागता येईल. परंतु कोणत्याही घोषणेचा संदर्भ या मंडळाकडे किमान 6 आठवडे देणे सरकारवर बंधनकारक नाही (कलम-6(1)), सल्लागार मंडळाला तीन महिन्यात सुनावणी व निर्णयाची जबाबदारी असेल, म्हणजे किमान 4 ते 5 महिने एखादी संघटना निश्चितपणे बेकायदेशीर ठरवली जाईल. यापुढे जाऊन, सदर सल्लागार मंडळ हे पूर्णपणे सरकारनेच नेमलेले असल्यामुळे त्याकडून कोणता निर्णय येईल हे कोणीही समजू शकतो. अशी संघटना जर तिच्या सदस्यांनी भंग केली (कलम-16), तरीही सरकारला तिच्यावर कारवाईचा अधिकार हा कायदा देतो.

विधेयकात प्रस्तावित शिक्षेच्या तरतुदी निश्चितपणे दाखवतात या कायद्यामागे सरकारचे उद्दिष्ट लोकशाही अधिकारांची गळचेपी कसे आहे. कलम-8 नुसार, (1) अशा संघटनेच्या बैठकांमध्ये किंवा कृत्यात सहभागी झाल्यास तीन वर्षे कारावासाची शिक्षा आणि तीन लाखांपर्यंतचा दंड होऊ शकतो. (2) संघटनेला **गैरसदस्यांनी मदत केली तरी** दोन वर्षे शिक्षा आणि दोन लाख रुपये दंड होऊ शकतो. (3) बेकायदेशीर संघटनेसाठी बेकायदेशीर कृत्य केल्यास सात वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि पाच लाख रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो. कलम-9, 10, 11 मधील अत्यंत विस्तृत तरतुदींनुसार तर **संघटनेच्या कामांकरिता वापरलेली जागा, संघटनेची सर्व मालमत्ता, निधी, गुंतवणूक सरकार जप्त करू शकतो.** म्हणजे, अशा संघटनेशी किंवा व्यक्तींशी थोडा जरी संबंध आलेला असेल तर संपर्कातील किंवा मदतकर्त्या व्यक्तींना सुद्धा सरळ तुरूंगात टाकायचा अधिकारही या सरकारने स्वत:कडे घेतला आहे. याचा सरळ अर्थ आहे की आरोपी व्यक्तिच्या संपूर्ण कुटुंबालाच नव्हे तर मित्र, परिचितांनाही उध्वस्त करण्याची परवानगी सरकारला देण्यात येत आहे. **'गुन्हा' या शब्दाची व्याख्याच जर अशी केली असेल, तर सरकारला गैरसोयीच्या व्यक्तींचे अस्तित्व हाच गुन्हा आहे असे या सरकारचे म्हणणे आहे.**

या विरोधात जर कोणी व्यक्ती वा संघटना न्यायालयात जाऊ पहात असेल तर सदर विधेयक कलम-14 अन्वये सर्व निम्नस्तरीय न्यायालयांना हस्तक्षेप करण्यास मनाई करते. उच्च वा सर्वोच्च न्यायालयापर्यंत तर देशातील कामगार-कष्टकऱ्यांची कधीच पोहोच नव्हती, निम्नस्तरीय न्यायालयांपर्यंत जाणे आणि त्याचा खर्च उचलणे सुद्धा बहुसंख्यांकरिता अत्यंत कठीण काम होते. **तेव्हा हा कायदा आता कोर्टांपर्यंत असलेली कामगार-कष्टकऱ्यांची जुजबी पोहोच सुद्धा संपवण्याचे काम करत आहे.** पुढे जाऊन कलम-15 अन्वये सर्व गुन्हे दखलपात्र आणि अजामीनपात्र असल्यामुळे पोलीस अधिकारी कोणालाही विनावॉरंट अटक करू शकतात. परंतु कलम-17 "चुकीची" कारवाई करणाऱ्या कोणत्याही सरकारी अधिकाऱ्यांविरोधात दाद मागण्याचा अधिकारही काढून घेते आणि मंत्री, पोलिस, अधिकाऱ्यांना त्यांच्या कारवायांकरिता पूर्ण संरक्षण देते. **थोडक्यात सरकारला विरोध करणाऱ्या व्यक्ती किंवा संघटनांचे नागरी अस्तित्व संपवण्याचा अधिकार हा कायदा सरकारला देऊ करत आहे.**

अशाप्रकारचा कायदा छत्तीसगड, आंध्र प्रदेश आणि ओडिशा या राज्यांत अगोदरच पारित झालेला आहे. छत्तीसगड मधील कायद्याला सर्वोच्च न्यायालयासमोर आव्हान दिले गेले आहे. येथेही या कायद्याचा वापर करून बहुराष्ट्रीय कंपन्यांद्वारे चालणाऱ्या लुटीला विरोध करणाऱ्या, पोलिस आणि निमलष्करी दलाद्वारे केल्या जाणाऱ्या अत्याचारांवर आवाज उठवणाऱ्या लोकशाही मार्गाने काम करणाऱ्या संघटनांवर बंदी आल्याचे दिसून येते. आजची सरकारच्या विरोधातील खटल्यांमध्ये न्यायालयांची स्थिती पाहता, अशा कायद्यांना दिलेल्या आव्हानावर कोर्ट लगेच सुनावणी करून निर्णय देतील ही आशा धूसरच आहे.

देशात अगोदरच यु.ए.पी.ए. (1967, नंतर 2019), राष्ट्रीय़ सुरक्षा कायदा (एन.एस.ए.) सारखे कायदे तर आहेतच, जुन्याच कायद्यांना नवे आवरण देत बनवलेल्या भारतीय न्याय संहिता (बी.एन.एस.), भारतीय नागरीक सुरक्षा संहिता (बी.एन.एस.एस.) मध्ये सुद्धा जनतेच्या आंदोलनांना दाबण्याकरिता पुरेश्या तरतुदी आहेत. महाराष्ट्रात मकोका (1999) कायदा सुद्धा लागू आहे. यु.ए.पी.ए. कायद्याचे उद्दिष्ट सुद्धा नक्षलवादी कारवायांना आळा घालणे हेच सांगितले जाते. या कायद्याचा वापर करून संशयावरून अटक, विनाखटला तुरुंगवास, अनेक वर्षे जामीन मिळू न देणे, संघटनेवर बंदी अशा सर्व कारवाया करण्याचा सरकारला अधिकार आहे. या कायद्याचाच पुरेपूर वापर (गैरवापर नव्हे) करून आजवर अनेक मानवाधिकार कार्यकर्ते, कामगार कार्यकर्ते, पत्रकार, नागरी-लोकशाही अधिकाराकरिता झगडणारे कार्यकर्ते, विद्यार्थी, युवक, पत्रकार, वकील, शिक्षक यांना तुरूंगात टाकण्याचे, वर्षानुवर्षे त्यांना बिना जामीन, अनेकदा तर बिना खटला तुरुंगातच अडकावण्याचे काम अनेक सरकारांनी केले आहे. असंख्य अभ्यास आहेत जे दाखवतात की अशा सर्व कायद्यांचा वापर खोटे आरोप करून जनतेच्या आंदोलनांचे, जनपक्षधर कार्यकर्त्यांचे दमन करण्यासाठीच केला गेला आहे. **दमन करण्याकरिता हे कायदे सुद्धा "अपुरे" वाटू लागल्यामुळे आता देशातील अनेक राज्यांमध्ये 'जन सुरक्षा' सारखे कायदे करण्याचे काम भाजप सरकारे करत आहेत.**

मुख्यमंत्री फडणवीसांच्या मते माओवाद्यांचे 'शहरी अड्डे' आणि 'सुरक्षित आश्रयस्थळे' उध्वस्त करणे गरजेचे आहे, आणि हे सांगताना ते 'माओवाद्यांचा' सशस्त्र लढा आणि सरकार उलथवणे सारख्या उद्दिष्टांचा उल्लेख करतात, परंतु कायद्यात मात्र बेकायदेशीर म्हणवण्याकरिता या तरतुदींचा उल्लेखच नाही! थोडक्यात 'माओवाद' हा बहाणा आहे, आणि जनताच खरी निशाणा आहे. एकीकडे भाजप सरकारे आणि खुद्द गृहमंत्री अमित शहा दावा करतात की "नक्षलवादा"चा धोका आता संपत आलेला आहे, आणि 2026 पर्यंत तो पूर्णपणे संपवला जाईल. असे असेल तर या नव्या कायद्याची गरज कुठून निर्माण झाली आहे? वास्तवात, चुकीची सैद्धांतिक समजदारी आणि कार्यदिशा यामुळे सीपीआय(माओवादी) सारख्या संघटना स्वत:च संकटग्रस्त झाल्या आहेत, परंतु सरकारचे उद्दिष्ट सरकारविरोधी सशस्त्र कारवायांना आळा घालणे नसून भांडवलदारांच्या हितांचे नागडेपणाने रक्षण करणे, आणि जनतेच्या लोकशाही अधिकारांचे दमन करणे आहे, हे उघडपणे दिसून येते.

**8 एप्रिल 1929 रोजी भगतसिंह आणि त्याच्या त्यांच्या साथीदारांनी मिळून ब्रिटीश संसदेत बॉंब टाकला होता. ब्रिटीशांनी आणलेल्या 'जन सुरक्षा' (पब्लिक सेफ्टी) विधेयकाच्या विरोधात, बहिऱ्या सरकारच्या कानांना ऐकू जाईल असा आवाज करण्याकरिता हा बॉंब टाकण्यात आला होता.** या विधेयकाच्या तरतूदी सुद्धा ब्रिटीश सरकारला कोणत्याही व्यक्तीस संशयावरून अटक करण्याचा, आणि विनाखटला तुरुंगात डांबण्याचा अधिकार देत होते. देशातील स्वातंत्र्य चळवळीचे दमन करणे हेच या कायद्याचे उद्दिष्ट होते. भारतीय जनतेच्या उठावाला घाबरणाऱ्या ब्रिटीश सत्तेने आपल्या दमनकारी, शोषणकारी सत्तेच्या रक्षणार्थ हा कायदा बनवलेला होता. **आज देश स्वतंत्र असताना, लोकांनीच निवडून दिलेले सरकार सत्तेत बसलेले असताना, सरकारांना ब्रिटीशांनी आणले होते तसे दमनकारी कायदे आणण्याची गरज का पडत आहे? याचे उत्तर सोपे आहे.**

77 वर्षांच्या स्वातंत्र्यानंतर भांडवलदार वर्गाच्या हितांकरिता देश चालवणाऱ्या कॉंग्रेस पासून ते भाजप पर्यंत सर्व सरकारांनी देशातील बहुसंख्या असलेल्या **कामगार-कष्टकरी वर्गाची शोषण करून जी दैन्यावस्था केली आहे, ती या** सत्ताधारी वर्गाला सतत कापरे भरवत असते. एकीकडे श्रमाच्या लुटीतून भांडवलदार वर्ग प्रचंड संचय करत आहे, दुसरीकडे असंख्य मार्गांनी मोठमोठ्या उद्योगांना करमाफी, कर्जमाफी, सरकारी अनुदान आणि मदत, जनतेची संपत्ती त्यांना कवडीमोल भावाने विकणे अशा पद्धतीने नफ्याच्या दराच्या घसरणीला थांबवण्याकरिता भांडवलदार वर्गाची मॅनेजिंग कमिटी असलेली भांडवली राज्यसत्ता काम करत आहे. म्हणूनच यांना भिती वाटत असते की गरिबी, महागाई, बेरोजगारी,

पान 2 वर

# परभणीतील दलित वस्तीत पोलिसाचे कोम्बिंग ऑपरेशन





पान 1 वरून

सोमनाथच्या मृत्यूविषयी खोटी माहिती दिली, जे शवविच्छेदन अहवालानंतरच समोर आले .

परभणीमधील दलितवस्तीवर झालेला हल्ला हा महाराष्ट्र सरकारच्या गृहखात्याचा पूर्वनियोजित राजकीय उद्दिष्टाने केलेला हल्ला होता. जनतेच्या विरोधाला कसे दाबायचे याचे धडे राज्याचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अगोदरच आपल्या भाषणात दिलेले होते. पुण्यात आणि पिंपरी चिंचवड येथे झालेल्या दोन भाषणात ते पाहता येईल. पुण्यातील भाषण हे विधानसभा निवडणूकीपूर्वी जेव्हा ते राज्याचे गृहमंत्री होते, तेव्हा त्यांनी पोलिसांना उद्देशून सांगितले होते कि, जो कोणी उद्योग आणि त्याच्या मालकाला त्रास देत असेल त्यांना बदडून काढा आणि जर पोलीस बदडून काढण्यात हयगय करतील तर पोलीसांची सुद्धा गय केली जाणार नाही. दुसरे भाषण मागील दोन आठवड्या पूर्वी पिंपरीत पोलीस आयुक्तालय उदघाटन करताना केले होते. त्यात त्यांनी याच भाषेचा वापर करत पोलिसांच्या आधारे बदडून काढू अशी धमकीच दिली होती. पुण्यातील 'निर्भय बनो' या कार्यक्रमावर हिंदुत्ववादी संघटनांनी हल्ला केला तेव्हा त्या हिंदुत्ववादी संघटनांना गुन्हेगार ठरवण्याऐवजी गृहमंत्र्यांनी 'निर्भय बनोच्या' कार्यकर्त्यांना भाषा चांगली वापरा असा सल्ला दिला ! राज्यातील पोलीस विभागाची दिशा आणि कार्यपद्धती काय असेल याचे हे निदर्शक आहे. "बदडून" काढण्याचा पोलिसांना आणि सरकारला अधिकार आहे काय? गुन्हेगारांना सुद्धा कायद्याच्या मार्गाने शिक्षा होणे अपेक्षित असताना, शांततामय आंदोलन करणाऱ्यांना सुद्धा गुंड म्हणून बदडून काढण्याचाच सल्ला गृहमंत्री देत होते.

राज्यात मागील दहा वर्षापासून महायुतीचे सरकार जवळपास सतत सत्तेत आहे. एकीकडे "ठोकण्याची" भाषा, आणि दुसरीकडे वास्तवात कायदा मोडणाऱ्यांना, गुंडगिरी करणाऱ्यांना अभय दिसून येते आहे. कॉ.गोविंद पानसरे आणि डॉ.नरेंद्र दाभोलकर यांची हत्या आणि त्यांच्या खऱ्या मारेकऱ्यांना पकडण्यात आणि शिक्षा देण्यातील अपयश; भीमा कोरेगाव घटनेनंतर उसळलेल्या दंगलीनंतर दलित समूहांवर झालेले हल्ले, मिलिंद एकबोटे आणि संभाजी भिडे यांची हल्ल्यात भुमिका स्पष्ट असतानाही त्यांना संरक्षण देत परिवर्तनवादी कार्यकर्त्यांना आणि दलित कार्यकर्त्यांना अटक; पुण्यातील पूर्णेश्वर मंदिराची जिर्णोद्धाराची चळवळ ज्यात भोसरीचे भारतीय जनता पक्षाचे लोकप्रतिनिधी महेश लांडगे , कुडाळचे आमदार नितेश राणे, मिलिंद एकबोटे यांचा पुढाकार आणि त्यात भडकावणारी भाषणे; महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात हिंदू आक्रोश मोर्चा काढून प्रचंड भडकावणारी भाषणे देत मुस्लिम विरोधी वातावरण बनवणे; विरोधी पक्षनेते आणि कार्यकर्ते यांचे फोन टॅपिंग प्रकरण; पुण्यातील निर्भय बनो कार्यक्रमावरील हल्ल्यात पोलिसांची बघ्याची भूमिका; पुणे विद्यापीठाच्या ललित कला केंद्रावर अखिल भारतीय विद्यार्थी परिषद आणि भारतीय जनता पक्ष पुणे शहराचे अध्यक्ष धीरज घाटे यांच्या पुढाकाराने हल्ला; पुण्यातील फिल्म इन्स्टिट्यूटमध्ये "राम के नाम" चित्रपट चित्रीकरण निमित्ताने हिंदुत्ववाद्यांनी केलेला हल्ला; पुणे विद्यापीठात विद्यार्थी संघटनांच्या कार्यकर्त्यांना मारहाण; किंवा सध्या नितेश राणे ज्या पद्धतीने मुस्लिम विरोधी भाषेचा वापर करत तणाव निर्माण करत आहेत अशा अनेक प्रकरणात सरकारने हिंदुत्ववादी विचाराच्या कार्यकर्त्यांवर कारवाई न केल्याचे किंवा कठोर कारवाई टाळल्याचे दिसून येते. ह्या सर्व घटना राज्य सरकार आणि त्यांच्या यंत्रणांची भूमिका उघड करतात आणि या पोलीस-दल व हिंदुत्ववादी संघटनांचे संगनमत समोर आणतात.

## खोट्या आशा सोडाव्यात!

फॅशिस्टांचा असा हल्ला चालू असताना, काँग्रेस सारखे पक्ष असोत, वा जरांगेंसारख्यांच्या मराठा संघटना, वा स्वत:ला दलितांच्या तारणहार म्हणवणाऱ्या अनेक संघटना, आज यांपैकी कोणाकडूनही जातीय अत्याचार आणि जातीप्रश्नावर ठोस भुमिकेची अपेक्षा केली जाऊ शकत नाही.

आताच्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत राहुल गांधींना साक्षात्कार झाला कि दलितांसाठी काँग्रेसने 'पुरेसे' काम केले नाही! हेच राहुल गांधी परभणीतील पोलीस अत्याचार झालेल्या दलित वस्तीत येऊन गेले. सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटूंबाला भेट दिली.लगेच परभणीत पत्रकार परिषद घेऊन दलित वस्तीत पोलिसांचा हल्ला आणि सोमनाथ सूर्यवंशी यांच्या हत्येला जबाबदार राज्य सरकार आणि त्यांची पोलीस यंत्रणा असल्याचे आरोप केले. याच राहुल गांधीनी परभणीतील घटनेच्या अगोदर कोल्हापूरला शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण केले आणि नंतर संविधान परिषद घेतली. कोल्हापूरात संविधान परिषद झाल्यानंतर राहुल गांधींनी एका दलित कुटूंबाला भेट दिली आणि त्या कुटूंबासोबत जेवण केले आणि स्वयंपाकघराची पाहणी केली. "दलित किचनमधील" पदार्थांची चव घेतली आणि तो पदार्थ कशा प्रकारे बनवला गेला याची प्रकिया शिकून घेतली. अशा प्रकारचे दिखाऊ आणि बेगडी दलितप्रेम दाखवून राहुल गांधी, काँग्रेस पक्ष दलित अत्याचारांचे जुजबीकरण करत आहेत.

वास्तवात केंद्रात आणि राज्यात सत्तेवर असताना काँग्रेस पक्षाने दलित अत्याचारांविरोधात कोणतेही ठोस पाऊल उचलेले नाही. महाराष्ट्रात काँग्रेस आणि राष्ट्रवादीची सत्ता असताना दलितांवर अन्याय आणि अत्याचाराच्या घटना घडल्या. त्या घटना आणि त्यांची तीव्रता क्रूर आणि अमानवी होतीच. काही उदाहरणे आठवावीत. मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलनात शंभरपेक्षा जास्त दलितांची हत्या झाली होती. खैरलांजी हत्याकांड प्रकरण असो, जवखेडा मधील दलितांची हत्या असो, ही सर्व प्रकरणे तर आघाडी सरकारच्या काळात घडली आहेत. खैरलांजी हत्याकांडनंतर आघाडी सरकारने तंटा मुक्ती केंद्रांची स्थापना केली, ज्याद्वारे वास्तवात गावातील वाद गावातच मिटवावेत या नावाखाली दलितांची मुस्कटदाबीच केली गेली, कारन या तंटा मुक्ती केंद्रावर प्रभूत्वशाली जातीतील व्यक्तींचे वर्चस्व होते. खैरलांजी हत्याकांडानंतर यशदा पुणे येथील शासकीय अधिकारी तत्कालीन महासंचालक रत्नाकर गायकवाड यांच्या पुढाकाराने खैरलांजी हत्याकांडाचा अहवाल तयार केला गेला, आणि तो यशदा या शासकीय संस्थेच्या संकेतस्थळवर टाकण्यात आला. राज्य सरकारने त्याविषयी तत्काळ आदेश दिल्या नंतर तो संकेतस्थळावरून काढून टाकण्यात आला. खैरलांजी प्रकरणात ॲट्रोसिटीचा गुन्हा शेवटपर्यंत सिद्ध झाला नाही.

निवडणुक प्रचारात भाजप संविधान बदलेल अशी हाकाटी पिटून काँग्रेसने दलितांची मते मिळवली, पण अत्यल्प संख्येकरिता आरक्षणाची तरतूद सोडली तर जातीअंताचा सोडाच जातीभेदाविरोधातही कोणताही कार्यक्रम काँग्रेसकडे नाही; आणि दुसरीकडे अंगावरील जानवे मिरवणाऱ्या राहुल गांधींच्या काँग्रेसचा इतिहासच साक्षी आहे की तिचा जातीव्यवस्थेला काहीच विरोध नाही.

मनोज जरांगे यांनी परभणीत पीडित दलित कुटूंबाला भेट दिली. दलित जातींवर अन्याय आणि अत्याचार करणाऱ्यांत सर्वाधिक पुढे महाराष्ट्रातील मराठा समुदायातील व्यक्ती आहेत, परंतू जरांगेंनी कधीही त्यांना उघडपणे विरोधसुद्धा केलेला नाही. हे स्वाभाविकच आहे. कारण मराठा असो इतर कोणतीही जातीय/धार्मिक अस्मिता, जेव्हा त्या अस्मितेच्या नावाने एकतेचा नारा दिला जातो, तेव्हा त्याला "इतर" जनसमुदायांबद्दल एक दुजाभाव निर्माण करावाच लागतो, आणि आपल्याच अस्मितेचे वर्गविभाजन टाळावे लागते. पुढे जाऊन, स्वत:ला आंबेडकरवादी म्हणवणाऱ्या किंवा दलितांच्या म्हणवणाऱ्या आर.पी.आय. सारख्या संघटना आज फॅशिस्ट भाजपच्या मांडीवर जाऊन बसलेल्या आहेत. सत्ताधाऱ्यांशीच साटेलोटे असल्यामुळे अनेक घटनांमध्ये कागदोपत्री निषेध सुद्धा नोंदवायला आज यापैकी अनेक संघटना तयार नसतात.

## राज्य सरकार आणि सत्तायंत्रणेचे फॅशिस्टीकरण

देशात फॅशिस्ट पक्ष मागील दहा वर्षापासून सत्तेवर आहे. राज्यात सुद्धा फॅशिस्ट पक्ष महविकास आघाडीचा अडीच वर्षाचा कालावधी सोडला तर एकूण साडेसात वर्ष सत्तेवर राहिला आहे. केंद्रातील फॅशिस्ट मोदी सरकार आणि राज्यातील फडणवीस सरकार तीव्रतेने फॅशिस्ट धोरणे आणि कायदे लागू करत आहे म्हणजेच, केंद्रातील मोदी सरकार वेगाने राज्यसत्तेच्या फॅशिस्टीकरणाची प्रकिया वेगाने चालवत आहे. प्रशासनाच्या महत्वाच्या पदावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला पूरक अधिकारी नेमले जात आहे. इतकेच नाही तर, आता सरकारी कर्मचारीही 'नमस्ते सदा वत्सले' गाऊ शकतील आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमात उघडरीत्या सहभागी होऊ शकतील असा निर्णय घेतला गेला आहे. न्याय व्यवस्थेतील न्यायाधीशांची नेमणूक करताना संघसमर्थक न्यायाधीशांना प्राधान्य दिले जात आहे. निवडणूक आयोग केंद्र सरकारच्याच इशाऱ्यावर काम करत आहे. राज्यातील लोकप्रतिनिधींचे स्वीय सहाय्यक म्हणून संघाचे स्वयंसेवक नेमले जात आहेत. विद्यापीठे किंवा शासकीय संस्थांवर सुद्धा संघ प्रणित व्यक्तींची नेमणूक केली जात आहे. थोडक्यात सर्वच क्षेत्रात आता कामगार-कष्टकरी विरोधी, दलित विरोधी जातीयवादी विचारांची माणसं अधिकार पदावर बसवली जात असताना, जातीय अत्याचारांविरोधातील लढा अधिक आव्हानात्मक बनला आहे.

## जातीय अत्याचारांविरोधातील कार्यदिशा: जातीविरोधी कामगार वर्गीय एकजूट करा!

परभणीतील घटनेविरोधात महाराष्ट्रात विविध ठिकाणी निषेध केले गेले. अनेक पक्ष, संघटनांनी राज्य सरकारचा आणि पोलीस यंत्रणांचा निषेध सुद्धा केला. परंतु यातून कोणत्याही ठोस कारवाईची आशा बाळगणे भ्रम ठरेल. आजवर झालेल्या जातीय अत्याचाराच्या घटनांवरील कारवाईचा इतिहास हेच शिकवतो. एका व्यापक जनांदोलनाच्या माध्यमातूनच आता या विरोधात खरा लढा शक्य आहे.

परंतु स्वत:ला आंबेडकरवादी म्हणवणाऱ्या किंवा विविध दलित, ओबीसी, मराठा, बहुजन आदी नावांनी बनलेल्या अस्मितावादी संघटनांकडून व्यापक जातीविरोधी एकजूट शक्य नाही. त्यांच्या अस्मितेचाच परिणाम आहे की त्या इतर अस्मितांना पृथक करतात आणि एकतेला बाधक बनतात. त्यापुढे जाऊन या सर्व संघटनांचे वर्गचरित्र हे मध्यमवर्ग, भांडवलदार वर्ग किंवा बड्या भांडवलदार वर्गाच्या हितांचे रक्षण करताना दिसते आणि या वर्गाला जातीअंतात काही स्वारस्य नाही. त्यामुळेही या संघटनांकडे आरक्षणासारख्या किरकोळ मागण्या आणि पुतळे उभारणे आणि प्रतिकात्मक कार्यक्रमांपलीकडे जातीविरोधी ठोस कार्यक्रम असणे शक्य नाही.

भारतातील भांडवली विकासाची प्रकिया ही मुळातच सामंती मूल्यमान्यतांशी क्रांतिकारी संघर्ष करून नव्हे तर त्यांना समायोजित करून झाली आहे. म्हणून भारतातील भांडवली समाजात पितृसत्तावादी आणि जातीयवादी विचारांचा पगडा टिकून आहे. जातीय अत्याचारांमागे आज ज्या वर्गप्रेरणा काम करत आहेत, त्या भांडवली आहेत. भांडवली धनिक शेतकरी, कंत्राटदार, मोठे व्यापारी, ठेकेदार, दलाल, छोटे-मध्यम-मोठे कारखानदार, इत्यादी सारख्या भांडवलदार वर्गातून येणाऱ्यांना हवे आहे की मेहनत करणाऱ्यांनी दबूनच रहावे आणि आपला आवाज उठवूच नये. म्हणूनच ते प्रत्येक कामगार वर्गीय आंदोलनाला दाबतात, आणि त्यातही दलित कामगार असतील तर जातीयवादी मानसिकतेतूनही अधिक दमन करतात. तथाकथित 'बहुजन' वा 'दलित' राजकारणाकडून आशा लावणाऱ्यांनी समजले पाहिजे की या जातसमूहांमधून पुढे आलेल्या मध्यम, उच्च-मध्यम आणि उच्च वर्गातील सदस्यांना सुद्धा जातीअंताशी नव्हे तर भांडवली व्यवस्थेत आपले जीवन सुरळीत करण्यात स्वारस्य आहे, आणि म्हणूनच ते अशा कोणत्याही दमनाच्या विरोधात लढण्याची हिंमत करत नाहीत. हिंदुत्ववादी फॅशिस्ट आंदोलन बड्या भांडवलाच्या हिताचेच आंदोलन आहे, आणि ब्राह्मणवाद, जातीयवाद हे त्याच्या हातातील मोठे हत्यार आहे. आज भांडवलशाहीसोबत लढण्याची भुमिका घेतल्याशिवाय जातीव्यवस्थेविरोधात लढण्याची कल्पना निकामी आहे. कामगार वर्गीय जातीविरोधी चळवळीद्वारेच, सर्व जात-धर्मीय कामगारांच्या जातीविरोधी वर्गएकजुटीद्वारेच आता जातीव्यवस्था आणि जातीय अत्याचारांविरोधात लढणे शक्य आहे.

# एसआरए योजना: आवासाच्या अधिकारासाठी नाही, तर बिल्डरांच्या नफ्यासाठी!



रवि

राज्यातल्या महानगरातील झोपडपट्ट्यांमध्ये कच्च्या, कोंदट, छोट्या, सुविधामुक्त घरांमध्ये राहणाऱ्या कष्टकऱ्यांना आरसीसीची पक्की घरं बांधून देणारा 'जनकल्याणकारी' कायदा म्हणजे एसआरए कायदा, अशी धारणा ह्या कायद्याबद्दल सरकार बनवू पाहते. **परंतु या कायद्यातल्या कलमांचे वर्ग-विश्लेषण केल्यावर ह्या कायद्याचे खरे चरित्र समोर येते. कल्याणकारी योजनेच्या मुखवट्याखाली आडव्या झोपडपट्ट्या उभ्या करून बिल्डरांचा नफा शिखरावर पोहोचवण्यासाठी एस.आर.ए. कायद्याचा घाट घातला गेला.** 1995 मध्ये अस्तित्वात आलेल्या ह्या कायद्याला हाताशी धरून सरकारने हजारो लोकांना बेघर केले. झोपडपट्टी असलेली जमीन रिकामी करून जमिनीच्या एका कोपऱ्यात अख्खी झोपडपट्टी उभ्या इमारतींमध्ये कोंबली जाते आणि उर्वरित जमीन बिल्डरांच्या घशात घातली जाते. आत्तापर्यंत 2257 प्रकल्प झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने हातात घेतले आहेत.

1995 साली महाराष्ट्रात झालेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये शिवसेना-भाजप महायुतीने बाजी मारली. त्याच वर्षी बिल्डर लॉबीचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या शिवसेनेचे प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी एसआरए विधेयक मनोहर जोशींच्या नेतृत्वात सरकार बनल्याच्या काही महिन्यांतच पारित करून घेतले आणि त्यानंतर या कायद्यावर कधीच बोट उगारले गेले नाही. सत्तेत आलेल्या प्रत्येक पक्षाने या कायद्यात दुरुस्त्या केल्या; मात्र ह्या कायद्याच्या उद्देश्यावर कधीही प्रश्न उपस्थित केले नाही. कारण, सर्वांच्या सहमतीने हा बिल्डर-धार्जिणा कायदा अस्तित्वात आला होता. या कायद्याचा अभ्यास केला असता या कायद्याचा आवासाच्या अधिकाराशी काडीमात्रही संबंध नसून त्याचा मुख्य उद्देश सरळ सरळ विकासक किंवा बिल्डरांच्या फायद्याशी जोडलेला आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या बहुतांश प्रक्रिया मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या (सीईओ) परवानगीने होतात. प्रकल्पामध्ये अडथळा आणणाऱ्या व्यक्तींवर किंवा जागा न सोडणाऱ्या अपात्र व्यक्तींवर कारवाई करण्याचा पूर्ण अधिकार सीईओला दिलेला आहे; परंतू याच सीईओ किंवा एसआरएच्या अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई करण्याची परवानगी हा कायदा काढून घेतो. आवश्यकतेनुसार कायद्याला धरून नियम बनविण्याचा अधिकार सीईओला देण्यात आला आहे. **सीईओ हे पद ह्या कायद्याचा सर्वेसर्वा जरी वाटत असले, तरी ते एका भांडवलदार वर्गाचे प्रतिनिधित्व करणारे आणि अनेकांच्या संपत्ती हितसंबंधांना एकत्र बांधणारे पद आहे.** एखाद्या प्रकल्पासाठी विकासकाला निवडण्यासाठी सुरुवातीला 70% रहिवाशांची मान्यता आवश्यक होती; 2020 मध्ये तिला बदलून 51% वर आणले. एखाद्या प्रकल्पात विकासकाला कमीत कमी बहुसंख्याकांना पात्र करून जास्तीत जास्त अल्पसंख्याकांना अपात्र करता येईल आणि अपात्रांकडून सीईओने ठरवलेली सदनिकेची किंमत विकासकाला वसूल करता येईल, याची पूर्ण सोय कायद्यात केली आहे. कोणत्या विकासकाला प्रकल्पासाठी निश्चित करायचे याचा अंतिम निर्णय सीईओच घेतो. कायद्याच्या कलम 3(के) नुसार जर राज्य सरकारने एखाद्या विकासकाला पुनर्वसन योजनेसाठी नियुक्त केले, तर एसआरएला हा निर्णय मान्य करावा लागेल. म्हणजे, छोट्या बिल्डरांना सीईओसोबत असलेल्या हितसंबंधांमुळे प्रकल्प मिळतो, तर मोठ्या बिल्डरांना मंत्री, आमदार, खासदार आणि मुख्यमंत्र्यांसोबत असलेल्या संबंधांमुळे प्रकल्प मिळतो. इथे मात्र झोपडपट्टी रहिवाशांची मान्यता भिरकावून दिली जाते. एकदा रहिवाशांकडून सहमती मिळाली आणि प्रत्येकासोबत झोपडी सोडण्याबद्दलचा करार झाला, की **घर मिळेपर्यंत विकासकाला जमिनीवर पूर्ण ताबा मिळतो. रहिवाशांकडे कुठलाच कायदेशीर मार्ग राहात नाही ज्याला घेऊन ते विकासकाला जाब विचारू शकतात.** जर विकासकाने ठरलेल्या कालावधीत प्रकल्प पूर्ण नाही केला, तर त्याला दंड ठोठावला जातो, जो अतिशय क्षुल्लक असतो. विकासकाने प्रकल्प पूर्ण करण्यास वर्षानुवर्षे दिरंगाई केल्यास, सीईओ त्याच्यावर कारवाई करण्यास बाध्य नाही. **कारवाई करणे हे सीईओच्या "विवेकबुद्धीवर" सोडण्यात आले आहे. एसआरए कायद्यातील ह्या आणि अशा अनेक तरतुदी विकासक, सत्ताधारी आणि नोकरशहांच्या संपत्ती संबंधांना स्पष्ट करतात.** पुनर्वसनाची प्रक्रिया राबवल्याबद्दल विकासकाला अतिरिक्त एफएसआय मिळतो, ज्याचा वापर तो उरलेल्या जमिनीवर मुक्त-विक्रीसाठी सदनिका किंवा वाणिज्यिक इमारती बांधण्यासाठी करतो. हाच एफएसआय विकासक हस्तांतरणीय विकासात्मक अधिकार (टीडीआर) मध्ये रूपांतरित करून तो इतर महागड्या ठिकाणीसुद्धा वापरू शकतो. पुनर्वसन प्रक्रियेत सहभागी झाल्यामुळे विकासकाला अश्या अनेक योजनांचा लाभ मिळतो, ज्यातून त्याचा नफा वाढण्यास हातभार लागतो.

**झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प राबवतानाची जमिनी हकिकत याहूनही जनविरोधी आहे. प्रक्रियेचा पहिला टप्पा, सर्वेक्षणापासून ते सदनिकेचा ताबा मिळेपर्यंत, प्रत्येक ठिकाणी विकासक साम-दाम-दंड-भेद वापरून स्वतःचा जास्तीत जास्त फायदा व्हावा, ह्यासाठी दबाव बनवत असतो.** पुण्यातील आंबीलओढा आणि मार्केट यार्डातील आंबेडकरनगर येथील प्रकल्पांमधून बिल्डरचा मनमर्जी कारभार आणि एसआरए प्रशासनाने त्याकडे केलेला कानाडोळा ढळढळीतपणे दिसतो. आंबेडकरनगर येथे एका खाजगी कंपनीने केलेल्या सुरुवातीच्या सर्वेक्षणामध्येच शेकडो घरांचे सर्वेक्षण न करताच अहवाल प्रस्तुत केला. त्या सर्वेक्षणानंतर इतर कोणतीच प्रक्रिया न होता सरळ करारनामे करण्यास विकासकाने सुरुवात केली. या सर्व प्रकल्पांमध्ये सारखा असलेला पैलू हा होता की प्रकल्पाबद्दलची माहिती मिळवणे जनतेला कठीण बनवले आहे. कष्टकरी जनता हातावरचे पोट असताना वेळेअभावी ह्या सर्व प्रश्नांमध्ये पडताना सहसा दिसत नाही. करारनामे करून घेण्यासाठी सगळीकडेच विकासक स्थानिक आमदार, खासदार, नगरसेवक, गुंड (सहसा त्यांचेच), वस्तीमधील प्रभावी लोक यांना हाताशी धरून जनतेवर घरावरचा ताबा सोडण्याबद्दलचे करारनामे करण्यासाठी दबाव बनवतात. अनेकवेळा स्थानिक नेते स्वतःच वस्तीमधील समीकरणे नियंत्रित करण्यासाठी दलालांना कामाला लावतात आणि विकासकासोबत तडजोड करण्यासाठी भाव लावतात. दलित-सवर्ण, हिंदू-मुस्लीम, महार-मातंग असे जाती-धर्माचे भेद पसरवून जनतेची एकता तोडण्याचे, त्यांच्यात फूट पाडण्याचे काम हे दलाल करत असतात. महागाई, बेरोजगारीशी रोज झुंज देणाऱ्या कष्टकरी-कामगार जनतेच्या पायाखालची जमीन तेव्हा सरकते, जेव्हा कोणतीच पूर्व सूचना न देता पात्र व्यक्तींची अंतिम यादी असलेले परिशिष्ट-2 एसआरएकडून जाहीर केले जाते. आंबेडकरनगरच्या यादीमध्ये जवळपास 40% रहिवाशांना अपात्र ठरवले गेले. आंबीलओढ्याच्या यादीमध्ये तर जवळपास 25% नावं वस्तीच्या बाहेरची होती. अशा परिस्थितीत विकासकाकडे 51%पेक्षा जास्त सहमती असल्यामुळे, **बहुसंख्याकांना पात्र करून जनतेमध्ये फूट पडल्यामुळे आणि वर्गीय चेतनेवर जनता संघटित नसल्यामुळे खूप काही करणे शक्य बनत नाही.** बहुमताची सहमती मिळाल्यानंतर उर्वरितांचे करारनामे करवण्यासाठी अनेकवेळा पाणीपुरवठा बंद करणे, वीज कापणे, महिलांची छेड काढणे, अशा मार्गांचाही वापर केला जातो. लोक वस्ती सोडून जाण्यास तयार नसतील तर शेवटचा पर्याय म्हणून पोलिसांच्या फौजफाट्यासह बुलडोझर फिरवण्यासही प्रशासन तयार असते. स्पार्क, राष्ट्रीय झोपडपट्टी रहिवासी संघ (एनएसडीएफ), महिला मिलन यांसारख्या एनजीओचा वापरसुद्धा आज बिल्डरच्या बाजूने सहमती बनवण्यासाठी केला जातो.

सर्व पात्र रहिवाशांना पुनर्वसन इमारतीचे काम पूर्ण होईपर्यंत संक्रमण इमारतीत (ट्रांझिट) तात्पुरते हलवले जाते किंवा एसआरए ठरवेल त्या प्रमाणे दरमहा भाडे दिले जाते. अनेक उदाहरणं आज समोर आहेत ज्यात एसआरए प्रकल्प एका दशकापेक्षा जास्त काळासाठी रखडला, विकासकाने सुरुवातीचे काही दिवस भाडे दिले, त्यानंतर बंद केले. कामाची अनिश्चितता आणि हातावरचे पोट यामुळे बहुतांशवेळी कष्टकरी संक्रमण इमारतीचा पर्याय निवडतात. अनेक हालअपेष्टा सहन करत, आहे त्या स्थितीत राहत आपल्या हक्काच्या घराची वाट बघत आयुष्याची 10-15 वर्षे काढतात. प्रकल्प पूर्ण होऊन सदनिकेचा ताबा मिळाल्यानंतर विकासकाने आडव्या झोपड्यांना उभ्या झोपडपट्टीमध्ये रुपांतर करून उरलेल्या जमिनीवर मुक्त-विक्रीच्या घटकातील सदनिका बांधल्याचे जनतेला स्पष्ट होते. झोपडपट्टीवासीयांच्या "पुनर्वसनासाठी" बांधलेल्या इमारतीसाठी निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यात येते, मैदान, कम्युनिटी हॉल या सारख्या जागा दिल्या जात नाहीत, आणि मुक्त-विक्री घटकांसाठी जास्तीत जास्त भूभाग मोकळा करण्यासाठी इमारती एकमेकींना खूप जवळ बांधण्यात येतात. मोकळ्या जागेच्या अभावामुळे मुले घरातच अडकून पडतात. वाढत्या वयात त्यांना योग्य व्यायाम न मिळाल्यामुळे त्यांचे स्नायू कमकुवत बनतात. नफ्याच्या हव्यासापोटी कमी जागेत आणि कमी खर्चात इमारत उभी केल्यामुळे अनेक प्रकल्पांची रचना अतिशय निकृष्ट आणि अकार्यक्षम आहे. वेंटीलेशनच्या अभावामुळे हवेची गुणवत्ता कमी आहे, उष्णता अडकल्यामुळे तापमान जास्त आहे, नैसर्गिक प्रकाश अपर्याप्त आहे आणि प्रदूषकांच्या सांद्रता(कॉंसेंट्रेशन) वाढलेल्या आहेत. "मुंबईच्या पुनर्वसितांच्या घरातील हवेची गुणवत्ता" नावाने झालेल्या अभ्यासातून हे दिसते की पुनर्वसन झाल्यानंतर आरोग्याच्या समस्या वाढल्या आहेत. इमारतीच्या निकृष्ट रचनेमुळे लोकसंख्येची वाढलेली घनता आणि अपुऱ्या वेंटिलेशनमुळे आर्द्रतेची(ह्युमीडीटी) पातळी वाढली, ज्यामुळे बुरशी आणि श्वसनसंस्थेच्या विषाणूजन्य आजारांचे, जसे क्षयरोग (टीबी), प्रमाण वाढले. तसेच, अशा अतिघन इमारतींमध्ये स्वयंपाक करताना निर्माण होणारा धूर, उदबत्त्यांचा धूर आणि कीटकनाशकांचे धूर बाहेर टाकण्यासाठी मार्गच नसतो. अशा इमारतींमध्ये गोपनीयतेचा प्रश्नही रहिवाशांना पडलेला असतो. गोपनीयतेच्या चिंतेमुळे अनेकवेळा खिडक्यांसुद्धा कव्हर लावले जाते, ज्यामुळे त्यांच्या घरांपर्यंत पोहोचणारी थोडीशी हवा आणि नैसर्गिक प्रकाशदेखील बाधित होतो. इमारत बनल्यानंतर तिच्या देखभालीसाठी विकासकाला प्रति सदनिका 40 हजार रुपये जमा करणे बंधनकारक आहे. परंतू ही रक्कम एवढी तोकडी आहे की त्यातून मिळणाऱ्या व्याजातून इमारतीची देखभाल अशक्य आहे. म्हणूनच स्वच्छ न केलेल्या पाण्याच्या टाक्या आणि सर्वत्र पसरलेला कचरा यामुळे गॅस्ट्रोसारखे आजार या इमारतींमध्ये सामान्य आहेत.

योजनेत पात्र होण्यासाठी सुरुवातीला जानेवारी 1985च्या आधीचे रहिवासी असल्याचा पुरावे आवश्यक होते, आता ती मुदत जानेवारी 2000 पर्यंत वाढवली आहे. परंतू इथे लक्षात घेण्याची बाब ही की 2000-2011च्या दरम्यान आलेल्या रहिवाशांना सदनिकेची किंमत बिल्डरला मोजून आणि महानगरपालिकेला 40 हजार रुपये देऊन पात्र होता येते. 2011च्या नंतर स्थलांतरित झालेल्या रहिवाशांना अपात्र म्हणून घोषित केले जाते. त्यामुळे अनेक रहिवाशांसमोर दुसऱ्या वस्त्यांमध्ये स्थलांतरित होण्याचाच मार्ग शिल्लक राहतो. पुढे, एका व्यक्तीने कुटुंब वाढल्यामुळे घरावर मजले चढवले तरी त्याला एकच सदनिका मिळते. नव्या सदनिकेचा ताबा मिळाल्याच्या 5 वर्षानंतर अनेकवेळा इमारतीचा देखभाल खर्च परवडू न शकल्यामुळे, महागाईचा सामना करण्यासाठी अजून एक मिळकतीचा स्रोत मिळण्यासाठी

पान 10 वर

• संपादक मंडळ – निखील एकडे, बबन ठोके • संपादकीय कार्यालय: द्वारे बबन ठोके, देविका मेडिकोच्या वर, साई कृपा चाळ, साईबाबा मंदिराजवळ, वीर जिजामाता भोसले मार्ग, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नगर, मानखुर्द, मुंबई - 400043 • मो. नं. 8669735643 , 9619039793 • जागृति प्रिंटर्स, 12-ए, ग्राउंड फ्लॉर, भायखला सर्विसेज इंडस्ट्रीज, भायखळा, मुंबई - 9820017588 येथे मुद्रित